# पुरवा

सावित्री जगदाळे



प्रकाशक
रामचंद्र जोरवर
कल्पना बुक डीलर्स
हेमी क्लासिक, पुणे-सातारा रोड,
एलोरा पॅलेस चौक, धनकवडी, पुणे - ४११०४३.
फोन - २४३७४४९८, २४३७१०२६

प्रकाशन क्र. ५१

फुटवा (कथासंग्रह)

© सौ. सावित्री जगदाळे

प्रथमावृत्ती - २-५-२००७

मुखपृष्ठ - जगदीश खैरे, मिलिंद सोनावणे

अक्षरजुळणी - प्रांजल एंटरप्रायझेस, पुणे - ४३.
☎ ९४२२५०४९४६

मुद्रक - जय गणेश ऑफसेट, पुणे.

मूल्य - रुपये १६०/- फक्त

## सावित्री जगदाळे यांचे
## इतर प्रकाशित साहित्य

- अंकुरात सजला साज
- एकट पाखरा
- तांबडं फुटलं
- सफर मंगळावरची

# ऋणानुबंध

- साहित्य क्षेत्रातील ज्येष्ठ आणि श्रेष्ठ श्री. कल्याण इनामदार, आनंद यादव, अनुराधा गुरव
- माझी मैत्रीण कवयित्री सौ. शोभा जोशी
- मिलिंद आणि श्रीकृष्ण या माझ्या मुलांची माझ्यासाठी चाललेली धडपड कौतुकास्पदच आहे.
- मा. श्रीरंग बारणे यांचे सहकार्य मोलाचे आहेच.

## ‘शुभेच्छा’

सौ. सावित्री जगदाळे एक प्रसन्न व्यक्तिमत्त्व.

माझ्या आयुष्याच्या संध्याकाळी मला भेटलेली एक साहित्यप्रेमी मैत्रीण. वयाने मी मोठी. पण हिचा साहित्य प्रपंच मोठा.

डांगे चौकात आपल्या साहित्याने बहरू पाहणाऱ्या त्या माझ्या मैत्रिणीला, तिच्या ह्या पुस्तक प्रकाशनानिमित्त, उर्वरित आयुष्यांत जिच्या साहित्य प्रवासास खूप खूप शुभेच्छा.

प्रतिभा ही अंतरंगातच असते.

प्रयत्नाने तिचा विकास होतो.

यशाचंही तसंच असतं.

सततच्या जिद्दीने, चिकाटीने यशाचे इंद्रधनुष्य तू सहज पेललस.

असेंच परिश्रमांत सातत्य व प्रयत्नशील रहा

यशस्वी हो.

तुझी स्नेहांकिता

गुढीपाडवा, १९-३-२००७ **सौ. शोभा जोशी**

# प्रस्तावना

कथा, लिखित स्वरूपात आल्यापासून मानवी मनाचा तळ ढवळू लागल्या. कधी मनोरंजनासाठी तर कधी गोष्टीवेल्हाळ रसिकांच्या गरजेपोटी लिहिलेल्या कथेतील आशयाभिव्यक्तीचा पोत कालानुरूप बदलत गेला. अंतरमनाचे हेलकावे, कौटुंबिक ताणतणाव, प्रासंगिक सुखदु:खाची ससेहोलपट, भाषा, ग्रामीण बोली, प्रादेशिक रीतीरिवाज, रूढी, परंपरा आणि चित्रगोचरता अशा अनेक अंगांनी कथाविश्व समृध्द झाले. स्थलकालपरत्वे कथेची वैशिष्ठ्यपूर्ण मांडणी करणारे कथाकार स्वत:च्या पुष्ट शैलीत कथाविष्कार करू लागले. व्यक्तीचित्रणाच्या सूक्ष्म बारकाव्याने तर विसाव्या शतकातील कथेच्या आकृतीबंधात रसिक स्वत:चेच प्रतिबिंब पाहू लागला. कथा मानवी गुंतागुंतीची उकलन करत विकसित होऊ लागली.

र. वा. दिघे, य. गो. जोशी, शंकर पाटील, व्यंकटेश माडगूळकर, रा. रं. बोराडे अशा अनेक कथाकारांच्या लेखणीतून प्रादेशिकता, अस्सल ग्रामीण बोली आणि कौटुंबिक चौकटीचे बहुआयामी दर्शन घडू लागले. हे मुद्दाम सांगण्याचे कारण 'फुटवा' या कथासंग्रहाचे वेगळेपणही याच पठडीतला भावानुभाव व्यक्त करताना दिसते.

'फुटवा'तील सावित्री जगदाळे त्यांच्या कथा माणसांच्या मनाचे पदर लिलया उलगडताना दिसतात. विषयाच्या विविधतेपेक्षा आशयाचा एकसंध परिणाम

घडविण्यात लेखिकेला अधिक स्वारस्य आहे. रसिकांच्या भाववृत्तीला हात घालताना नेमक्या व्यावहारिक शब्दांचा वापर करण्याचे कौशल्य त्यांच्याकडे आहे.

प्रश्नांच्या सुया टोचू लागल्या कोवळ्या काळजाला (प्रदूषण टक्केवारीचं), नाहीतरी बायकांचं नशीब शिळ्याभोवती घुटमळतं (फुटवा), नवी नवलाई बायका नवऱ्यातच सर्वस्व विसर्जन करतात (फुटवा), मधनंच दुष्काळ भेटून जायचा अधिकाच्या महिन्यासारखा (दिवाळी), की देवाच्या पोटातली दोन्ही बकरी संपली कुणास ठाऊक (शर्टाची गोष्ट), हृदयातल्या घननीळाला डोळ्यातल्या यमुनेनं स्नान घालताना तिची तगमग थांबली. (फुललं समाधान असमाधानातून....), काचेचा डिनरसेट घेतलेला पण गडबडीत फुटण्याच्या भीतीने काढलाच नाही. फक्त गौरीपुढे फराळ ठेवण्यापुरते काढायची (होता उपवर....), हत्तीच्या पिलानं रक्तगट विचारला. बायोडाटामधे तो नव्हता. हुशारीचं कौतुक वाटलं (होता उपवर....) अशा कितीतरी वाक्यांतून दैनंदिन व्यवहाराचा संदर्भ नकळतपणे डोकावताना दिसून येतो.

कथासूत्रात आलेल्या पात्रांच्या मनाची उलघाल चितारताना लेखिका म्हणते.... टपोऱ्या स्वच्छ डोळ्यांचं लालसर तळं झालं होतं (प्रदूषण टक्केवारीचं...), सरपंच कोरडीच भाकरी कुस्करत होते. खडीच्या रस्त्यावर फुलं अंथरल्यासारखं वाटत होतं. (पोस्टाच्या पेटीचं कुलूप), नवऱ्यापेक्षा चुलीतला जाळ परवडला. तो अपमानाने जाळत तरी नाही (दिवाळी), करंजीची कड कातरल्यासारखं गंगुवैनीचं काळीज कातरलं. आयं,

सगळं शिकवलं तसं जीव कसा द्यायचा हे बी शिकवलं असतं तर कशाला ही येळ आली असती (अधू) इत्यादी....

लेखिकेने बोधावस्थेत किंवा अबोधावस्थेत घेतलेले भोवतालचे सूक्ष्म निरीक्षण कथासूत्रात कमालीचा जिवंतपणा आणते. उदा. मुलांच्या बाबतीत आया वेगळ्या असतात. सुनेच्या बाबतीत वेगळ्या (फुटवा), चुलीच्या जाळानं काळं करपट खड्डे पडलेल्या त्या पातेल्यासारखी बापूची आई दिसत होती (दिवाळी), तोंडात स्तन होतं तरी त्याचं पोटातून येणारे हुंदके चालूच (देवाने मारलेल्या गाठी).

'पोस्टाच्या पेटीचं कुलूप' या कथेत बायकांच्या स्वभावाविषयीचा मार्मिक बारकावा टिपताना सावित्री जगदाळे म्हणतात, 'अधिकार नसला तरी ओरडायचं नू दिला तर रडायचं.'

या संग्रहात ग्रामीण पार्श्वभूमिवर रेखाटलेल्या कथेतील शब्दांचा ठसका वाचकांना थेट वास्तवात घेऊन जातो. 'दिवाळी', 'अधू', 'क्षमा', 'देवाने मारलेल्या गाठी' अशा कथेतील संवादलय शहरी वाचकांना अपरिचित असली तरी, ग्रामीण वाचक मात्र पात्रांच्या तोंडी घातलेल्या शिव्यासकट बोलीभाषेचे स्वागत करेल. शेणाचा काला झाला होता (दिवाळी) यातील 'काला' या शब्दाने गोठ्याचा परिसर डोळ्यासमोर उभा राहतो. 'तोंडावर लाडू-कानवले खाल्ल्याचं तेज आलं' म्हणताना कानवल्याची खाशियत समजते.

अंघोळीच्या वेळी घरात साबण नाही म्हणून.... 'हातापायावरनं दगूड फिरवला' हे 'क्षमा' या कथेतले वाक्य गरिबाच्या पोटात शिरून लक्तरे उघडे करते. प्रसंगी

'चुलीतला जाळ बी मऊ रेशीम झाला' अशा अलंकारिक भाषेतून कथेची उंची वाढवते आणि 'कपातले वादळ' मधून 'मधुराने गॅसवर कॉफीला दूध + पाणी ठेवलं' यातून ग्रामीण आणि शहरी संस्कृतीचे कप्पे स्पष्ट करते.

एखाद्या साध्या प्रसंगाने किंवा रोजच्याच वातावरण निर्मितीने कथेची आकर्षक सुरूवात करून काही वेळा धक्का तंत्राने कथेचा शेवट करण्याचे कसब लेखिकेला अवगत आहे. पहिल्याच कथेच्या शेवटी मुलाच्या आनंदावर विरजण घालणारी आई काय... 'देवाने मारलेल्या गाठी' तील डुकरीन काय... वाचक विसरू शकत नाहीत.... 'कपातले वादळ' मधील 'मनाच्या निर्मळतेचं मलम अन् विश्वासाचं बँडेज, डॉक्टरसाहेब!' हे शेवटचे वाक्य मनात रेंगाळत राहते.

'फुटवा' ही कथासंग्रहाच्या शीर्षकाची कथाच या संग्रहाचे बलस्थान आहे. मानसिक आणि शारीरिक संदर्भाची वीण उकलत लेखिकेने 'क्लोन' हा कादंबरीचा विषय कथेतून लालित्यपूर्ण शैलीत हाताळताना 'क्लोन तर आईचं करायचं'च्या आवर्तनातून स्त्री-पुरुषाचे भावनिक पापुद्रे सोलत आशयाचा परिणाम गाठला आहे. कथेची उत्कंठा वाढवून क्लोन लहान असला तरी पेशींच्या मालकाचेच त्याचे वय असते. या सिध्दांताने थांबवलेली कथा शेवटच्या अनपेक्षित कलाटणीने हृदय पिळवटून काढते. नेमके हेच सावित्री जगदाळे यांचे सामर्थ्य म्हणावे लागेल.

व्यसन, संशय, दीराने केलेला बलात्कार, सासऱ्याची शारीरिक भूक, नैतिकतेला झुगारून स्त्री-पुरुष संबंधाने घेतलेला धाडशी निर्णय, अडाणीपणाचा कळस, पोलीस

खात्याचे इंगित अशा सर्वश्रुत विषयाला आणि प्रसंगाला या संग्रहात कथेचे परिमाण लाभल्यामुळे वाचकाला विरंगुळ्यातून वास्तव भेटत राहते. कथाविषय होणारे जात-पातीचे बंधन झुगारून यातल्या कथा सच्चा संवादी सूर आळवताना 'विषकन्या जसं थोडं थोडं विष पचवत असतात तसंच मेधासारख्या ९६ कुळीच्या स्त्रिया अशा अपमानांनी आपली पतीनिष्ठा सोडत नाहीत' अशा पल्लेदार वाक्याच्या आश्रयाने फुलत जातात.

या संग्रहातून नवनव्या आव्हानाला सामोरे जाणारे सूत्र मात्र कुठेच सापडत नाही. वास्तव आणि व्यवहारापलीकडे जाऊन निष्कर्षाप्रत नेणारी कथा लेखिकेला अजून सापडायची आहे.

'अधू' या कथेत दिवाळीच्या नरकचतुर्थीला पहाटे केलेल्या फराळाला 'न्याहरी' संबोधने इष्ट वाटत नाही. न्याहरीला चिकटलेला अर्थ फराळाचे प्रतिनिधित्व करण्यास कुचकामी ठरतो. 'फुटवा', 'पोस्टाच्या पेटीचं कुलूप' आणि 'शर्टाची गोष्ट' सारख्या कथांना दिलेले शीर्षक वाचकांची उत्कंठा वाढवतात.

मुळात कथेची 'मूस' सौ. सावित्री जगदाळेंना सापडल्यामुळे भविष्यकाळात कथालेखनाची उर्मी त्यांना स्वस्थ बसू देणार नाही. त्यांचे कथाविश्व अधिक सकस, समृध्द आणि लोकप्रिय होईल एवढी ग्वाही 'फुटवा'ने दिलीच आहे.

त्यांच्या पुढील वाटचालीस मन:पूर्वक शुभेच्छा !

पुणे,
दिनांक १४-३-०७ डॉ. कल्याण इनामदार

मार्ग दाखविणाऱ्या गुरू
मैत्र जपणाऱ्या मैत्रिणी
ममत्वाची, वात्सल्याची पखरण करणाऱ्या माता
आणि आणखी बऱ्याच काही जे
शब्दातीत आहे
अशा थोर कादंबरीकार, कथाकार, कवयत्री,
**प्रा. अनुराधा गुरव यांस**

**सौ. सावित्री जगदाळे**

# अनुक्रमणिका


१) **प्रदूषण टक्केवारीचं.....**

२) **फुटवा** - विज्ञान परिषदेचे प्रथम पारितोषिक (मे २००२ च्या विज्ञान मासिकात प्रसिद्ध).

३) **पोस्टाच्या पेटीचं कुलूप** - 'मिळून साऱ्याजणी' मध्ये प्रसिद्ध (एप्रिल २००२).

४) **दिवाळी** - 'दैनिक महासत्ता', कोल्हापूर दिवाळी अंकात प्रसिद्ध- २००३

५) **शर्टाची गोष्ट** - 'साहित्य सहयोग', देवगड, दिवाळी अंकात 'जिद्द' या नावाने प्रसिद्ध - २००३.

६) **अधू** - 'साहित्य सहयोग', देवगड दिवाळी अंकात प्रसिद्ध - २००२

७) **कपातळे वादळ** - 'सखी संपदा' दिवाळी अंकात १९९९ - प्रथम क्रमांक

८) **क्षमा**

९) **फुललं समाधान असमाधानातून**

१०) **देवाने मारलेल्या गाठी**

११) **होता उपवर...**

# प्रदूषण टक्केवारीचं

आनंद बसमधून उतरला. अवजड दप्तर सावरत, शाळेच्या इमारतीकडे निघाला. बसस्टॉपपासून शाळा फार तर शंभरएक पावलावरच. रस्त्यावर गर्दी एवढी की तो पार करून शाळेत जाईपर्यंत एक किलोमीटरएवढा वाटतो. मोटरगाड्या, मोटारसायकली, सायकली, बस, शाळेत मुलांना सोडायला येणारे पालक, रस्त्यावरच्या स्टॉलवरचे काही-बाही खरेदी करणारे, नुसती ही ऽ गर्दी. सर्वांचीच धावपळ, घाई अशा ह्या गडबड गर्दीत आनंद सारख्या दहा-अकरा वर्षाच्या मुलाची ससेहोलपट काय वर्णावी ! पाठीवरचे ओझे सांभाळत, गाड्यांकडे लक्ष ठेवत

एकेक पाऊल उचलायचे. सावध, विचारपूर्वक चुकून हलगर्जीपणामुळे कुणाचा धक्का लागलाच तर आणखी हालच. नवीन फ्लॅट घेतल्यामुळे (शाळेपासून लांब, स्वस्त पडला म्हणून.) एवढ्या लांब रिक्षा लावणं परवडत नाही बाबांना आणि दोन तास आधीच तयार व्हायचे. कोंबून बसायचे, तास-दीड तास गुदमरत, चेंगरत रिक्षातून फिरायचे. त्यापेक्षा आनंदला बस बरी वाटते. खूपदा गर्दी असली तरी केव्हातरी बसायला जागा मिळतेच की. एकदा आनंदकडून गाडीवरचे चणे घेताना खिशातले बससाठीचे पैसेही पडले. पास अजून काढायचा होता. तिकीट काढायच्या वेळी त्याच्या लक्षात आले. लहान मुलांना कंडक्टर 'बरं, असू दे.' म्हणून सोडून देताना त्याने पाहिले होते. त्यामुळे आताही आपल्याला कंडक्टर सोडून देईल या विश्वासाने (जरा जास्तच !) तो म्हणाला, "माझे पैसे पडले. तिकीटाला पैसे नाहीत." कंडक्टर ओरडला, "मग ऽ मी काय करू? उतर खाली. चणे, फुटाणे खायचे न् म्हणायचे पैसे हरवले. खाली उतर?" कंडक्टरने बेल मारली. आनंद घाबराघुबरा होऊन उतरला. पावसाळ्याचे दिवस. चालत जाणे शक्यच नव्हते. विमनस्क अवस्थेत तो शाळेच्या फाटकात गेला. तिथे चित्रकलेचे सर उभे होते. ते फारसे न रागावणारे, तरुण, मुलांच्यात मिसळणारे होते. 'मागावेत का ह्यांना. ते पण ओरडले तर? आता मग? घरी कसं जायचं?' आनंदच्या डोळ्यातून पाणी वाहू लागले. सोनार सरांनी बघितले, "काय रे, घरी गेला नाहीस?" "माझे पैसे हरवले. कंडक्टरने उतरवलं." आनंद स्फुंदू लागला. सरांनी खिशातून पैसे काढून त्याला देत म्हणाले, "अरे, सांगायचं मग. हे घे."

"उद्या देतो सर." म्हणत ती दौलत मुठीत घट्ट पकडत बसस्टॉपकडे धावत निघाला.

आनंदने वर्गात जाऊन दप्तर ठेवले. अजून शाळा भरायला अवकाश होता. डबा, वॉटरबॅग सेल्फमध्ये ठेवून तो आपल्या ग्रुपमधील कोणी दिसतंय का हे पहायला लागला. निखिल, मोहित दिसले. तसा आनंद त्यांच्याकडे पळाला. आनंदमुळे त्यांच्या खेळात खंड पडला, तरी त्यांनी त्याला घेतले. नवा डाव, नवं राज्य. नव्या गड्याकडेच. (लहान मुले दुसऱ्यांना राज्य

देताना कशी अगदी आनंदीत होतात. राज्य म्हणजे जबाबदारीचा काटेरी मुकूट हे त्यांना कसे कळते?) सगळे खेळण्यात गुंग झाले. तेवढ्यात शाळा भरल्याची घंटा झाली. सगळी मुले आपापल्या वर्गात पळाली. शाळेचे ग्राऊंड छोटेच आहे. तिथेच विद्यार्थ्यांच्या सायकली, शिक्षक, कर्मचाऱ्यांच्या दुचाक्या ठेवल्यामुळे निम्मे-अधिक पटांगण अडलेले. उरलेल्या जागेत खालच्या वर्गातील, विशेषत: पाचवीचेच विद्यार्थी प्रार्थनेसाठी उभे राहिले. बाकीचे आपापल्या वर्गापुढे गॅलरीत उभे राहिले. मैदानात उभ्या राहणाऱ्या मुलांना वरून ऊन सोसण्याचे शिक्षण या थोर शाळेत मिळते. म्हणून तर लता मंगेशकर, वसंत गोवारीकर सारखे लोक इथे असे शिकल्यामुळे थोर झाले.

'देवतुल्य बाबा माझे, देवतुल्य आई ।
पूजा करितो त्यांची, अन्य देव नाही ॥धृ॥'

उमाकांत काणेकर लिखित गीत सुरू झाले. पाठीमागे तेजस आणि सुरज एकमेकांना चिमटे काढीत होते. ज्योती आणि प्राची कुजबुजत होत्या. सावंत सर रांगेतून फिरत होते. ते जवळ येताच मुलांची चुळबुळ थांबायची. प्रार्थनेनंतर पसायदान झाले. मग राष्ट्रगीत. राष्ट्रगीत म्हणून झाले तरी स्पीकरची घरघर सुरूच. सरांच्या इशाऱ्यामुळे मुले जागेवरच थांबली. सोनार सर बोलू लागले, "आपल्या शाळेत दरवर्षीप्रमाणे यंदाही विज्ञान-प्रदर्शन भरणार आहे तरी ज्या मुलांना भाग घ्यायचाय त्यांनी, आपापल्या वर्गशिक्षकाकडे नावे नोंदवावीत. तसेच अधिक माहिती घ्यावी, विषय समजावून घ्यावेत." स्पीकरचा आवाज शांत झाला न् मुलांचा गलका सुरू.

आनंद यंदाच हायस्कूलात आलेला त्यामुळे त्याला विज्ञान-प्रदर्शनात कुतूहल वाटू लागले. वर्गशिक्षक बागेवाडीकर सर आले. त्यांनी टेबलवर छडी आपटली. हेच सर फक्त छडी घेऊन येतात. जुनी सवय ! हल्ली छडी फक्त टेबलावर आपटण्यापुरतीच असते. मुलांच्या आवाजापेक्षा छडी-टेबलाचा आवाज मोठा. त्यामुळे ओरडून घसा सुकण्याची वेळ यायची नाही. छडीच्या आवाजाने सगळा वर्ग शांत झाला. मुलांनी उभा राहून,

'गुड मॉर्निंग स ऽ र' एका सुरात म्हणाली. "गुड मॉर्निंग बसा." बसा म्हणण्याची वाट पाहत मुले थांबणारेयत? सरांनी हजेरी बुक उघडून हजेरी घेऊ लागले. तेवढ्यात पत्रक घेऊन शिपाई आला. हजेरी चालू असल्यामुळे तिथेच टेबलावर पत्रक ठेवून निघून गेला. हजेरी घेऊन झाल्यावर सरांनी डोळ्यावरचा चष्मा नीट करत पत्रक वाचले. मुलं उत्सुकतेने चुळबुळ करत होती. घसा खाकरत सर म्हणाले, "मुलांनो, मघाशी 'विज्ञान-प्रदर्शनाबद्दलची सूचना ऐकलीच असेल." पुढची मुलं 'हो ऽ सर' म्हणाली. "नीट ऐका ऽ" टेबलावर छडी आपटत सर म्हणाले, "विषय समजावून सांगतो. काही शंका आली तर विचारा." सर वाचू लागले. मुलांच्या चेहऱ्यावर कुतूहल दिसू लागले. सगळे सावरून बसले. सर म्हणाले, "त ऽ र विषय ऐका - "कृषी. कृषी म्हणजे काय? आनंद. तू सांग," आनंद बावचळून उभा राहिला. त्याच्याकडे पाहत सर पुन्हा म्हणाले, "कृषी म्हणजे काय?" "माहित नाही." आनंदचा चेहरा पडला. खालचा ओठ अलग होऊन लटकल्यासारखा दिसू लागला. मोठे डोळे लालसर पाणीदार झाले. आपल्याला का नाही येत? काहीच कसं येत नाही. तो उदासून गेला. "मी सांगू सर?" निखिल ओरडला.

"हं सांग बघू." "शेती."

"बरोब्बर. बस कृषी म्हणजे शेती या विषयावर कुठलीही वस्तू तयार करायची म्हणजे नांगरणीचे, पेरणीचे, शेतकऱ्यांना वस्तू तयार करायच्या अन् प्रदर्शनात मांडायच्या." सरांना वाटले ह्या मुलांनी अशा वस्तू बघितल्या, हाताळल्या तर तयार करून मांडू शकतील ना? या शहरात कुठे जाणार पहायला? असो. "सर, प्रदर्शन म्हणजे काय?" कुणीतरी विचारले. "साड्यांचा सेल असतो तस्सं." ज्योती फणकारली. "अरे प्रदर्शन म्हणजे हे ऽ आपलं ऽ ते ऽऽ वस्तू तयार करायच्या अन् टेबलावर मांडून ठेवायच्या. मग सगळे विद्यार्थी, पालक, शिक्षक ते बघायला येतील. त्यांना तिथं उभा राहून त्या वस्तूंबद्दल माहिती सांगायची."

"बघ." ज्योतीचा ठसका. "ये ऽ गप" मोहित.

मागच्या कलकलाटाकडे सरांचे लक्ष गेले.

''मोरे, साळुंखे गप्प बसा.'' शांतता.

''दुसरा विषय आहे प्रदूषण. प्रदूषण म्हणजे काय?''

''सर, मी सांगतो.'' ताईने लिहिलेला निबंध ती बाबांना वाचून दाखवताना आनंदने ऐकलेला. हवेत वाईट पदार्थ धूर, धूळ मिसळले की हवा प्रदूषित होते म्हणजे खराब होते. एवढं त्याला समजलेलं आणि माणसं गाड्या चालवतात, झाडे तोडतात, त्यामुळेही प्रदूषण होतं. हेही समजलेलं. आपल्याला हे तरी नक्की सांगता येईल. या विश्वासाने आनंद हात वर करून ओरडला. पण सरांनी वर केलेल्या चिमुकल्या हाताकडे दुर्लक्ष केलं. मोरेकडे पाहत म्हणाले, ''तू सांग.'' आनंद पुन्हा कोमेजला. मघाशी येत नव्हतं म्हणून, आता येतंय म्हणून, की....?

''काय सर?'' मोरे भांबावून म्हणाला. मुलं हसू लागली आनंदसुध्दा. ''कुठं होत रे लक्ष? प्रदूषण म्हणजे काय?'' मोरेनी थोडी चुळबुळ करत, शब्दांची जुळवाजुळव करण्याचा प्रयत्न करत इकडे, तिकडे बघितले न् म्हणाला, ''सर, ते प्रदूषणामुळे हवा खराब होते. फुले, नाजूक झाडे मरून जातात. त्यांना भविष्यच नसतं. ते म्हणजे ऽ....''

''अरे बाबा, ते प्रदूषणामुळे होते पण प्रदूषण म्हणजे काय?'' सर पुढे बोलू लागले, ''हवेत $CO_2$ म्हणजे कार्बन-डाय ऑक्साईड वायू म्हणजे धूर वगैरे मिसळणे. कार्बनचे प्रमाण हवेत जास्त झाले की हवेत प्रदूषण होते. समजले?'' समजले न् समजलेशी शांतता पसरली. ''तिसरा विषय, वाहतूक आणि दळणवळण.'' ''बापरे.'' अस्फुट आवाज ते अवजड शब्द ऐकून मुलांच्यावर दडपण आलं. सरांनाही वाटलं ही पाचवीची मुलं किती सांगितलं, तरी थोडंच ह्यांच्या डोक्यात शिरणारेय? जाऊ दे. ते पुढे म्हणाले, ''चौथा विषय शैक्षणिक व तंत्रज्ञान.'' कसं सांगावं हे सरांनाही कळलं नाही. मुलांनाही काही न कळल्यामुळे ती नुसतीच गप्प बसली. सरांनी चष्मा काढला, रुमालाने पुसला व पुन्हा डोळ्यावर ठेवत सर्व वर्गावर नजर फिरविली आणि म्हणाले, ''ह्या विषयावर वस्तू तयार करून प्रदर्शनात मांडायच्या. ज्यांना भाग घ्यायचा आहे त्यांनी माझ्याकडे नावे द्यायची. शंका असतील तर विचारायच्या.'' सर उठले. पॅन्ट वर सरकावून ठाकठीक

केली. डस्टर उचलताना घरंगळलेला चष्मा पुन्हा नीट करत फळा पुसू लागले "कालचा गृहपाठ केला का रे सर्वांनी?" आता कुठे मुलं जरा मोकळी झाली. "हो ऽ सर." ज्यांचा झाला होता, ती मुलं एका दमात ओरडली. सरांनी पुढचा पाठ घ्यायला सुरुवात केली.

सगळे शिक्षक आपले आपले विषय शिकवून जात होते. आठवा तास व्हायच्या आधीच मुलं दप्तर घेऊन जाऊ लागली. दहा-बारा मुलं गेली. आनंद विचारात पडला, शाळा सुटायच्या आधीच ही मुलं का गेली? हुशार मुलांना कसं केव्हाही बाहेर जाता येतं, आत येता येतं. सर काही बोलत नाहीत. आपण आत आले की म्हणणार, "काय रे आनंद, उशीर करून आनंद मिळतो की काय तुला?" शू ऽ ला लागल्यावर विचारलं तरी गप्प बसवतात. तास संपल्यावर जा म्हणतात. त्या अनिरुध्दचा पहिला नंबर असतो. त्यांना मात्र केव्हाही जायची परवानगी. तास संपेपर्यंत कसा तरी धीर धरायचा. कधी एकदाचा तास संपून सर जाताहेत याचीच वाट बघायची. ते काय शिकवताहेत हेच कळत नाही मग. आपण का नाही हुशार? का नाही मिळत पहिला नंबर? आठव्या तासाचे सर येऊन दारात दुसऱ्या सरांशी बोलत होते. मुले मात्र उभी राहिली. निखिलने कोपराने ढुसणी देऊन आनंदला उठवले. आनंद भानावर आला. त्याने तेजसला विचारले, "तेजस, अनिरुध्द ती ऽ मुलं एवढ्या लौकर कशी काय रे गेली?" "हॅ ऽ तुला माहीत नाही होय? विज्ञान प्रदर्शनात वस्तू तयार करून ठेवणारेयत ते. मी उद्यापासून जाणारेय." "त्यांच्याबरोबर आज का नाही गेलास?" "सरांकडे नावं द्यायला लागतात आधी." तेवढ्यात आठव्या तासांचे सर गप्पा संपवून आत आले. 'गुड इव्हिनींग' म्हणत मुलं खाली बसली.

तिसऱ्या दिवशी मुलं सकाळपासूनच गायब. अर्धा वर्ग रिकामा. आहेत तेवढ्या मुलांना सर शुध्दलेखन काढा, गणित सोडवा, कविता, पाढे पाठ करा असं सांगून बाहेर पडायचे. छोट्या सुट्टीत तेजस हातातले सामान सांभाळीत निघाला. "तेजस, रे कुठं निघालास? हे काय?" आनंदने उत्सुकतेने विचारले, "काल आणलं सामान. विज्ञान-प्रदर्शनात वस्तू

ठेवणारेय - मी पण.'' तेजस फुशारून म्हणाला. ''हॉलमध्ये आहेत सगळे चल.'' तेजस आणि आनंद शाळेच्या भल्यामोठ्या हॉलमध्ये गेले. तिथे वरच्या वर्गातील मुले होती. त्यांना मार्गदर्शन करत सरही चक्क त्यांच्याशेजारी बसलेले. कार्डबोर्ड, फेव्हीकॉलचे डबे, कात्र्या, थर्माकोलचे तुकडे, रंग, ब्रश इत्यादी सामानांचा पसारा प्रत्येकाच्या समोर आजूबाजूला पडलेला. शेजारीच वस्तूंना आकार देण्यात मुलं तल्लीन झालेली. मधूनच हे कसं? ते कसं? विचारण्यामुळे, काहीतरी पडापडी, सांडलवंड होण्यामुळे कलकलाटही चाललेला. आनंदच्या वर्गातील अनिरुध्द, वसीम, रश्मी, अश्विनी आता आता तेजस पण तिथे होता. आनंद अनिरुध्दजवळ बसला. तो आणि वसीम 'दळणवळण आणि वाहतूक'. या विषयावर वस्तू करत होते. छोटी, छोटी घरे, रस्ते त्यावर गाड्या वगैरे रंगवून मांडले होते. ते सगळं पाहून आनंद हरखून गेला. ''आँ ऽ का ऽ य मस्तय ऽ'' अनिरुध्दच्या वस्तूंना हात लावणार तेवढ्यात अनिरुध्द भाव खात म्हणाला, ''ये हात लावू नकोस हं. मोडेल नाहीतर.'' आनंद हिरमुसला. तिथे काय चाललेय ते मग लांबूनच पाहू लागला. ''निखिल, आपण पण करायची का अशीच एखादी वस्तू?'' निखिलच्या खांद्यावर हात टाकत वर्गाकडे निघालेल्या आनंदने विचारले. ''आपल्याला येतंय व्हय ते ?'' निखिल हवेत गोलंदाजी करता करता म्हणाला. ''येईल की सोप्पं तर आहे?'' आनंद म्हणाला. वर्गात आला. त्याने दप्तरातील वही-पेन काढले. बाकावर बसून नकाशा काढला. चार रस्ते, थोडे सरळ, थोडे वेडेवाकडे. मध्ये चौकोन काढला. एका बाजूला कारखाना, दुसऱ्या बाजूला घरांची चित्रे काढली ''घे बघ.'' निखिलला समजावू लागला, ''पुठ्ठ्यावर असं रंगवायचं, थर्माकोलची घरं अन् कारखाना करायचा. ह्या बाजूला घरं नू ह्या बाजूला कारखाना चिटकवयाचा. आमच्या ताईला चांगली चित्रे काढता येतात. ती रंगवायला मदत करेल.'' सारे आकाश आपल्या कवेत आलंय अशा आविर्भावात आनंदने निखिलकडे पाहिले. निखिललाही त्याचा नकाशा पाहून बरंचसं काम सोप्पं वाटायला लागलं. ''खरंच की, सोप्पंय रे ऽ मी आईला विचारतो.'' निखिल म्हणाला. ''मी पण विचारतो.'' आनंदने अत्यानंदाने

वही दप्तरात ठेवली. "चारच दिवस राहिलेत. लवकर सगळं करायला पाहिजे." दोघांचे बोलणे चालले असतानाच शाळा सुटल्याची घंटा झाली. दोघंही पाठीवर दप्तर लादून निघाली. मनात विज्ञान-प्रदर्शनाचं ओझं होतं. डोळ्यात स्वप्न.

घरात आल्याबरोबर हातात वही घेऊन आईकडे आनंद धावला. "आई, बघ ना मी काय काढलंय." देवघरातल्या दिव्यात तेल, वात घालता घालता आई म्हणाली, "नंतर बघते, तू आधी हात, पाय, तोंड धू. कपडे बदल आणि काय रे वही काढता काढता डबा पण काढला असतास तर..." तिनं दिव्याची ज्योत काडी पेटवून लावली. आनंदच्या मनातली फुरफुरणारी ज्योत मात्र मंद झाली. मनाबरोबर वही मिटवून ठेवली. उत्साह आटू लागला. तो बाथरूममध्ये गेला. थंड पाणी चेहऱ्यावर मारले. मनातली धाकधूक वाढतच राहिली. आई परवानगी देईल की नाही? बाबा काय म्हणतील? ताई करेल मदत? प्रश्नांच्या सुया टोचू लागल्या कोवळ्या काळजाला. कपडे बदलले, डबा काढून ठेवला तरी त्याने आईला वही नाहीच दाखविली. उदासपणे गॅलरीत उभा राहिला. ऑफिसमधून येताना बाबा दिसले. हातात प्लॅस्टिकची पिशवी होती तरी आनंद धावत नाही गेला. बाबांनीच ब्रेडचा आणि बिस्किटाचा पुडा काढून टेबलावर ठेवला. ते बाथरूममध्ये गेले. चहा पिताना त्यांनी आनंदला बोलावले. मुकाट्याने आनंद शेजारी बसला. दूध-बिस्किटे खाऊ लागला. चहा पिऊन झाल्यावर बाबा टी. व्ही. समोर बसले. आनंद बाबांच्या जवळ येऊन बसला. एक हात खांद्याभोवती टाकत तर एका हातात रिमोटवरचे बटण दाबत बाबा म्हणाले, "खेळायला नाही गेलास?" बाबांचा स्पर्श आनंदला आश्वासक वाटला. या आधारावर तो म्हणाला, "बाबा, मी न् निखिल विज्ञान प्रदर्शनात भाग घेऊ?" टी.व्ही. वरची नजर न काढता बाबा म्हणाले, "घे ना." आनंदने दप्तरातील वही आणली. उघडून दाखवत म्हणाला, "हे बघा, 'दळणवळण आणि वाहतूक' मध्ये भाग घेणार." त्याने बाबांना निखिलसारखे सर्व समजावून सांगितले. बाबांना त्याचे भारी कौतुक वाटले. "अरे व्वा ऽ छानच कल्पना. उद्या आपण सामान आणू." आनंद हरखून गेला.

आनंद शाळेत गेल्यावर निखिलला म्हणाला, “मी न् बाबा आज संध्याकाळी सामान आणायला जाणारेय. तू येतोस?” “मग घरी कधी जाणार? तसं आईला पण सांगितलं नाही. तू आण.” “चालेल. रविवारी तू आमच्या घरी ये. मग बाबा, ताई मिळून आपण सगळं करू.” “रविवारी नाही रे जमायचं... आत्याकडे जायचंय बारशाला. मी वीस रुपये देतो. सामान तरी आण.” निखिल त्याच्याकडे वीस रुपयांची नोट देत म्हणाला. एवढे पैसे घ्यावेत का? “आपण आणू की सामान.” आनंदला त्याच्याकडून पैसे घेताना कसेतरीच वाटले “अरे यार, आण रे ऽ नंतर येईन मी. पैसे ठेव.” आनंदने वीस रुपये घेतले. त्याला वाटले, ‘बरं झालं आता बाबा, ‘खूप पैसे लागतील राहू दे’ असं तरी म्हणणार नाहीत?’ कंपासातील कागदाखाली त्याने ती नोट ठेवली.

आनंद शाळेतून घरी आला. डबा काढून कट्ट्यावर ठेवला. बाथरूममध्ये जाताना बेडरूममध्ये लक्ष गेले. बाबा डोक्यावर हात टाकून कॉटवर झोपलेले. पटकन हातपाय, तोंड धुवून कपडे बदलून आनंद हळूच बाबांच्या कुशीत शिरला. सामान आणण्यासाठीच बाबा माझ्या आधी आले. माझे बाबा. आनंद खुष झाला. बाबांनी त्याला जवळ घेतले. “चला की.” “राहू दे का आज? बरं वाटेना म्हणून तर लवकर आलोय. उद्या आणू या?”

“डोकं दुखतंय का?” आनंद डोक्यावर हात ठेवत काळजीने म्हणाला.

“बाम चोळतो.” आनंदने बामची बाटली शोधून आणली. बाबांच्या डोक्याला बाम चोळला. तेवढ्यात आईने चहा, आनंदसाठी दूध-बिस्किटे आणली. “काय चाललंय दोघांचच?” टिपॉयवर ट्रे ठेवला “काय, न्हाय ग, आनंदने डोक्याला बाम लावला बरं वाटायला लागलं बघ. भारी शहाणंय पिल्लू माझे !” आनंद दुधात बिस्किट बुडवून गोड हसला.

“ताई रे कशी आली नाही अजून?” आई काळजीने म्हणाली.

“बसली असेल मैत्रिणीबरोबर गप्पा मारीत.” आनंदने दूध संपवलं.

“आज भाजी काय करतेस?” चहा संपवून कपबशी ट्रेमध्ये ठेवत बाबांनी विचारले. “महिना अखेरीला उसळीशिवाय काय असणारेय?” बाबांना उसळ आवडत नाही पण इलाज नाही. ट्रे घेऊन आई उठली.

सामान आणायचे राहिलेच. उद्या निखिलला घेऊन जाऊ. लगेच सुरुवात करता येईल. आनंद चुळबुळत बसला. आता काय करायचे? "खेळायला जाऊ बाबा?" म्हणत आनंद उठला.

"जा. लवकर ये रे. गृहपाठ करायचा ना."

"दिलाच नाही. काही शिकवत पण नाहीत." आनंद पळाला.

रात्री गच्चीवर बाबा फेऱ्या मारीत होते. शेजारच्या घरातील फर्निचरचे काम चालले होते. लाकडाचे छोटे तुकडे, भुस्सा, प्लायवूडच्या फळ्या वगैरे इतस्तत: पडलेले. बाबांचा हात धरून आनंदही चालू लागला.

"बाबा, उद्या तरी नक्की आणू या का ? दोनच दिवस राहिलेत." आनंदने तक्रार केली. "पैसे रे किती लागतील? माझ्याकडे कमीच आहेत म्हणून विचारले."

"निखिलने दिलेत की वीस रुपये."

"तेवढ्याने काय होणारेय? काय काय आणायचंय म्हणालास?" "कार्डबोर्ड, थर्माकोल, फेव्हीकॉल, रंग ताईकडून घ्यायचे." "कार्डबोर्ड कशाला?" "त्यावरच तर घरे कारखाना मांडायचा थर्माकोलचा. रस्ते रंगवायचे. माझ्या खेळण्यातल्या गाड्या ठेवतो रस्त्यावर."

बाबांना कोपऱ्यात पडलेले प्लायवूड दिसले. बाबा म्हणाले, "आनंद, हे बघ काय?" "?" "टेबलाचे जुने प्लायवूड. काकांना विचारून घेऊ चालेल का? जरा साफ करू. अन् ह्या छोट्या तुकड्यांची घरं करू. रंगवून छान दिसतील. भुश्श्याच्या या वळकट्यांची झाडं करू. थर्माकोलचे पैसे वाचतील?" "चालेल की, विचारू का काकांना?"

"विचार जा."

आनंद उड्या मारत गेला. बाबांनी तिथलेच १०-१२ छोटे तुकडे, पट्ट्या, भुस्सा गोळा करून प्लायवूडवर ठेवले. जुने तुकडे सुतारच नेतो जळणासाठी. काका नाही कशाला म्हणतील. हर्षोत्फुल्लीत चेहऱ्याने आनंद परतला. आणखी तुकडे गोळा करीत म्हणाला, "काका घे म्हणाले." "हे बघ गोळा करून ठेवलंय. सकाळीच नेऊ. आता जेवून लवकर झोपू या. सकाळी सकाळी लवकर उठून बसू करत." बाबा म्हणाले. "बरं."

म्हणत आनंदने तुकडे खाली टाकले. "किती शहाणा आहे म्हणेल ते ऐकतो. कसलाच हट्ट करत नाही. नाहीतर आजकालची मुलं...." बाबा त्याच्या खांद्याभोवती हात टाकत जिना उतरू लागले. 'हप्ते भरता भरता मेटाकुटीला जीव येतोय. हट्ट तरी काय पुरवणार पोरांचा? ह्यावेळी वाढदिवसाला ड्रेससुध्दा नाही आणला."

बेडवर पडल्या पडल्या आनंदला डोळ्यासमोर विज्ञान-प्रदर्शन दिसू लागले. सगळ्यांच्याच सुंदर वस्तूंनी हॉल भरला होता. त्याच्या टेबलावर मुख्याध्यापक आले. त्यांनी आनंद-निखिलचे टेबल पाहिले. टाकाऊ वस्तूंपासून केलेली कलाकृती म्हणून खूप कौतुक केले. कसं केलं? कुणाची मदत, मार्गदर्शन घेतले? वगैरे चौकशी केली. वर्गशिक्षकांनी अभिनंदन केले. "आता आपलाच नंबर येईल बघ." निखिल फुशारून म्हणाला.

आनंदच्या मनातले कारंजे आकाशाला हात लावू पाहत होते. सुखस्वप्नात असतानाच बाबांनी हाक मारली. साखर झोपेचे पांघरूण बाजूला करत आनंद उत्साहाने उठला. गच्चीवर पळाला. प्लायवूड, लाकडाचे तुकडे गोळा करून गॅलरीत आणून टाकले. फेव्हीकॉल, रंग घरातच होते. दाखवताच, "आधी अंघोळ, नाष्टा, मग हे." बाबांनी सुनावताच आनंद अंघोळीला पळाला. कविता, गाणी म्हणत अंघोळ झाली. आईने पोह्याला टाकलेल्या फोडणीच्या खमंग वासाने भूक चाळवली. पटकन अंग पुसून कपडे घातले. देवाला नमस्कार केला.

"दे लवकर." म्हणत खुर्चीवर टेबलाशी बसला. ताईने पोह्याची बशी दिली. "आज बरी लवकर आटोपली अंघोळ, साहबजाद्यांची."

"आम्ही गम्मत करणारेय." बाबांच्याकडे बघत आनंद म्हणाला. भांडी घासत आईची काहीतरी बडबड चालली होती. आनंदचे तिकडे लक्षच नव्हतं. त्याने मिरचीही न काढता पोहे गिळले. अक्षरशः दूध संपवले. "चला" बाबांना म्हणत उठला, "सामान आणून ठेव. एवढा चहा संपवून आलोच."

हातोडा, खिळे, फेव्हीकॉल, रंगाच्या बाटल्या, ब्रश अन् लाकडाचे तुकडे सर्व सामान गोळा करून टी. व्ही. समोर हॉलमध्ये ठेवले. आई

बाथरूममध्ये कपडे धुत होती. ताई टी. व्ही. बघत बघत सूचना देत होती. बाबा ठोक-ठाक करण्यात गढून गेले. एवढ्यात धुण्याची बादली घेऊन आई आली. तिने बघितले, हॉलभर सगळा पसाराच. गॅलरीत जायलाही जागा नाही. आज रविवार. कपडेही जास्तच होते. नाष्ट्याचं काम वाढलेलं. अजून स्वैंपाक व्हायचाय. सकाळी उठल्या उठल्या घर झाडून-पुसून स्वच्छ केलेलं. रविवारी कोणी ना कोणी येतंच. पसारा तोही हॉलमध्येच पाहून आईने धाडकन बादली आपटली. तिचा रुद्रावतार बघून आनंद बाबांच्या बाजूला सरकला. "अगं, फरशी फुटेल" खिळा ठोकत बाबा म्हणाले. "आणि तुमच्या ह्या ठोकाठोकीनं धड राहील का? पहिला हा पसारा गोळा करून फेकून दे आनंद." दरवाजाकडे हात करून आई गरजली. 'आईचं नेहमी असंच असतं. काम जास्त पडलं की आरडाओरडा करते. शाळाच बरी.' ताई मनात म्हणाली.

"अगं, त्याच्या शाळेत प्रदर्शनासाठी वस्तू करायचीय." बाबा खिळा शोधू लागले.

"कसलं प्रदर्शन?"

"विज्ञान-प्रदर्शन पैसे न घालवता, टाकाऊ वस्तूंपासून तयार करतोय..."

"घरात ढीगभर कामं पडलीयेत. कुणाला एका कामाला हात लावायला नको. तुम्हाला रविवारी सुट्टी पण माझं मात्र काम वाढतंच. बरं हा असला पसारा घालून बसायचं. कोणी आलं तर?" बाबांकडे बघत म्हणाली, "त्यापेक्षा अभ्यास घ्या त्याचा. गणितात केवढे कमी मार्क पडलीयेत. तुम्ही पण त्याच्या नादाला लागलाय ते?" आनंदकडे पाहत, "उचल रे पसारा, नू दे फेकून."

"अगं, असू दे ना, करू आम्ही स्वच्छ." बाबा म्हणाले.

"काही नको त्यापेक्षा गणित इंग्रजीचा अभ्यास घ्या. तेवढीच टक्केवारी तरी वाढेल. अठरावा आलाय. तरी तुम्हाला काहीच वाटत नाही. पहिला नंबर राहिला पण गणित आत्तापासून पक्कं हवं तर दहावीत सोप्पं पडेल."

“एका दिवसाने काय होणारेय? तुझं म्हणजे फारच असतं.” बाबा वैतागले.

“असले उद्योग करून काय संशोधक होणारेय का?” तुकडे गोळा करता करता आईची बडबड सुरूच. ताईला म्हणाली, “ऊठ ग, कपडे टाक गॅलरीत वाळत. तुझं तर सारखं टी.व्ही. पुढं बसायचं. आनंद, यंदा गणितात पैकीच्या पैकी मार्क पडले पाहिजेत.” आनंदने बाबांच्याकडे आशेने पाहिले.

“पोराचा का मूड घालवतेस?”

“यंदा गणितात पैकीच्या पैकी मार्क पडून पंच्याऐंशीच्या पुढे टक्केवारी गेली तर पुढच्या वर्षी मी स्वत: मदत करेन. पण आता मुळीच नको.” तिने सगळे तुकडे गोळा करून डस्टबीनमध्ये टाकले. ह्या वटहुकूमापुढे बाबाही हतबल झाले. मुकाट्याने बाकीचे सामान उचलले. ताईने झाडून काढले. घर पुन्हा स्वच्छ, नीटनेटके झाले. विस्कटलेल्या मनाने आनंदने गणिताची व्यवसायमाला सोडवायला घेतली. त्याचे डोळे सारखे पाण्याने भरत होते. मनच:क्षूपुढे प्रदर्शनात मांडलेली ‘दळणवळण आणि वाहतुकी’ची प्रतिकृती तरळत होती. टपोऱ्या, स्वच्छ डोळ्याचं लालसर तळं झालं होतं.

# फुटवा

"उपेंद्रा, उठरे ऽ" कौसल्याची हाक ऐकताच उपेंद्राने तोंड उशीत खुपसून कान बंदच केले. 'रविवार आहे तरी कटकट. आई म्हणजे....'

"अरे, रविवारी तरी योगा करीत जावा." किती वेळा सांगायचे. मुलं मोठी झाली की असं का वागतात? ह्याला काय माहीत नाही का किमान आठवड्यातून एकदा तरी योगा करावा. बारीक-सारीक दुखू-खुपू होत नाही. सारखं सारखं सांगितल्यावर हे असं होतं कोडग्यासारखं. नववीत असताना हार्मोन्समध्ये वाढ होऊ लागलेली छाती वाढू लागली. तेव्हाही सूर्यनमस्कार घालायला सांगितलेले. ऐकायचा नाही.

आठवडाभर घातले की छाती कमी व्हायची. नंतर ढिलाच पडणार. मागं लागल्याशिवाय काही करत नाही. लहान का आहे? कौसल्या किचनमध्ये नाष्ट्याची तयारी करत होती. एका बाजूला चहा ठेवलेला. पुदिना धुवून निवडायचा. (किती वेळ गेला.) उकडून, कुस्करून ठेवलेल्या बटाट्यात पुदिन्याची वाटलेली पेस्ट ओतली. चहात सारखर, पूड टाकली. परातीत डाळीचं पीठ, कणीक तिखट, मीठ घालून पीठ मळण्याआधी चहात दूध ओतलं. 'हे पराठे म्हणजे वेळेखाऊ काम. पोहे, उपमा बरा.' जीममध्ये उपेंद्राला वजन वाढण्यासाठी पराठे, टोफू आणखी काय काय खायला सांगायचे. जीम लावल्यापासूनच चारीठाव स्वैपाक होऊ लागला. घरात पुरुष असल्यासारखा. नाहीतर दोघांसाठी किती म्हणून वरण-भात नाहीतर नुसतीच पोळीभाजी, कधी इडल्या फक्त, कधी फक्त मसालेभात. जीम लावली आणि दोन्ही वेळचे व्यवस्थित जेवण जेवून आपलंही हिमोग्लोबीन दहा-अकरावर राहू लागलं. जीमबरोबर टोफू वगैरे विसरले पण पराठे रविवारी तरी असतातच. लहानपणी आपली आई शिळ्या भाजीत पीठ मळून भाकरी थापायची. ते वेगळे थालीपीठ केवढ्या चवीने खायचो. कमी असेल तर सुमीशी भांडण सुद्धा व्हायचे. तात्याला आणि आप्पाला मात्र आई ते थालीपीठ खाऊ द्यायची नाही. म्हणून किती बरं वाटायचं. मग त्यांच्या बदामाच्या शिऱ्याकडे ढुंकूनही बघायचो नाही आम्ही.

पीठ मळून झाल्यावर तिनं चहा गाळला. उपेंद्राचा झाकून ठेवला. स्वतःचा कप घेऊन ती हॉलमध्ये येऊन बसली. तोंडाला कप लावता लावता बेडरूमकडे नजर टाकली. उपेंद्र लोळतच होता. "चहा घेतेय रे मी." असं म्हणत ती पेपर चाळू लागली. आता मात्र उपेंद्र उठलाच. चादर झटकून घडी घातली. बाथरूममध्ये पळाला.

उपेंद्र हळूच आईच्या हातातला पेपर ओढू लागला. "अरे, काय हे ऽ? तोंडातला घास काढून घेतल्यासारखं वाटतं असं केलं की. जा चहा गरम करून घे." "आतलं पान तरी दे ना." कौसल्याने सगळाच पेपर देत म्हटलं, "नाही तरी बायकांचं नशीब शिळ्याभोवती घुटमळतं." आणि उठून गेली. चहा गरम करून आणला. टिपॉयवर चहा ठेवून आत गेली.

पेपर चाळता चाळता पुरवणीतील पानावरच्या लेखावर त्याचे लक्ष गेले. एका झटक्यासरशी त्याने तो लेख वाचून काढला.

"अरे ऽ एवढे काय वाचतोयस? किती हाका मारायच्या?" उपेंद्र आईकडे पाहतच राहिला. 'असं काय वेड्यासारखं पाहतोय? चहा पुन्हा थंड झाला.' "आता हा चहा राहू दे. अंघोळ करून ये. नाष्ट्याबरोबर दुसरा करते." तिनं कपबशी उचलून त्याच्याकडे बघीतले, 'ह्याला झालंय तरी काय?' तिनं प्रश्नांकित चेहऱ्याने त्याच्यापुढे हात हलवला. "उपेंद्रा?" पण उपेंद्र पाहतच राहिला. कौसल्याचं ते मूर्तीमंत सौंदर्य. पन्नाशीकडे वय झुकलेले तरी उत्साह, जोम तरुणीला लाजवील असा. धार्मिक वाचन, दिवसभर काम. तिच्या टुडूंब डोळ्यांतील सात्विकता. डोक्यावरील सुख-दु:खाची छटा असलेले किंचित विरळ केस. लांबसडक शेपटा पाठीवर मिरवीत होते. भव्य कपाळ, तरतरीत पारशी टाइपचे नाक या सगळ्यावर कळस म्हणजे झळाळणारा केतकी वर्ण.

उपेंद्राला नेहमी वाटे आपली आईच सुंदर. जगात असं कुणीच नाही. लहानपणी म्हणायचा, "आई, तुझं पोट किती गोरं मऊ आहे." हाताने पोटावरची वळी कुस्करत म्हणायचा, "मी का नाही गोरा, तुझ्यासारखा?"

कौसल्या त्याचा चेहरा ओंजळीत घेऊन म्हणायची, "सोनूराजा, तू तुझ्या बाबांसारखा दिसतोस. तू ही तस्साच होशील उंच, तगडा, रुबाबदार." त्याची पापी घेऊन जवळ घेता घेता गंभीर व्हायची. उपेंद्राचे बाबा म्हणालेले आठवलं तिला, "आपल्याला झालेलं पहिलं मूल माझ्यासारखंच असणारेय."

"कसं काय?"

"माझी ही अशी नोकरी. उद्याचा दिवस बघतो की नाही..." कौसल्याने घाबरून त्याच्या मिशाळ ओठावर चारी बोटं टेकवली. कल्पनाही करवत नव्हती. तिला मिठीत घेत म्हणाले, "खुळाबाई, पहिलं मूल खुपसं बापासारखं असतं, कसं काय म्हणून विचार!" तिनं त्याच्याकडे बघितलं. "नवी नवलाई बायका नवऱ्यातच सर्वस्व विसर्जन करतात. स्वत:चं अस्तित्व विसरून जातात. मग होतं आमच्यासारखं काळं, बेदरं मूल."

ती त्यांना बिलगून राहिली. "मी नसलो तरी माझी प्रतिकृती..." "पुन्हा तेच." तिनं हलकासा गुद्दा त्याच्या छातीवर मारला. रडवेली झाली पण ती भीती तरळून जायचीच.

केवढा रुबाब होता त्यावेळी. फ्लाईंग लेफ्टनंटची बायको म्हणून मिरवताना. माझ्यासारख्या सौंदर्यवतीला हेच, असंच जगणं असायला हवं. सुमीच्या शाळामास्तरच्या संसाराची तुच्छता वाटायची. तीच आता डॉक्टर झालेल्या मुलांत-सुनांत दंग झालीय.

उपेंद्र आला त्यावेळी अख्खी पलटण जेवलेली. बाळाचा बाप तर बेहोष होऊन नुसता गात-नाचत होता. आनंद बाप झाल्याचा आणि आपलीच प्रतिकृती आलेल्याचाही. पहिल्यांदा बाळाला पाहताच म्हणालेले, "तुला मी मिळालो. आता काळजी नाही." त्यांना काळजी कशी नव्हती असं एकटीला टाकून जाण्याची? विमान अपघातात गेले तेव्हा कोसळलेल्या आभाळाखालचे सुन्न, बधीर मन-काढायला ऑफिसरपासून शिपायापर्यंत आले. दुःखात सामील असल्याचे सांगून गेले. पुढं पसरलेलं आयुष्याचं तळं आपल्यालाच पार करायचं होतं एकाकी. बाळाला सावरत, सांभाळत. तोकडी नाव एकटीला वल्हवायची होती. उघड्या-वाघड्या जगात, अथांग आभाळाखाली.

मिलट्रीत शिपायांच्या बायकांना शिकण्यासाठी अनेक वर्ग चालवतात. कधी मधी गाठी-भेटी घ्यायला गेल्यावर उत्सुकतेपोटी कौसल्याने विणकामाचे नमुने बरेच शिकून घेतलेले. ते अशाप्रकारे उपयोगी पडतील असे स्वप्नातही तिला वाटले नव्हते. खाद्यपदार्थांचे आणि विणकामाचे वर्ग चालविताना एकटेपणाचा विसर पडे. विद्यार्थीनींना कधी कौसल्या मदत करायची तर त्याही कौसल्याला अनेक प्रकारे मदत करायच्या. जगण्याच्या आधारामुळे कष्टातही आनंद वाटू लागला. उपेंद्राची वाढ, विकास होत होती. त्याला वाटे, 'आपली आजीही सुंदर होती. आपल्याला एखादी बहीण असती तर आदित्यच्या दिदीसारखी. आईसारखीच दिसली असती. सगळ्यांना बहीण असते मलाच का नाही? पण आई तरी आहे ना सुंदर ! कुणाचीच आई एवढी सुंदर नाही, फक्त आपलीच. रोहितची आई

तर काळीढूस्स आहे आणि रौनकच्या आईचे पुढे आलेले दात जे. सी. पी. सारखे दिसतात. उपेंद्राला हसू यायचे. "का रे एकटाच हसतोस?" आईने विचारल्यावर तो जे. सी. पी. ची गंमत सांगायचा. त्याला दटावत कौसल्या म्हणायची, "असं कुणाच्या दिसण्याला काय रे नावं ठेवतोस? देवाचं देणं यात माणसाचा काय पराक्रम?" पण लहानपणी तिलाही याचा अभिमान वाटायचाच की. नियतीपुढे सगळे सारखेच. आयुष्याच्या ऐरणीवर घाव सगळ्यांनाच बसतात. म्हणजे उपेंद्रालाही बसतील असे घाव? तिचं मन चरचरायचे. त्याला जवळ घेत म्हणायची, "आपलं मन निर्मळ ठेवावं. वाहत्या नदीसारखं. सगळ्यात सौंदर्य असतं ते बघायला शिकावं. प्रत्येक माणसातला, सजीव-निर्जीवातला वेगळेपणा पहायला, जाणून घ्यायला संवेदशील मन हवं रे." उपेंद्राला यातलं फारसं काही कळायचं नाही. कसं कळणार? तिला तरी कुठं कळत होतं ! वादळात वीज चमकून लख्ख दिसावं तसं तिला हे जग दिसल्यावर चांगल्या-वाईटाच्या तिच्या कल्पनाही पार बदलून गेल्या. अशा जाणिवा विकसित व्हायला दु:ख यावंच लागतं का?

उपेंद्र मोठा होत होता. हुशार, अभ्यासू. जीवशास्त्रात पी. एच. डी. करून कॉलेजात लेक्चरर म्हणून लागला. मुलगा कमवायला लागला की आजूबाजूंच्या नज़रा पडू लागतात. इकडची तिकडची स्थळं सुचविली जाऊ लागतात.

"अरे बाबा, तुझं लक्ष कुठेय? असा काय बघतोयस?"

"काही नाही गं. हा लेख वाचला." उपेंद्र भानावर आला. पेपर तिच्या हातात देत म्हणाला, "तूही वाच." अंघोळीला जाता जाता म्हणाला, "आधी चहा कर. आलं टाकून." उबदार पाण्याच्या फवाऱ्याबरोबर त्याच्या कल्पनेचेही असंख्य तुषार उडू लागले. उपेंद्र झपाटून गेला.

डॉ. विल्मट या शास्त्रज्ञाशी संपर्क साधायचे ठरवलेच उपेंद्राने. राडीबरोतील रोझलीन इन्स्टिट्यूटमध्ये त्याने पत्रव्यवहार सुरू केला. काही

दिवसांतच डॉ. विल्मटांनी योग्य प्रतिसाद व वैयक्तिक, सविस्तर माहिती मागविली. काही सूचना केल्या, अटी घातल्या. या सगळ्या अटी, अडथळे पार करण्याचे दुर्दम्य बळ उपेंद्रात आले होते.

ज्यांचे क्लोन (फुटवा, प्रतिकृती) करायचे ती व्यक्ती आणि त्या क्लोनचा गर्भ धारण करणारी स्त्री यांना विश्वासात घेणं थोडं अवघड होतं. अत्यंत गुप्तता पाळायला हवी. असा प्रयोग माणसांवर प्रथमतःच होत असल्यामुळे एक प्रयोग म्हणून त्यांची संस्था सगळा खर्च करणार होती. उपेंद्राला प्रयोगशाळेची व्यवस्था करावी लागणार होती. भारत सरकारची रितसर परवानगी हवीच. शास्त्रज्ञांची सोय भारतात करणं किंवा तयार झालेल्या दोन्ही व्यक्तींना डॉ. विल्मट यांच्यापर्यंत नेणं. यापैकी डॉ. विल्मट यांना भारतात आणणं सोयीचं होतं. त्यांनीही तशी तयारी दाखविली.

उपेंद्राच्या आनंदाला पारावर उरला नाही. 'खरंच हे शक्य आहे?' त्याने स्वतःलाच चिमटे काढून बघितले. केस ओढले. बाहेर जाऊन समोरच्या दुकानातली गिऱ्हाईकांची ये जा बघितली. रस्त्यावरची नेहमीची कुत्रीही दिसली. तारेवरील कावळ्यांची शाळाही नेहमीप्रमाणे भरलेली. खिडकीत आई भाताची शितं टाकते तिथं चिमण्यांचा चिवचिवाट ऐकला. म्हणजे हे अगदी खरं आहे. आपल्यासाठी डॉ. विल्मट भारतात येणार हे शंभर टक्के सत्य आहे.

क्लोन तर आईचे करायचंय पण गर्भ+धारण करणारी स्त्री कोण असावी? या प्रयोगात सहाय्य करणारी गुप्तता राखणारी अशी कोण? मराठीची लेक्चरर ती काटे पण तिचं लग्नच झालेलं नाही. केमिस्ट्रीची प्राध्यापक तिचं झालंय लग्न पण तिला मुलगाही आहे. छे विचारणं तरी शक्य आहे का? खरंच आपल्याला बहीण असती तर? काय करावं? अरे, आपणच लग्न केलं तर ? ही मस्त आयडिया आहे.

त्याला मित्रांशीही चर्चा करता येईना. ते फक्त टर उडवणार. आई तर उडवूनच लावील. तिला यातले आताच काही सांगायला नकोय. हूं लग्नासाठी मागे लागलीय पण आता विषय तरी कसा काढायचा? अवघड

काम झालं होतं पण आता सोप्या कामासाठी विचार करून करून त्याचं डोकं करवादलं. आता माघार नाही घ्यायची. आईला मनवायचं. बस्स !

"आई, बाकरवडी खूप दिवसात केली नाहीस." उपेंद्राने इडलीवर सांबार घेत म्हटलं. "का रे? इडली जमली नाही का?" स्वत:ला इडली-चटणी ताटलीत घेत ती टेबलाशी बसत म्हणाली. उपेंद्राने चटणीचा चमचा तोंडात घालत म्हटलं, "फँटास्टीक. तूं सांबार घे ना. हूं ऽ" तिच्यापुढे सांबारचे पातेलं सरकवत म्हणाला.

"नको रे जळजळतं सकाळी सकाळी ती आमटी खाल्ली की."

"हल्ली तू डॉक्टरांकडे जायचं टाळतेस. बघ ते डोळ्याखाली किती काळं झालंय ते."

"होऊ दे. तुझं तरी कुठं लक्ष असतं. सदा स्वत:च्याच नादात." गेली दोन-तीन महिने त्याचे चित्त थाऱ्यावर नसतं पण कशामुळे ह्याचीच तर कौसल्याला काळजी. कुठं जमवलं तर नसेल? "अगं, फार काम असतं हल्ली. कॉलेजमध्ये प्रोजेक्ट वगैरे करायचं. पुढच्या आठवड्यात प्रदर्शन आहे आयुर्वेदिक वनस्पतींचं. तू येशील?" उपेंद्राने आणखी इडली सांबार घेत म्हटले. जरा जास्त खाल्लं की आई खुष होती.

"तू नेलंस तर येईन की." कौसल्या सुखावली.

"लंच टाईमला सगळे जमतो. बाकरवडी कर ना तुझ्या हातच्या आवडतात सगळ्यांनाच." इडलीचे तुकडे करत उपेंद्र म्हणाला. "आता दिवसेंदिवस धावपळ होत नाही रे. बाकरवडीची तयारी करायलाच दोघी तरी लागतात. हल्ली बायकांना चायनीज, थाई पदार्थ शिकून हवेत. म्हणून म्हणतेय सून आण बाबा लवकर."

"अगं, मग तूच आण की सून."

"आँ?" कौसल्याचा तोंडाचा आ तसाच कितीतरी वेळ राहिला. लग्न विषय काढला रे काढला की उडवून लावणारा, बाकरवडीबद्दल नेहमी नाक मुरडणारा म्हणे, किती त्या वडीसाठी न् बाकरासाठी कष्ट घ्यावे लागतात. आज एकदम दांडीच उडविली की, आणि वर म्हणतोय, 'लवकरात लवकर जमव.' आईला त्या टांगत्या अवस्थेत नको जास्त

वेळ ठेवायला म्हणून हसतच उपेंद्र म्हणाला, "पण माझ्या अटी तिला मान्य कराव्या लागतील." खरकटी डिश उचलून स्वैपाकघरात बेसीनमध्ये ठेवली, हात धुतला आणि हॉलमध्ये गेला. "हा उपेंद्र असा का म्हणाला? ह्याच्या काय अशा अटी आहेत की अजून मलाही माहीत नाहीत. वाटायचं हा सगळं आपल्याशी बोलतो, ह्याच्या सगळ्या गोष्टी माहीत आहेत. खरंच उपेंद्रा मोठा झाला आता. स्वतंत्र पुरुष. सगळं माहीत असणं कसं शक्य आहे. वेडी माया.... त्याच्या अटी कळण्याचंही कारण नाही. मी तरी का अपेक्षा करावी. दोघांचं काय ठरेल ते ठरेल. लग्न करायला तयार तरी झाला.

कौसल्याने नातेवाईकांकडे कळविले. उत्साहाने फोटो मागविले. बाकरवडी करून ठेवली त्याच्या मित्र-मैत्रिणींसाठी. सून यायची म्हणून उत्तेजित झाली. एकेक स्वप्न तरळत होती. एकटीचं कसं होईल म्हणून तिला अचानक डिप्रेशनही यायचं.

फोटो आल्यावर उपेंद्राला दाखवत म्हणाली, "मामाने फोटो पाठवलेत. मुलीकडचे पण आलेत. आधी फोटो बघू, म्हणजे दाखवादाखवीत वेळ जाणार नाही." उपेंद्रासमोर फोटो ठेवत कौसल्या म्हणाली, "ही बी. ए. अजून नोकरी नाही. घरीच असते." उपेंद्राने फोटो बघितला. 'गाल फारच गोबरे आहेत बुवा.' त्याने फोटो बाजूला ठेवला. 'ही बी. एस्सी., कॉम्प्युटर करतेय." उपेंद्राने हाही फोटो बाजूला ठेवला. तिची ती नाकपुडीची गोलाई आणि शेंडा किती वेगळा वेगळा होता. नंतर जोडल्यासारखा त्या फिजिक्सच्या मॅडमसारखा खडूस स्वभाव असेल.

"ही एम. एस्सी. प्राध्यापिका आहे. बघ सुंदर आहे. डोळे तर बघ किती निरागस, बोलते आहेत. गोडच आहे." "बघू एवढी गोड आहे?" तिच्या हातातील फोटो काढून घेत उपेंद्र म्हणाला, "घरातील स्वीट डिश बंदच व्हायच्या की." फोटो निरखीत उपेंद्र म्हणाला, "तुला एवढी आवडलीय तर कर बोलणी." "तुला कशी वाटते? माझ्या आवडीचे काय?" "आई, माझ्यासाठी बघणारी मुलगी तूच जास्त चांगली नाही का बघणार ! सर्वकंष विचार करून, ऊँ?" कौसल्येला खूप बरं वाटलं, मुलाने

टाकलेला विश्वास बघून. नाहीतर आजकालची मुलं... कष्टाचं चीज झालं. त्याचा आई-बाप होताना कधी स्वत:च विचारही करवला नाही. पोरानं जाणीव ठेवली. उतारवयात काय हवं? भामिनीचा फोटो आईपुढे धरत उपेंद्र म्हणाला, ''आधी हे निरागस डोळे पाहू या का?''

''ठीकेय. मी तसं तिच्या घरच्यांना कळविते. तुला कधी वेळ आहे तेवढं सांग.''

''येत्या रविवारी आहे वेळ.''

कौसल्याचा मात्र ताण वाढला. घरात सल्ला देणारे वडीलधारे कोणी नाही. भावाला किंवा दिरांना बोलवावे तर ते येतीलच कशावरून? न येण्याचे हजार बहाणे. शिवाय हे मुलगी बघणं वगैरे आताच्या काळात तिला फारसं रुचतही नसे. पोरगा एखादी पोरगी घेऊन येईल न् म्हणेल, ''ही तुझी होणारी सून? पण तसं काहीच झालं नाही. तेच बरं असतं पण..... जाऊ दे. ते दोघं एकमेकांचा पाहतील, अटी ऐकतील, सांगतील. आपण कशाला जायला हवंय? पण उपेंद्र एकटाही जाणार नाही. आपल्यावेळी कुणा एकावरच जबाबदारी नसल्यामुळे टेन्शन नसे. उलट उत्साह, हुरहुर... आता मात्र सगळीच जबाबदारी कर्त्या म्हणून आपल्या शिरावर पडलीय. इतके दिवस दोघांचेच राज्य होतं. आता सून येणार... लग्नातले देव-देवकाचे तर काहीच लक्षात नाही. कधी विचारही केला नाही. कुठंही लग्नापुरतं जायचं. अक्षता टाकून यायचं एवढंच. लग्नाआधीचे, नंतरचे असंख्य सोपस्कार... बापरे ! त्यापेक्षा रजिस्टर केले तर? कौसल्या खूप गंभीर, प्रौढ दिसू लागली.

रविवारी ठरल्याप्रमाणे मायलेकरे मुलगी पहायला गेले. भामिनीचं घर मोठं होतं. फार भपका नव्हता. 'आपण उगाच ही ड्रायक्लीनची रेशमी जिजामाता नेसलोय. किती ऑड वाटतंय या वातावरणात. साधी कॉटनची नेसले असते तर बरं झालं असतं. मुलीची आई तर साधी रोज वापरायचीच नेसलीय. आपण मात्र... छे.. काय हे आपण बघायला आलोय की दाखवायला?' कौसल्याला दडपण आलं पण, 'असू दे गं.' म्हणणारे कोण नाही. हा उपेंद्र मात्र छान जीन्स आणि टीशर्टात आलाय. निघताना तरी

सांगावं की नाही? हा थोडाच बायकांचा कार्यक्रम आहे? कौसल्याची धडधड. चहापान करत करत सर्वांच्या ओळखी झाल्या. भामिनी खरंच गोड, निरागस अगदी फोटोतल्यापेक्षाही सुंदर दिसत होती. दोघांनाही आवडून गेली. भामिनीच्या घरातील कौसल्याच्या रूपसंपन्न भारदस्तपणाने भारावून गेले. दिपवणारे सौंदर्य लाभले तरी कणभरही गर्व नव्हता, आढ्यता नव्हती. तिच्या घरातील लोक मोकळे झाले. भामिनीच्या बाबांनी जेवणाचा आग्रह केला. मुलगी पसंत आहे. तिच्याशी बोलण्यासाठी उपेंद्रालाही वेळ हवाच होता. कौसल्याला आश्चर्य वाटलं त्याच्या या थांबण्याच्या निर्णयाने. भामिनीच्या घरातील वातावरण गजबजलेलं उपेंद्राला आवडले. पण इथे भामिनीशी बोलायचं कसं? तो विचारात पडला. कौसल्याही अवघडल्यास्थितीत बसून होती. पटकन घरी जावंस वाटू लागलं तिला. एवढ्यात भामिनीचे बाबा म्हणाले, उपेंद्रकडे पाहत, "तुम्हाला बाहेर फिरून यायचे असेल तर या." कौसल्याकडे वळून म्हणाले, "तुम्ही बसा किचनमध्ये."

छान वाटले उपेंद्राला. "चला जाऊ या." तो भामिनीकडे पाहत म्हणाला. भामिनी उठली. तिला वेगळेच विचार येत होते. आपल्याला पहायला आलाय अशा दृष्टीने पायापासून डोक्यापर्यंत न्याहळणं नाही कीं काय नाही. कसल्यातरी विचारात हरवल्यासारखा बेचैन वाटतो. की, सिगारेटची सवय असेल आणि, तिने त्याच्या ओठाकडे बघितले, काळपट जांभळे दिसतात का ते. "मावशी, मी पण येते. आईस्क्रीम पाहिजे मला." भाची नेहमीप्रमाणे पायात घोटाळली. "सायली, हे चॉकलेट घे." आजोबांनी हाक मारताच सायली पळाली. भामिनी मोकळी झाली. मुळाचे ओठ जांभळसर नव्हते. पण सावळेपणामुळे तितकं लक्षातही येत नव्हते. असली सवय तर सोडायला लावू. उगाच कॅन्सरबिन्सर व्हायचा. "कुठे जाऊ यात? बागेत की कॅफेमध्ये बसू यात." उपेंद्राने एका दमात विचारले. बागेत? छे ऽ, ओळखीचं कोणी भेटलं तर. "कॅफेत चालेल." भामिनी. कशी सुरुवात करावी या अस्वस्थ माणसाशी बोलायला. या विचारात असताना गप्प बसवेना म्हणून तिनेच विचारले, "घरी तुम्ही दोघेच असता का?"

"अं ? हो." उपेंद्र भानावर आला.

"तुमच्या आई किती सुंदर आहेत नै?"

"हो. म्हणून मला वाटतं आईसारखी सुंदर मुलगी असावी. आय. मीन.... आपल्याला लवकर आई व्हायला आवडेल?" या प्रश्नाने भामिनी गडबडली. हा काय प्रकार? आवडी-निवडी विचारायचे सोडून एकदम... काहीतरीच... अजून कशात काही नाही तिला चीडच आली. गालावर गुलाब फुलायचे पण नाकाचा शेंडा लाल होऊन गाल मात्र फुगले. उपेंद्राच्या लक्षात आपली चूक आली.

"सॉरी ऽ व्हेरी सॉरी ऽ" पाण्याचा ग्लास तोंडाला लावला. धीर गोळा करून म्हणाला, "तुला ऽ सॉरी ऽ तुम्हाला मी आवडलो का?"

आता मात्र भामिनीला हसू आलं, "नुसतं दिसणं आवडून काय उपयोग? आपले विचारही कळायला हवेत." थोडं गंभीर होत म्हणाली, "तुम्हाला सुखदु:खात सोबत करणारी पार्टनर हवीय की नुसतीच मुलांना जन्म देणारी....?"

"चुकलंच माझं ! खरं तर कसं सांगावं तेच कळत नाही." वैतागून उपेंद्र केसांतून बोटे फिरवू लागला. कपाळावर घाम जमा होऊ लागलेला. जरा शांत झाल्यावर म्हणाला, "हे बघ भामिनी, माझ्या आवडीनिवडी काही खास नाहीत, पण तुझ्या सांग. म्हणजे तुला काय वाटतं? आपल्या भावी नवऱ्याबद्दल? तुझ्या काय कल्पना आहेत?" उपेंद्र सहज अरे तुरेवर आला. त्यामुळे भामिनीलाही बरं वाटलं. आता पडलोच आहे पाण्यात तर हातपाय मारायलाच हवेत. "माझ्या आवडीनिवडी माझ्यापुरत्यात सीमित आहेत. त्या कुणालाही त्रासदायक होणार नाहीत याची काळजी घेईन मी. पण नवऱ्याबद्दल म्हणाल तर, त्याने बायकोच्या भावना समजावून घ्याव्यात. म्हणजे आपला नवरा चांगला मित्र असावा. दोघांचं ट्यूनींग जमावं. गप्पा मारता मारता वेळेचे भान राहवू नये." भामिनी बोलता बोलता गप्प बसली. तिला आठवलं, तिच्या मामेबहिणीचा नवरा इतका शामळू आहे की तिच्या हो ला हो करण्यात, तिची मर्जी राखण्यात, तिला सदा खुष ठेवण्यात

अगदी मनापासून तयार पण कसलेच वाद नाहीत. प्रश्न नाहीत. रुसणं-फुगणं नाही. कंटाळली ती वर्षभरात. रसमलाई रोजच शी ऽ

"बस एवढंच?" उपेंद्र म्हणाल्यावर भामिनी भानावर आली.

"हो. म्हणजे. साधं-सुधं माणसासारखं जगायचं. भांडायचं. पुन्हा चांगलं व्हायचं. असं..."

"आपल्या दोघांचं भांडण ठीक आहे, पण आईशी नको भांडण. तिच्याशी प्रेमाने, आदराने वागणारी सून हवी तिला, मला नाही आवडणार तिला दुखावलेलं."

फारच आदर्शवादी दिसतोय. "त्यांनी सुनेला दुखावलं तर चालेल." भामिनी चिडून म्हणाली.

"आईच्या स्वभावामुळे तशी वेळच येणार नाही."

"मुलांच्या बाबतीत आया वेगळ्या असतात. सुनेच्या बाबतीत वेगळ्या."

"माझी आई म्हणजे संत आहे. जशी दिसायला तसंच तिचं मनही पवित्र, निर्मळ म्हणून तर मला वाटतं तिच्यासारखीच मुलगी हवीय मला. तिचीच प्रतिकृती."

"पण आईसारखीच, ती ही मुलगीच होईल कशावरून?" आणि काळ्या आईवडिलांना गोरी मुलं होत नसतात. मुळात मी आई तरी होईल की नाही कुणास ठाऊक?"

"मेडिकल टेस्ट करू ना म्हणजे कळेलच की."

"फक्त माझीच? तुमची का नाही?" हा काय प्रकार अजून लग्न जमायचं कुठल्या कुठं आणि हा एकदम मुलांवरच? छे, सरळ नकार द्यावा झालं. ती मग उठलीच.

"एक मिनीट. प्लीज थोडं ऐका माझं. यात चुकीचं काय आहे? लग्नानंतर मूल नको आहे का?" उपेंद्र काकुळतीला आला.

"तसं नाही. पण लग्न काय तेवढ्यासाठीच करायचं?"

"काय हरकत आहे हे आधीच ठरवलं तर. नंतर कुढत बसण्यापेक्षा मी तर फक्त मेडिकल चाचणी करू यात म्हटलं. तुम्हाला चुकीचं का वाटतंय? तुमच्याच ओळखीच्या डॉक्टरकडे जाऊ या. पण तुला मान्य असेल तर."

भामिनीला हे सगळंच विचित्र वाटलं. ‘लग्नानंतरचा रोमान्स वगैरे राहिलं बाजूलाच हे काय... नकोच.’ तिनं बिलाचे निम्मे पैसे ठेवले आणि उठलीच. उपेंद्रने उठून तिचे हात धरले. ‘‘प्लीज.’’ एक सणसणीत ठेवून द्यावी वाटलं तिला पण त्याच्या डोळ्यातला व्याकुळपणा बघून ती खाली बसली. ‘‘हे बघ, आपण पाप वगैरे काही करत नाही. डॉक्टर तुझ्याच ओळखीचे असतील. तूर्त ही गोष्ट दोघांतच ठेवू या. मी बोलतो डॉक्टरांशी.’’

‘‘....’’

‘‘ठीकेय? जाऊ या. उद्या तुमच्या फॅमिली डॉक्टरांची अपॉइंटमेंट घे.’’

‘‘आई-बाबांना कळलं तर?’’

‘‘मी डॉक्टरांना तसं सांगतो. कुणालाही कळणार नाही उं ऽ?’’

‘‘ठीकंय चला. उशीर होतोय.’’ तिच्या बिलाचे पैसे तिच्याकडे देत उपेंद्र म्हणाला, ‘‘आपला स्वाभिमान आवडला.’’

‘‘हूं ऽ पण रिपोर्ट निगेटिव्ह आले तर... तर नकारच समजायचा का?’’

उपेंद्राला काय बोलावे तेच समजेना. तिच्याकडे न पाहताच बाहेर पडला. भामिनी मात्र समजली..

दोघे घरी आले. घरात जेवणाची गडबड चाललेली. गोडाचा, तिखट, फोडणीचा मिश्र सुवास दरवळत होता. उपेंद्र हॉलमध्ये पेपर वाचत बसला. भामिनी किचनमध्ये गेली. कौसल्याने सुरळीच्या वड्या केलेल्या. भामिनीची आई म्हणाली, ‘‘भाग्यवान आहेस हो? सासूबाई रोज एक नवीन पदार्थ करतील. तो नुसता खाण्यापेक्षा करायलाही शिक.’’

‘‘पण त्यांची सून झाले तर ना !’’ भामिनीची आई चमकली. तिने इकडे तिकडे बघितले. कौसल्या बाहेर गेलेली. तिला वाटल, मुलाची आई असून समंजसपणा किती. त्यांना भामिनी पसंत पडली म्हणून थांबले ना जेवायला. किती सहज मिसळून गेल्या. मुलाविषयी तर भरभरून बोलत होत्या. परकेपणाचा लवलेशही नव्हता. वाटलं ठरलंच सगळं. पण...

‘‘काय झालं भामिनी?’’

"काही नाही गं, अजून कशात काही नाही अन् तू आपली सासूवरून चिडवतेस म्हणून म्हटलं."

सर्व तपासण्या झाल्या. दोघांचेही रिपोर्ट पॉझिटिव्ह होते. उपेंद्राने तर आनंदातिशयाने भामिनीला मिठीच मारली. भामिनी आता दूर जाणार नव्हती. भामिनी पाहताक्षणीच त्याला आवडली होती. पहिल्या नजरेत डोळ्यातून हृदयात जाऊन बसली होती. कदाचित रिपोर्ट निगेटिव्ह आले तर क्लोन वगैरे कॅन्सल करावे, असेही विचार त्याच्या मनात आलेले. पण सगळं सुरळीत, मनासारखे झाले. आता मात्र हिला आपली कल्पना सांगायला काहीच हरकत नाही. आता हिनं नाही म्हणू नये म्हणजे मिळविली. त्याच कॅफेमध्ये भेटायचं ठरवलं दोघांनी.

"भामिनी, तुला माझ्या आईबद्दल काय वाटतं?"

पुन्हा आई. ह्या माणसाला दुसरं काही मत बित आहे की नाही पण बरंय वरचं कव्हरच बघण्यापेक्षा अंदर बात वर जास्त लक्ष देतोय. कदाचित सुंदर कव्हर रोज रोज बघून विटला असेल. ती म्हणाली, "जगात एकमेवद्वितीय असं स्वर्गीय सौंदर्य आहे. राणी पद्मिनी, मस्तानीच्या सौंदर्याचे नुसतेच वर्णन वाचले, ऐकले होते. आईंच्यामुळे त्याची कल्पना येते. तुम्ही मात्र असे कसे?"

"नाही पसंत?"

"तसं नव्हे पण त्या एवढ्या सुंदर आणि मी त्यांना, तुम्हाला काळी पसंत कशी पडली?"

"काळी नव्हे गव्हाळ, मधाळच म्हणते आई. तुझ्यातला गोडवा आवडलाय तिला."

"आणि तुम्हाला?"

"काय सांगूऽ तू खूप गोरी गोरी पान असतीस तर मला न्यूनगंड वाटला असता. आता आपल्या दोघांत कॉमन सारखेपणा आहे. त्यामुळे तुझ्या म्हणण्याप्रमाणे मैत्रीही सहज होईल. आणि माझ्या इच्छेप्रमाणे नवरेशाही गाजवता येईल."

“मी बरी गाजवून देईल.”

“भामिनी, लग्न रजिस्टरच करू यात?”

“छान आयडिया आहे. मलाही फार मिरवणं, गाजावाजा नाही आवडत. तरी वाटतं धार्मिक विधी वगैरे व्हावेत.”

“ते काय मनाचे समाधान नुसते. त्यासाठी आपण हा वाचवलेला पैसा अनाथाश्रम नाहीतर वृध्दाश्रम यांना दान करू या.”

“चालेल की. फारच घाई झालेली दिसतेय बाप होण्याची.”

“भामिनी, तुलाही वाटतं ना आईसारखी मुलगी व्हावी !”

“वाटतं हो ऽ खूप वाटतं. पण ते कसं शक्य आहे?”

“शक्य आहे म्हणूनच तर आधी तपासणी करून घेतली ना !”

“म्हणजे?”

“अगं, या एकविसाव्या शतकात अशक्य काय आहे?”

“कसं ते तरी सांगाल का? मी सतत आईचेच चिंतन करायचे? की आईकडेच सतत पाहत रहायचे?”

बराच वेळ झालेला वेटर बील देऊन जाताना उपेंद्र त्याला म्हणाला, “अजून एकेक कॉफी.” भामिनीकडे बघत म्हणाला, “चेष्टा नाही करत. तू क्लोनींगबद्दल वाचले ऐकले असशीलच?”

“हाँ ! कुणीतरी मेंढीचं क्लोन केल्याबद्दल ना? पण त्याचा इथे काय सबंध? अजून मानवी क्लोन कुणीही केले नाही.”

“आपण तो प्रयोग करायचाय.” उपेंद्र शांतपणे कॉफीचा कप तोंडाला लावीत म्हणाला.

“काय?” भामिनी आश्चर्याने ताडकन उडालीच.

“उठतेस कशाला? बस. कॉफी थंड होतेय.” भामिनी बसली. उपेंद्र बोलू लागला, “डॉ. विल्मटांशी माझा पत्रव्यवहार झालाय.”

“हे कोण विल्मट?”

“अगं, त्यांनीच मेंढीचं क्लोन केलं नाही का?”

“अं?” भामिनी नीट सावरून बसली.

“आपला हेतू निर्धोक असल्यामुळे सरकारनेही खळखळ न करता प्रयोगशाळेसहित परवानगी दिलीय.”

“आता फक्त गुप्तता पाळायला हवी. कुठंही हे बोलू नकोस.”

“का?”

“हे असंच असतं. कशाला कुणाला काय बोलायचं? हे बघ आईच्या अवयवातील पेशी काढून घेऊन त्याची टेस्टट्यूबमध्ये गर्भरूपात वाढ करायची. तयार झालेला गर्भ गर्भाशयात सोडायचा (टोचायचा) झालं ! भामिनी जगातील पहिली क्लोनिंग माता तू असशील.”

“पण हे डॉ. विल्मट सगळं कसं आणि का करणार आहेत?”

“मी रिक्वेस्ट केली म्हणून. आईबद्दल माझ्या प्रामाणिक भावना सांगितल्या त्यामुळे असेल किंवा असा पहिला प्रयोग करून घ्यायला अमेरिकेत फारसा प्रतिसाद मिळत नसेल. नाही तरी त्या लोकांना वरचं कव्हर महत्त्वाचं वाटतं. म्हणूनही असेल. ते इकडे काही दिवस येऊन राहतील. तुम्ही दोघींनी सहकार्य द्यायचं आहे.”

“आईंना माहितेय हे सगळं?”

“अजून नाही सांगितलं पण आईची काहीच हरकत नसेल.”

“तुम्ही पुरुष बायकांना असं गृहीत धरून कसं चालता? त्यांची संमती नको घ्यायला?”

“घेऊ या की, जबरदस्ती थोडीच करणारेय.”

“तुमचं काही सांगता येत नाही. मला नाही का पटवली.”

“पटवून दिलं ना? जबरदस्ती केली का? आधी तुझी संमती घेतल्याशिवाय आईला विचारून काय करू?”

“त्याआधी लग्न करू.”

“नाव नोंदवलंय परवाच. महिनाभर थांबावं लागतं. मला वाटतंय तोपर्यंत प्रयोग सुरू करायला काय हरकत आहे.”

“मुळीच नाही. आधी लग्न.”

कौसल्या स्वैपाक करत होती. "आई, आता सून आलीय. विश्रांती घे. तिला स्वैपाक येतो का ते तरी पाहू दे, चाखू दे."

"अरे, नवी आहे. आयुष्यभर तेच करायचेय. मी काही म्हातारी झालीय का विश्रांती घ्यायला?"

"आई." मनातल्या मनात तो शब्दाची जुळवाजुळव करताना गडबडू लागला. कसं बोलावं ते कळेना.

"काय हवंय रे? भूक लागली का? थांब थोडा वेळ. फुलके टाकते. गरम गरम जेवा... भामिनी कुठाय?"

"आई, मला...."

"आता काय हवंय तुला? एवढी नक्षत्रासारखी बायको मिळालीय. आता लवकरच मला नातू तुम्हीच द्या."

"तुला लवकर नात हवीय का? अगदी तुझ्यासारखीच !"

"लवकर तर हवीच रे. पण कशी असेल हे काय आपल्या हातात आहे का?" हातातले पातेले टेबलावर ठेवत कौसल्या म्हणाली. पातेल्यातल्या व्हेजबिर्याणीतली फोड उचलून तोंडात टाकत उपेंद्र म्हणाला, "छान झालीय भाजी."

"गाढवा, भाजी नाही ती व्हेजबिर्याणी आहे." "म्हणजे त्यातली व्हेज गं."

"हूं" सलाडची ताटली त्याच्यापुढे ठेवत कौसल्या म्हणाली, "अरे, भामिनीला बोलाव ना."

"आई, तुझ्याशीच बोलायचंय. सिक्रेट."

"आतापासूनच झालं सुरू भांडण."

"भांडणच ग. आई, मला तुझ्यासारखीच मुलगी हवीय."

"ते कसं शक्य होईल आता? तुम्ही दोघे असे."

"शक्य आहे म्हणून. हो तर म्हण."

"मग हे तिला सांग ना."

"तुझी परवानगी हवीय म्हणून मातोश्री." उपेंद्र तिच्या पायाशी बसत म्हणाला, "एवढं वरदान द्यावे मातोश्री."

त्याला उठवत कौसल्या म्हणाली, "गाढवा ऊठ. काय तरी मस्का मारतोयस."

"खरंच आई. अगदी तुझीच प्रतिकृती हवीय."

"थांब." कौसल्याने छोटा आरसा आणून त्यात बघत म्हटलं, "बाळ, बघ माझी प्रतिकृती. तुझ्याजवळच आहे. उचलून मात्र तुलाच घ्यावी लागेल." हसू लागली.

"जोक नाही हं तुझ्याचसारखे बाळ हवंय."

"होईल ना मग. एवढी काय घाई झालीय तुला."

"आई, ते डॉ. विल्मट आहेत ना अमेरिकेतले."

"बरं मग? मी काही कुठं नाव ऐकल्याचं आठवत नाही."

"आता काही न करता नुसती ऐक."

"फुलके टाकता टाकता ऐकायचं काम जमतं मला."

"प्लीज. बस ना इथे समोर."

आता आपल्याला काय ऐकावं लागेल या विचाराने कौसल्या बसली. कान देऊन ऐकू लागली. "हूं. बोल."

"डॉ. विल्मट शास्त्रज्ञ आहेत. त्यांनी मेंढीची प्रतिकृती तयार केली. तिच्या शरीरातील स्तनपेशी काढून एका पेशीपासून तसाच गर्भ तयार केला. दुसऱ्या मेंढीच्या गर्भात वाढवला. तो प्रयोग शंभर टक्के यशस्वी झालाय."

"असाच प्रयोग माणसावरही करणारेयत."

"कुणावर?" कौसल्याची उत्सुकता वाढली. पण हे कामं सोडून एवढं सिरीयसली का सांगतोय?

"तू आणि भामिनी."

"काय तरीच ! तो विल्मट इथे कशाला कडमडायला येईल ! जगात दुसरी माणसं नाहीत का? तिथेच ?"

"अगं, माझी इच्छा आहे म्हणून. मी तसं विचारलंय त्यांना आणि ते तयार झालेयेत. तू हो म्हणालीस की ते भारतात येऊन प्रयोग करणारेय. फक्त तू हो म्हण."

"माझ्या हो चं इथं काय काम?"

"तू हो म्हणालीस तरच तुझं क्लोन करता येईल ना !"

"कशाला रे पण... उगाच त्या दवाखान्याच्या कटकटी नको वाटतात."

"आई, तुला नाही वाटत, तुझ्याचसारखी तुझी प्रतिकृती आपल्या घरात यावी. तुझ्या अंगाखांद्यावर खेळावी. अगं, तुला काहीही त्रास होणार नाही."

"त्रास न होता कसं होईल?"

"तुझ्या कुठल्याही अवयवातील पेशी, अगदी छोटासा तुकडाच म्हण ना काढून घेताना होईल तेवढाच त्रास. पाच मिनिटांचं काम. प्लीज आई, ते सगळे येण्याची तयारी करताहेत. तू हो म्हणालीस असं सांगितलंय. नाही म्हणालीस तर...."

"बरं, बरं आलं लक्षात. तुला आईची एवढी गॅरंटी आहे. तुझ्यासाठी म्हणून तयार आहे. नाहीतर उगाच काहीही फॅड घेऊन बसतोस. वेड्यासारखं."

"हे केलं नाही तर मात्र वेड लागेल."

"हूं. चालेल. आता उठू? बोलव भामिनीला. जेवायला वाढते."

"थँक्यू ऽ आई ऽ" उपेंद्राने उचलून आईला भामिनीपुढे उभे केले. "दिली की नाही आईनं परवानगी. तुला काय वाटले?"

"चल, येडपटच आहे." त्या हलकीशी पाठीवर चापट मारत भामिनीकडे बघत म्हणाली,

"अगं, या पोराने कधी कशाचा हट्ट केला नाही. एवढा मोठा झाल्यावर असला विचित्र हट्ट धरला नाही कसं म्हणावं. आई मुलासाठी काळीजसुध्दा काढून देते. मग थोड्याशा पेशी का नाही देणार?" भरलेले डोळे न दाखवता कौसल्या किचनमध्ये गेली.

उपेंद्राला उसंत नव्हती. त्या येणाऱ्या लोकांची सोय करणे, तरीही कुणाला फारसं काही कळू न देणं. लग्नकार्य टाळलं पण त्यापेक्षाही ह्या कामात

गडबड, धावपळ आणि सगळं एकट्यानेच बघायचं. वैतागून जायचा पण आता इलाज नव्हता.

प्रयोग करून डॉ. विल्मट परतले. आता कुठे त्याला भामिनीकडे लक्ष द्यायला वेळ मिळाला. भामिनी दोन-तीन महिन्यात अंगाने भरू लागली. गर्भाचे तेज तिच्या मुखावर विलसू लागले. कौसल्या तर तिची अतिशय काळजी घेऊ लागली. रोज देवाला प्रार्थना करायची, "देवा, सगळं नीट होऊ दे रे. ध्यानीमनीही नव्हते असं फळ मिळतंय. खूप सोसले. त्याचीच सवय लागलेली. माझ्या आयुष्यात वेगळं काही होईल याचीच आशा विझलेली. ह्यांनी स्वत:ची कॉपी मागे ठेवली नू गेले. मला संधी नाही रे मिळाली माझी कॉपी करण्याची. वाटायचं एवढं रूपसौंदर्य दिलं तरी कशासाठी? दु:खाचे पहाड झेलून फक्त मातीत मिसळण्यासाठी कशाला केलास एवढा आटापिटा? आता कळतंय तुझ्या घरी देर आहे, अंधेर नही. सुख पेलण्याचंही बळ दे रे."

उपेंद्राची मात्र धावपळ चाललेली. वेगवेगळ्या तपासण्या, सोनोग्राफी करून, डॉ. विल्मटांकडे पाठवावी लागत. बारीक सारीक बदल, तक्रारींची फोनवरून चर्चा, जसजशी तारीख जवळ येऊ लागली तसतसं टेन्शन वाढू लागलं. उत्सुकता आणि बेचैनीमुळं तो अस्वस्थ होऊ लागला. या सगळ्या ताणामुळं आताशी त्याला नीट झोपही लागत नव्हती. केव्हातरी पहाटे डोळा लागायचा. त्यातही स्वप्नांचा भडीमार. एकदा पहाटे डोळा लागला....

...भामिनी हॉस्पिटलमध्ये कॉटवर झोपलेली. शेजारीच कन्यारत्न झळाळत होतं. तेवढ्यात आई काहीतरी घेऊन आली. जागरणाने तीही मरगळलेली. तरी आनंद, उत्साह. बाळाला उचलून घेत ती म्हणाली, "पूर्वी देवांनी सागर घुसळून त्यातून चौदा रत्ने काढली होती. तसेच हे शास्त्रज्ञ ! विज्ञानरूपी सागर घुसळून खरोखरच अमृतही काढतील."

"अमृत ! व्वा ! अगं, हे अमृतच आहे. तुझीच प्रतिकृती तुझ्या पेशींची वाढ-विकास म्हणजे तूच ना. अमरच नाही का झालीस."

आपणच आपल्याला जोजवितोय. कौसल्या अंगभर शहारली. तिच्या डोळ्यात पाणी तरातरलं. "अमृत !" बाळाला गालाजवळ नेत म्हणाली, "हिचे नाव अमृताच ठेवू या."

"अमृता ऽ अमृता" उपेंद्राने कौसल्याच्या हातातून बाळाला घेत म्हणाला.

"अहो, काय झाले? कुणाला हाका मारताहात?" भामिनीनं हलवून त्याला जागं केलं. उपेंद्र जागा झाला. अवघडलेली भामिनी त्याच्याजवळ झोपलेली. त्याला जागं करण्यासाठी खांदा, हात हलवत होती.

"अगं स्वप्न पडलं."

"हल्ली तुम्हाला जागेपणी, झोपेत सदान् कदा स्वप्नेच पडतात. किती विचार करता? चेहरा बघा किती ओढल्यासारखा झालाय. लग्नाआधी हे ध्यान बघितलं असतं तर स्पष्ट नकार दिला असता." तिनं त्याला हलके थोपटत म्हणाली, "झोपा. अजून सहा नाहीत वाजले." 'तेव्हा ऐकल्यावर गंमत वाटली पण हे काय असले नवे नवेलीचे दिवस. दवाखाना, प्रयोग, गोळ्या, इंजेक्शने, शी. आईला जन्माला घालण्यासाठी आपण ह्यांना हवे होतो. सुखाचं आयुष्य, रोमॅन्टीक क्षण उपभोगायचे सोडून आपणही यात अडकलो. यांची आई साधी सर्वसामान्य असती तर बरं झालं असतं. पण चिडूनही उपयोग नाही. आता शांत ठेवायला पाहिजे मन. नाहीतर बाळाच्या सौंदर्यावर परिणाम व्हायचा. बापरे, उपेंद्र पुन्हा प्रयोग करायला भाग पाडील? खरंच कसं असेल बाळ?' बाळाच्या सुखस्वप्नात भामिनी झोपी गेली.

एके दिवशी परदेशी तिकिटे लावलेला लिफाफा कौसल्याने उपेंद्राच्या हातात दिला. काय बरं असेल? विचार करत उपेंद्राने लिफाफा उघडून वाचू लागला.

डियर उपेंद्र...

आपले रिपोर्ट वेळोवेळी मिळत आहेत. धन्यवाद. आता नवीन प्रयोगाने हे सिध्द झाले आहे की, ज्या व्यक्तीच्या पेशी घेतलेल्या असतील, त्या

व्यक्तीच्या वयाच्याच पेशी फुटव्याला वाढवतात. त्यामुळे फुटवा (क्लोन) लहान जरी असले तरी पेशीच्या मालकाचेच त्याचे वय असते.

उदा. : डॉली (मेंढीचे क्लोन) ही जरी दोन वर्षाची असली तरी ती, जिच्याकडून पेशी घेतल्या त्या मेंढीएवढेच तिचे वय आहे. म्हणजे डॉली सहा वर्षाची आहे. आता माणसाच्या क्लोनिंगचे काय निष्कर्ष लागतील यांचा अंदाज येतो तरी आपण मातेची काळजी घेणे.

कळावे,

आ.

Vilmat

पत्र वाचून उपेंद्र सुन्न झाला. आई आणि भामिनी काय म्हणताहेत इकडेही त्याचे लक्ष नव्हते.

# पोस्टाच्या पेटीचं कुलूप

वैशाखाचं रणरणतं ऊन. लख्ख, दिपवणारी दुपार. सावल्या पायाशी घोटाळलेल्या. सूर्यदेवाने रौद्ररूप धारण करून धरणीमायला भाजून काढायचा बेतच रचला होता. पण नुकतीच आपलं लेकरू, शेतकरी राजाला पीकपाणी देऊन, दमून-भागून समाधानानं भूमाता विसावली होती. तृप्त झालेल्या धरणीला वैशाख वणव्याचं काहीच वाटत नव्हतं. धान्यानं घरं भरली होती. रानात फारसं काही काम नव्हतं. नाहीतरी असल्या उन्हात काम तरी काय होणार? सर्वा वेचणं, काशा गोळा करणं, उसाचं बुडकं वेचणं अशी कामं नेटानं केली तरी दुपारचं ऊन खोपटात

नाहीतर झाडाखाली बसायला लावायचं. पावसाळ्यासारखी कामाची झुंबड नव्हती. वरून घामाच्या धारा वाहत होत्या तर मनातून समाधानाचे झरे झुळझुळत होते. औंदा पाऊसपाणी वेळेवर आणि पुरेसं झाल्यामुळे पदरात पीक बरं पडलं होतं. शेतात राबल्याचं चीज झालं होतं.

सरपंच जेवून झोपाळ्यावर दात कोरत लोडाला टेकले होते. वरून हुकूम आलाय. आता आरक्षणामुळं सरपंचपदी बाईला बसवावं लागणार. आपल्याला खुर्ची रिकामी करावी लागणार. याचाच सरपंच रामराव चव्हाण विचार करीत होते. आज त्यांचं जेवणावरही लक्ष नव्हतं. डोक्यात विचार एकच, 'कुठल्या बाईला सरपंचपदी बसवायचं?' घराघरात डोकावून बायकांना मनातल्या मनात बघितलं. कुणाचा नवरा कसा? पोरं किती? केवढी? माणसं कशी? आपल्याला किती किंमत देतात या सगळ्याचा हिशोब चालला होता. एखादी बाई मनात भरायची (सरपंच पदावर शोभण्यासारखी) तर तिचा खत्रुड सासरा तिच्यामागं दिसायचा. दुसरी कुठली शिक्षिका दिसली तर ती आपल्याला काय किंमत न देणारी असायची. एखाद्या घरातली बाई हुशार, माणसं चांगली पोरांचं लटांबर तिच्या अंगाखांद्यावर दिसायचं. नेमकं कुणाला विचारावं अन् सरपंच करावं तेच कळेनासं झालेलं. सरपंच कोरडीच भाकरी कुस्करत होते.

"आवो, बक्कळ कालवण केलंय की, चांगलं न्हाय का झालं?" सरपंचबाईंनी असं विचारल्यावर ते भानावर आले. दचकून म्हणाले, "आँ?"

"कोरडीच भाकरी कशापाय कुस्करताय? दूध वाढू का?"

"कालवणच वाढ." नादातच सरपंच म्हणाले.

"तब्येत बरी हाय न्हवं?"

"अं?.... बरी हाय की." असं म्हणत उठलेच. हिची पिरपिर संपायची न्हाय. त्यांनी हात धुवून, पाणी प्यायले. झोपाळ्यावर झुलत बसले. विचारांचे हेलकावे खात. उकाडा मी म्हणत होता. सरपंचांनी पंख्याचं बटण दाबलं. तोही हलला नाही. लाईट आल्यावर तेवढ्यापुरतं फर्रर्र वाजायचा, पुन्हा

ढिम्म. ही लाईट किती वेळ टिकेल ते वीजमहामंडळाला तरी सांगता येईल का नाही कुणास ठाऊक? तर हे असं आहे. पंखा असून नसल्यासारखा. आपलं हातात पुठ्ठा घेऊन बसलेलं बरं. आता पहिल्यासारखे कुठं दिवस राहिलेत? एखादा तरी कार्यकर्ता (चमचा) असायचा. बारीक सारीक कामं करायला. आता पैसे देऊन गडी राहत नाहीत. रांडिच्ये सगळे वाळूचे ट्रक भरायला पळतात. दांडगा रोजगार मिळतूया म्हणल्यावर वाड्यावर कशाला पडतील. नदीचं पाणी आटलंय तवर वाळूची सुगी. आपले हात भले न् आपण भले. दोष फक्त वैशाखाचाच नाही तर एकूण परिस्थितीच गरम गरम होत चाललीय. सकाळीच हुकूम आलाय बाईला सरपंच करायचा मग डोकं बी तापू लागलंय. 'आता बाईनं चावडीवर काम केल्यावर बाप्यांनी चुलीपुढं बसावं की काय ! पण वरनंच आर्डर आली म्हणल्यावर काय म्हणायचं न् काय बोलायचं. तोंडात मारल्यागत बसावं लागतंय.' अशा विचारांच्या भोवऱ्यात गरगरत सरपंचांना डुलकी लागली. लोडाला रेलले सरपंच, जरासे पाय पसरून घोरू लागले.

तेवढ्यात दिंडी दरवाजाचा कर्र ऽ कर्र ऽ ऽ आवाज आला. किती दिवस झाले, तेल पाणी दिल्यालं दरवाजाला. हळूच उघडला तरी आवाज जास्तच येतोय. दरवाजातून कोण येतंय ते माजघरातून दिसायचं. त्यामुळे भर दिवसा कड्या कोयंडे घालून बसायची अजून वेळ आली नव्हती. जरासा दरवाजा लोटला की झालं. सरपंचाचं मन आधीच किरकिरत होतं. त्यात दरवाजाची किरकिर येऊन आदळली. अन् वामकुक्षी कुठल्या कुठे पळाली. सरपंचांनी डोळे उघडले. दरवाजात शांताबाई... त्यांच्या शेतातील वाटेकरी, सदुआबाच्या धर्मपत्नी. उंचपुऱ्या, तरतरीत नाक-डोळे, सावळा रंग. शेतात कष्ट करून लोखंडाच्या कांबीसारखे झालेले हात. चेहऱ्यावर निरोगीपणाचे तेज. मुलामुलींची लग्नं झाल्यामुळे बाई तशी बिनघोरी होती. सरपंचीणबाईंनी कुठल्याही कामाला हाक मारली तरी कधी नाही म्हणणार नाही. सरपंचाच्या वाड्यावर जायचं म्हणल्यावर माग नातवंडं-बितवंडं आणायची नाही. शांतपणाने यायची. अदबीनं वागायची. वाड्यात उन्हाळी कामं चालली होती. तूर, हरभऱ्याच्या डाळी करायच्या, निवडायच्या.

पापड लाटायचे. सांडग्याचं दळायचं. कुरवड्याचा चीक काढायचा. शेवयाला सोजी काढायची. हजार कामं. शांताबाई सगळ्या कामाला हजर. काम नेटकं. उरक चांगला. सरपंचांची झोप चांगलीच उडाली. अंतर्चक्षू खाडकन उघडले. शांताबाईकडे ते निरखून बघायला लागले. शांताबाईला वाटले, 'सरपंचांची झोपमोड झाल्यामुळं रागावलं की काय?' अपराधी भावनेने डोक्यावरचा पदर नीट करत डाव्या हातात टोक घट्ट धरत त्या अंग चोरत तरातरा आत निघून गेल्या. सरपंचांच्या मनातून काही जात नव्हत्या. 'हूं ऽ' सरपंच जमिनीवर डावा पाय रेलून त्यांच्याच नकळत झोपाळा हलवत होते. 'सदुआबा तसा हाय ऐकण्यातला. काहीही सांगितलं तरी ऐकायची, वेळ प्रसंगी करायची तयारी असते गड्याची. पण ही गोष्ट कानातून गळी कशी उतरवायची?' सरपंच तर ठरली पण हा नवाच घोर सुरू झाला. सदुआबाला कसं कसं तयार करायचं याचे डावपेच आखत सरपंच झोपाळ्यावर झुलत राहिले. झोपाळ्याला लावलेल्या घंट्यांच्या किणकिणाटाने सरपंचीणबाईंनी डोकावले. सरपंच उठलेले पाहून पाण्याचा तांब्या-भांडं आणून देत विचारलं, "लवकर उठलात? चहा करू का?" बाईंना काळजी वाटू लागली. घरातली कामं उरकायची का ह्यांच्या मनधरण्या करायच्या. काय विचारलं तर सांगायचं नाव नाही. झालंय तरी काय ह्यांना? सरपंचांनी त्यांच्याकडे न बघता हाताने जा असे खुणावत म्हणाले, "नगं, तुमचं काम चालू द्या." खरं तर त्यांना, 'मला विचार करु द्या शांतपणानं. सारखा ताप देऊ नका' असं म्हणायचं होतं. वैतागत बाई आत गेल्या. 'सरपंचपदाची मुदत संपत आलीय ना !'

'शांताबाई ऐकेल? ऐकेल शांताबाई ! नवऱ्याच्या ऐकण्याबाहेर ती कशाला जातीय; अन् सदुआबा आपल्या ऐकण्याबाहेर... पण काय म्हणेल, सदुआबा?' 'तुमच्या घरातल्या बाईला करा उभं.' असं म्हणाला तर, तर त्याला काय उत्तर द्यायचे? विचारून बघायला काय हरकत आहे ? आडला नारायण...., गड्याची कॉलर पकडता येईल, गचांडी धरता येईल, पण बाईमाणसाचे पायच धरायला पाहिजेत. गोड बोलायची पंचाईत अगदी महापंचाईत. तिखट बोलायची सोय नाही. धरलं तर चावतं.... त्यासारखी

गत. आता ह्या बाईला सरपंच केलं तर चावडीवर काय दिवे पाजळणारेय. घरात चांगली सुगरण हाय... पण... कायदाच निघालाय तर काय करणार? बदलायचं, बदलायचं म्हणून किती बदलायचं? पाटीलकी गेली, नुसतं नाव मागं ठेवून. आता सरपंचपदावर देखील फक्त वर्षभरच राहता येतं. पण सगळे सरपंच कसे मान राखायचे. अजून चावडीवर दरारा होता. चार-पाच वर्षांनी सरपंच होता येतच होतं. पण आता हे नवीन आरक्षणाचा कायदा निघालाय कसा कारभार हाकायचा? राजकारण करता करता रंगपंचमी खेळायची वेळ आली. कुठली बाई पोराबाळांच्या राड्या-रगाड्यातून चावडीवर बसणारेय? कायदा आंधळा आहे हे बाकी खरं. नाहीतर गाढवातला न् घोड्यातला फरक कळला असता की (कायद्याला!). बायकांची चावडीवर बसायचं न् बाप्यांनी बिडी ऐवजी चूल फुंकत बसायचं दिवस लांब राहिलं नाहीत. आलीया भोगासी असावे सादर. चार दिवस बाप्याचे कसले काय सगळे गेलेले दिवस बाप्याचेच होते. आता चार दिवस बाईला मिळू देत. नाही पटत मनाला पण इलाज नाही. आपलं पद जातंय, ह्या जागी शांताबाई सारखी (आपल्या गटातली) बाई आली तर, रिमोटवरनं कारभार करायला आपण मोकळेच की. सदुआबा ऐकण्यातला. पण त्याला पटवता यायला पाहिजे. तरच रिमोट आपल्या हातात राहील. सत्ता, पद तर जाणारच आहे. कमीत कमी रिमोट तरी... न्हायतर नांगर धरावा लागेल.' आतल्या बाजूला गप्पा रंगात आल्या होत्या. नकळत सरपंच ऐकू लागले. भावी सरपंच काय बोलतात, कसे बोलतात, त्यांचा कल कुणीकडे आहे? हे कळायलाच पाहिजे की. आवाज शांताबाईचाच आहे. तीच तर गावभरच्या गोष्टी सांगत असते. अन् सरपंचीणबाई नुसतं ऐकत असतात.

"आवं, त्या सोनारणीची सून लय कलागती लावती. तिच्याजवळ जरा तोंड उघडलं की तिखटमीठ लावून गावभर करणार. मी तर तिच्या तोंडालाच लागत न्हाय. पण आमच्या सुनंला चांगलंच गुंगवलं की. मग मी बी सोडलं न्हाय. एकदाच लेकादेखत सांगितलं, सोनारीण अशी, अशी हाय. तुला काय लागलं, सवरलं तर मला सांगायचं. मी काय म्हणली तर,

तुझा सासरा हाय, नवरा हाय. पण बाहेर कुणाजवळ गाऱ्हाणं गात न्हाय बसायचं. तवा ल्योक पण उखडलाच तिच्यावर. म्हणाला की, पुन्हा सोनारणीबरोबर बोललीस तर लाथच घालीन कंबारड्यात. मी म्हनलं, बाबा लाथ-बीथ काय नको घालूस. समजून सांग तिला तरी काय म्हाईत. लय अघळपघळ गोष्टी करू नगंस. जेवढ्यास तेवढं ठेव. तवा बघा सून शानी झाली. आन् आता हाताच्या अंतरानं रहाती. न्हायतर या सोनारणीनं चार महिन्यात आमचं घर फोडलं असतं.''

''शांताबाई, तुला बरी चांगली बुध्दी सुचली ग.'' सरपंचीणबाईंचा आवाज.

''मग काय करता जगदुनयेचं बघतीया की. काट्याचा नायटा करायचा. आपलीच पोरंबाळं परकी करायची, दुसऱ्याचं ऐकून. येळंला आपलंच माणूस व्हतं. बाहेरची नुसती मजा बघत्याती.''

सरपंचांनी कान टवकारलं. त्यांना वाटले, 'साधी भोळी दिसणारी शांताबाई बरीच शाणी-सुरती निघाली की. हिलाच सरपंच करायला हवं. ठरलं तर. आज शनवार उमेदवारीचा अर्ज लिहायाला लावून लगेच पोस्टात टाकायला सांगतो सदुआबाला. सगळ्याच्या आदी आपला अर्ज गेला पाहिजे.''

उन्हं उतरू लागलेली. अंगणात सावली आलेली. जिवाला हलकं वाटू लागलं. तेवढ्यात चहा आला.

शांताबाई उठली. तिनं पसारा आवरला. केरसुणीनं झाडून काढलं. माठातलं पाणी प्यायली. सरपंचीणबाईंनी दिलेला चहा घेऊन कपबशा विसळून ठेवल्या. निघताना सरपंचीणबाईंनी शांताबाईंच्या ओटीत शेरभर डाळ ओतली. ''सगळी डाळ निवडून झाल्यावर दिली असती तरी चाललं असतं की.'' लुगड्याच्या ओटी पदर डाळी गुंडाळत शांताबाई म्हणाल्या. नको म्हणलं तरी रिकाम्या हाताने वाड्याबाहेर कधी पडावं लागत नाही. ''असू दे. रातच्याला कालवण करा.'' ''अगं, निरोप मिळाला की हजर रहातीस. पैसे देऊन कोणी मिळत नाही. येळंला महत्त्व.''

"पैशाला काय करायचंय? माणसाचं मन नको का राखायला?" पिवळ्या धमक डाळीचं गाठोडं कुरवाळत शांताबाई म्हणाली. डाळीच्या किमतीत दोन दिवसाचा पगार झाला. हे काय शांताबाईला कळत नव्हतं का? बाहेरचं जग पाहिलेलं, अनुभवलेलं. सरपंचीणबाईच्या मनाचा मोठेपणा, थोडासा भोळेपणाचा अनुभव. तिनं त्याचा गैरफायदा घेतला नाही. दोघींचे मैत्रीपूर्ण सबंध होते. माणसं कशी जोडायची हे तिला कळत होते. शांताबाई निघाली पदर सावरून किंचित झुकलेली. डाळीमुळं वाकलीय की सरपंच बसलेत म्हणून? तिची चाहूल लागताच सरपंचांनी झोपाळा थांबवला. तिला म्हणाले, "शांताबाई, रातचं जेवण झाल्यावर सदुआबा न् तुमी या. जरा काम हाय." सरपंचाचा घोगरा आवाज मऊ वाटला.

"माझं बी काय काम हाय?"

"ते कळेलच की, तुमी दोघं बी या लवकर."

शांताबाईला वाटलं, काय वाटेकरी बदलायचं चाललंय की काय, पण मग मला कशाला बोलावलं आसंल? डाळीबरोबर प्रश्नाचं ओझं वागवत शांताबाई गेल्या. त्यांचं बोलणं ऐकून सरपंचीणबाई म्हणाल्या, "त्या शांताबाईला कशापाय बोलावलं?"

"तुम्हाला न्हाय कळायचं ते." सरपंच.

"तिला कळतं ते मला कळायचं न्हाय व्हय?" त्यांच्या गोऱ्यापान नाकाचा शेंडा लाल झाला.

"तुमास्नी रडण्याशिवाय काय सुचतच न्हाय व्हय? रातच्याला ते आले की बसा बैठकीला. मजी उलगडा व्हईल सगळा." सरपंच वैतागाने उठले.

"असं रागाला कशापाय यायचं? मी आपलं सहज विचारलं तर लगीच बसा बैठकीला."

"आता चांगलं सांगितलं की मग. बैठकीला बसल्याशिवाय ह्यो विषय समजायचा न्हाय. शांताबाई इल तवा बसा दुसरं तिऱ्हाईत कोण न्हाय."

अधिकार नसला तरी ओरडायचं न् दिला तर रडायचं. काय करावं ह्या बायकांना. चावडीवर बसल्याशिवाय शाणपण न्हाय यायचं. इंदिरा गांधींनी

न्हाय बाईमाणूस असून देश चालविला. बायकांना बुध्दी असतीय पण लाकडावाणी चुलीतच जळतीय. ते काय न्हाय. जग बदलायचं असेल तर बायकांनी बाहेर पडून चावडीवर सुदूधा बसायला पाहिजे. शहरातल्या बायका शिकून नोकरी करतात मग इथल्याच बायकांना काय धाड भरलीया व्हय. ती शांताबाई कशी शहाणपणाच्या गोष्टी सांगत होती. राजकारणात माणसं जोडायला अक्कल लागती. गप्पगार ठेवायला ताकद लागती. थोडी तयारी झाली तर शांताबाई सरपंच होण्याच्या लायकीची हाय खरं. न्हाय तर सरपंच झाली की शांताची दुर्गा व्हायची अन्.... जाऊ द्या राजकारणात तेवढं चालतं. चालवून घ्यावं लागतं.

"तारू गं, एवढी डाळ ओतायला घमेलं आण." शांताबाईनं अंगणातनं हुकूम सोडला. विडी फुंकत सदुआबा भिंतीला टेकून बसलेला. तिथंच शांताबाई बसली. तारूनं आणलेल्या घमेल्यात डाळ ओतत म्हणाली, "सोन्यासारखी डाळ हाय. घट्टगोळा वराण कर चांगलं. भाताला तांदूळ आण निवडायला. तारूनं घमेलं आत नेऊन परातीत तांदूळ आणून शांताबाईजवळ ठेवलं. एका पायाची उभी मांडी तर एक आडवी मांडी ठेवून बसलेल्या शांताबाईने परात पुढे ओढली. तांदूळ निवडता निवडता नवऱ्याला म्हणाली, "आवो ऽ आज सरपंच चितागती दिसत व्हतं. वैनीसाब म्हणाल्या, नीट जेवलं बी न्हाईत."

"काय तब्येत बरी न्हाय का?" धूर सोडत सदुआबा म्हणाला.

"काय की? पण रातच्याला आपल्या दोघांलाबी बोलावलंय."

"दोघालांबी? कशाला गं?" विडीचं थोटूक बाजूला टाकत बुचकाळ्यात पडत म्हणाला.

"आता मला तरी काय म्हाईत? मी कशाला त्यास्नी त्वांड वर करून विचारू?"

"भोगच झाला की. कशाला बोलावलं कुणास ठाऊक. गेलं तर पायजेल." हजामतीला आलेल्या करड्या केसातून हात फिरवत तसाच हनुवटीवर आणला. वाढलेल्या दाढीचे खुंट बोचू लागले. विडीच्या

थोटकातून धुराची रेघ सरळ वर चाललेली. विझू लागलेलं थोटूक सदुआबानं चुरगळून लांब भिरकावलं. त्याला वाटलं, 'औंदा तर चांगली सुगी झाली. मधीच काय झालं? कुठला वाटेकरी मिळाला आसलं बरं. सरपंचाचा वाटा बरा असतू. जनावरांना वैरणकाडी फुकट. जळाणकाटूक वर्षभर मिळतं. कसलाच बारकावा नाही. बाकीच्या ठिकाणी आसं परवडतं का? वाट्यानं करणं? त्यांची मर्जी.' सुस्कारा सोडत शुन्यात बघत बसलेल्या आबाला तारूनं चहा दिला. चहा घेत सदुआबा म्हणाला, "तुला कायच म्हणलं न्हाईत."

"न्हाय. पण मला वं कशापाय बोलावलं आसंल?" शांताबाई.

"आता तिथं गेल्याशिवाय कसं कळणार?" सदुआबानं मोकळी कपबशी तिथंच बाजूला ठेवत उठला. पटका गुंडाळत म्हणाला, "चावडीवर जाऊन येतो."

"लवकर या. जेवून जायचंय वाड्यावर."

सरपंच झोपळ्यावर बसलेले. स्वैपाकघरातील आवराआवरी करून, पोरांना अंथरूण, पांघरूण घालून सरपंचीणबाई पडवीत आल्या. त्यांना सरपंचांनी बळेबळे झोपळ्यावर बसवून घेतले. 'नुसतं ऐका तरी.' म्हणाले. 'नुसतं ऐकायला काय जातंय आपलं रोज तर तेच करतो की.' असं मनाशी म्हणत त्या बसल्या. दोघं वाट बघत बसलेली दिसताच सदुआबा नू शांताबाई लगबगीनं आत आले. "या, या" सरपंच म्हणाले. सरपंचीणबाई उठून तिथंच उभ्या राहिल्या. वाटेकरी असला तरी सदुआबा आपल्या वडिलांप्रमाणे आपसूक मान ठेवला जायचा.

"पोर झोपली वाटतं." काय तरी बोलायचं म्हणून शांताबाईनं विचारलं.

"होय, झोपली. बसा की." दोघं अदबीनं बसली.

"शांताबाई, असं आबाजवळ बसा." शांताबाई गोऱ्या असत्या तर गालावरचे गुलाब दिसले असते. त्या हळूच आबाकडे सरकल्या. मग सरपंचीण बाई पण झोपाळ्याच्या कडेवर टेकल्या. साखळीला पकडून झोपाळा स्थिर ठेवला.

"काय चुकलं का मालक? दोघास्नीबी बोलावलं?" सदुआबा.

"काय चुकलं न्हाय बाबा." हातावरची मळलेली तंबाखूची चिमूट तोंडात एका बाजूला ठेवत सरपंच म्हणाले, "वरनं हुकूम आलाय. आता निवडणुकीत बायकास्नी उभं करायचं. एखादं वर्ष सरपंचपद त्यांना बी द्यायचं"

"पण आमी तर तुमास्नीच मत देतो की देवाशप्पथ"

सदुआबा घाबरत म्हणाला, "खरचं मालक लबाडी नाय करत."

"आरं, तू गप कीं वाईच. मी काय सांगतूया ते ऐक. बायकास्नी उभं करायला पायजे. आपल्या गावात सरपंच होण्यासारखं हाय का कोण?"

म्हणजे हे निवडणुकीचं, प्रचाराचं काम हाय वाटतं. दोघांचा जीव भांड्यात पडला.

"वैनीसाब सोबून दिसत्याल्या की" शांताबाई म्हणाली.

"तिला उभं करून मी काय करू? एका घरातलं दोन, दोन उमेदवार कसं चालत्यालं. तवा म्हणलं...." सरपंच झोपाळ्यावरून उठून बाहेर जाऊन थुंकून आले. झोपाळ्यावर बसत म्हणाले, "तवा माझा असा इचार हाय. सदुआबा, बघ तुला राग न्हाय ना येणार?" सदुआबानं मान हलवली. प्रचार करायचा. उन्हाताणात हिंडल तरी खायाप्यायला मिळतं. मजाच की असती. राग कसला.

"आणखीन म्हणशील मी गरीब म्हणून आसं, तसं का? काय शांताबाई, खर का न्हाय?"

"मालक, म्या कवातरी इरोध केलाय का?"

"आरं पण आताची गोष्ट वेगळी हाय. तुला पटंल न्हाय पटंल, पण अशी संधी पुन्हा यायची न्हाय. काय शांताबाई?" आता काम काय ते सांगायचं राहिलं न दुसरंच गुऱ्हाळ चाललंय ह्यांचं. दोघं बुचकळ्यात पडली.

"मालक, मी काय आपल्या शब्दाबाहिर आसतू का?" सदुआबा.

शांताबाईनं नवऱ्याकडं बघितलं. "ह्यास्नी काय कळतच न्हाई. काय काम हाय ते कळायच्या आधीच शब्द द्यायचा."

"आपलं काय चुकलं की काय," असं वाटून तो एकदा सरपंचाकडं न् एकदा शांताबाईकडं आळीपाळीन बघू लागला.

"मी म्हणतूया, शांताबाईलाच उभ करावं." सरपंचांनी ॲटमबॉम्बच टाकला. त्या दणक्यानं दोघांच्या तोंडाचा आ वासला. "सदुआबा, तुला कसं वाटतं?"

"मजी मालक, हे येगळंच काम काढलं की. मला तर कायच सुचेनासं झालंय." सदुआबा चुळबुळत म्हणाला .

"शांताबाई, तुमचं काय म्हणणं हाय?" त्या तरी काय म्हणणार?

"असं बघा, आमी तुमच्या पाठीशी आहोत. तुमी फक्त महत्त्वाच्या मिटींगला यायचं. चहा बिस्कीटं खायची. कुठं लागल्या तर सह्या-बिंग्या करायच्या. बाकीचं आमी हायच की बघायला. काय सदुआबा?" दोघंही गपगार झालेली.

"आरं, इचार कसला करताय?" सरपंच त्यांचा अदमास घेत म्हणाले.

"मालक, बायामाणसांनी चावडीवर बसायचं मजी भाऊबंद तोंडात श्यान घालतील की."

"कायदाच तसा निघालाय बाबा. शांताबाई नाही उभा राहिल्या तर दुसर कोणीतरी उभा राहील, निवडून येईल. अशी संधी पुन्हा येणार नाही."

"मला व्हय आसलं जमतंय." शांताबाईचा ठाम नकार.

"बाकीच मी बघतो म्हणलं ना." सरपंच समजुतीनं म्हणाले.

"तुम्ही फक्त कवातरी यायचं सदुआबाबरोबर. काय सुदीक काम करायचं नाही."

"पण, उभ रहायचं मजी कसं काय करायचं?" सदुआबानं धीर गोळा करून विचारलं. उमेदवारीसाठी किती खटपट करावी लागते याची त्याला थोडी कल्पना होती. लांबून सगळं कुतूहलाने पाहिलेलं, आता त्यातच पडायचं म्हणजे नुसतंच इतक्या दिवस झुलणाऱ्या झोपाळ्याकडं बघत होते. आता बसायला मिळलं म्हणून थोडा हुरळून गेला.

"आवो ऽ मला...मला नाय आसलं जमायचं." शांताबाईला नवऱ्याचा रागच आला. "मी ऱ्हाय बाप्यांच्या मधी उभी राहणार. मी जातीच कशी आपली." ती उठू लागली तसं सदुआबान तिचा हात धरून खाली बसवलं.

"मी तुझ्या देखतच शबुद दिलाय न्हवं? आता मालक काय सांगत्यालं ते मुकाट्यानं ऐकून घे. उभा राहिलीस तर काय तुझं पाय न्हाईत दुखायचं." गप्प बसल्या शांताबाई.

सरपंच म्हणाले, "उद्या मी लिहून देतो अर्ज. सह्या तेवढ्या करायच्या. बाकीचं मी न् आबा बघतो. मग तर झालं."

सरपंचांनी नीट समजावून सांगितलं. शांताबाईंनी मग मान्य केलं सगळं. दुसरा कुठला पर्याय दिसतही नव्हता. दोन बाप्यांनीच होकार देण्यास भाग पाडलं.

"सदुआबा, उद्या चावडीत ये. अर्ज भरून देतो. इथल्या पेटीत नकोच टाकायला. त्याच्या आयला आठ दिवसांनी उगवतो पेटी उघडायला पोस्टमन. तू आसं कर, उद्या तालुक्याच्या गावालाच जा अर्ज घेऊन, तिथल्याच पेटीत टाक. पहिला अर्ज आपलाच असायला पाहिजे. आता जा घरी. निवांत झोपा. उद्या सकाळी चहापाणी, आंगूळपांगूळ, देवपूजा करून दोघं पण चावडीवर या. अर्ज भरू. या आता." ते दोघं गेल्यानंतर सरपंचांनी भला मोठा दरवाजा बंद करून आडणा लावला. एका मोठ्या कामाचं ओझं हलकं झालं होतं. रिमोट हातातच राहणार होता. याचा त्यांना आनंद झालेला.

दुसऱ्या दिवशी दोघं पण वाड्यावर आले. सरपंच चहा पीत होते. आत बघून म्हणाले, "आहो दोन कप चहा करा." सदुआबाला त्यांनी बसायला सांगितले. शांताबाई आत गेल्या. सदुआबाला भारी अवघडल्यासारखं वाटत होतं. वाटेकरी म्हणून ह्यांच्या शेतात राबणारे आपण आणि आता सरपंच एवढे मानाने वागवित होते. 'आपण आत्ताच सरपंच झालो की असंच सदूआबाला वाटू लागलं. आपण बी आसंच झोपाळ्यावर बसू...जोडीनं. पण मग सरपंच कुठं बसत्याल?' सदुआबा विचारात पडला. तेवढ्यात चहा आला. सदुआबा कपातला चहा बशीत ओतून पिऊ लागला. आजचा चहा खरंच फार फार चांगला होता. आईशप्पथ. आपण असा चहा कधीच प्यायलो नाही.

"चला." सरपंच उठले. त्यांच्या पाठोपाठ सदुआबा शांताबाई चावडीवर निघाले. सरपंचीणबाईंनी शांताबाईंना कुंकू लावून हातावर देवाजवळची साखर ठेवली.

अर्ज नीट भरून झाल्यावर सरपंचांनी शांताबाईला सह्या करायला सांगितल्या. कुठं कुठं करायच्या त्या जागा दाखवल्या. "मला नाही बाई सही येत." शांताबाई म्हणाल्या. आता आली का पंचाईत. सरपंचांना वाटलं सहीपुरत्या तरी साक्षर असतील. पण....

"सदुआबा, तुला तरी येती न्हवं?"

"व्हय येती की."

"तूच कर मग शांताबाईची सही."

सदुआबानं झोकात शांताबाईचं नाव लिहिलं. तेव्हा पहिल्यांदाच चावडीत आलेल्या शांताबाई दबून गेलेल्या. चोरट्या नजरेनं इकडं तिकडं बघत होत्या. भिंतीवरील गांधी, नेहरू, आंबेडकरांचे फोटो न्याहळत होत्या. सदुआबाने नीट घडी घालून अर्ज पाकिटात ठेवला. सरपंचानं त्यावर पत्ता घातला. म्हणाले, "तहशीलदारांकडे कचेरीतच दिला असता पण भेट होती न होती. पोष्टाचं टपाल कसं सवडीनं बघता येतं." पाकिटावर तिकीट चिकटावलं. "नीट टाकून ये." शांताबाई घरी गेल्या. सदुआबानं पाकीट नीट सदऱ्याच्या खिशात ठेवलं. चुरगळत तर नाही ना? पुन्हा नीट बघितलं. सायकलवर टांग मारून तालुक्यात निघाला. खडीच्या रस्त्यावर फुलं अंथरल्यासारखं वाटत होतं. धडधडत खडखडत जाणाऱ्या सायकली ऐवजी विमानातून तरंगल्यासारखं वाटत होतं. सुख काय न् दुःख काय मानण्यावर असतं. भविष्यातील सुखासाठी वर्तमानातला त्रास मनाला जाणवत नाही. लक्षच नसतं तिकडे. शरीरालाही कळत नाही. सदुआबाला वाटत होतं, 'आपण काय फार पुण्य नाही केलं. आषाढी-कार्तिकीची एकादशी केली तेवढीच पण आई-बांनी लय पुण्य केलं असणार म्हणून तर हा दिवस उजाडला. आई-बाच्या आठवणींत सदुआबा सद्गदित झाला. आई जाऊनच दहा वर्षं लोटली. बा तर त्याआधी गेलेला. तेव्हापासून संसाराचा

भार अंगावर पडलेला. धाकटा लग्न झालं की वेगळा राहून काम करू लागला. हातावरचं पोट कुठंही गेलं तरी कष्ट करावंच लागणार. पण म्हातारी होती तवर आधार वाटायचा. वाऱ्या-वादळाची वाटंला डोळं लावून बसायची. तिच्यासाठी शेतातनं लवकर यायला लागायचं. शेरडा-करडाची, कोंबड्याची राखण व्हायची. कसं वाटलं असतं तिला शांताबाई सरपंच झाल्याचं ऐकून? की होऊच दिलं नसतं. म्हणाली असती, "सरपंचाला म्हणावं, तुझ्या बायकोला कर सरपंच. आम्हा गरिबाच्या संसारावर कशाला वाकडी नजर तुझी?" असंच काही-बाही बडबडली असती. चावडीजवळ महादेवाचं देऊळ होतं तरी स्वत: कधी गेली न्हायी न् सुनंला पण जाऊन दिलं नाही. मोठी मोठी माणसं असत्याती चावडीवर म्हणून. आता शांताबाई सरपंच झाली की आपून बी वाडा बांधू. सोप्यात झोपाळा. सरपंचासारखं झोपाळ्यावर बसून पान खायचं. पण सरपंच तर शांता होणार. मग तिलाच झोपाळ्यावर बसावं लागंल? बरं ती का बसंना. बसलं मिश्री घासत. ती काय न् मी काय.'

मोठ्याशा दगडाला सायकल ठेचकाळली. पडणारच सदुआबा. पण भानावर आला. पाय टेकवत सावरली सायकल न् स्वत:लाबी. 'त्याच्या आयला आधी ह्यो रस्ता डांबरी करायला पायजे. त्याबिगर हे हाल नाही संपायचं.' कपाळावरचा घाम सदऱ्याच्या बाहीनं पुसला न् पुन्हा टांग मारून सायकल पळवू लागला. एवढं पाकीट पोस्टाच्या पेटीत टाकलं की शांताबाई सरपंच होणार या गाढ समजुतीत सदुआबा पोस्टाच्या पेटीजवळ आला. सायकल उभी केली. चेहरा पुसला. पाकीट काढलं खिशातून. थोडंसं चुरगाळलं होतं. हात फिरवून नीट केलं. पेटीजवळ आला. नीट वरखाली, सगळीकडे बघितले. पहिल्यांदाच तो एवढं निरखून पेटी बघत होता. 'कुठून बरं पाकीट टाकायचं? ही फट दिसतीया. पण त्याच्यातनं पाकीट टाकलं तर पोस्टमन पाकीट काढणार कसं? कुठं दार दिसतंय का बघितलं तर खाली एका बाजूला भलं मोठं कुलूप. "आरं, त्याच्या आयला ह्या पेटीला तर कुलूप हाय. आता कसं करायचं? पण कुलूप तरी का लावलं आसंल.

की आपल्यालाच उशीर झाला यायला? सूर्य तर डोक्यावर बी न्हाय आला अजून. सुटी-बिटी तर न्हाय? आज कोणवार.... आज तर रविवार. रविवारी पोस्टाला सुटीच असणार की. म्हणून तर हे भलं मोठं कुलूप. पण सरपंचाच्या सुदीक ध्यानात कसं आलं न्हाय मी म्हणतो. चला माघारी. बिन कामाची पायपीट झाली. सरपंचानी मुद्दामच आसं पळायला लावलं का काय? त्यान्ला कशाला दुसरं कुणाला सरपंच करू वाटंल. दुनयेला दाखवायला भरला आपला अर्ज. न्हाय तर ते काय अडाणी हायत का, असल्या गोष्टी विसरायला? हेच सरपंच-बिरपंच आपलं कामच न्हवं. सदुआबानं नशिबाला शिव्या देत पाकीट खिशात टाकलं. आन् निघाला. सगळा रस्ता खडीचा, कच्चा. येताना याच रस्त्यानं कसं काय आलो याचंच सदुआबाला नवल वाटायला लागलं होतं. काय ह्यो रस्ता? घरी जाईस्तोवर हातीपायी धड राहू का तरी? ऊन तर मी म्हणत होतं. सदुआबा वैतागून गेला. घामाच्या धारा लागलेल्या. घशाला कोरड पडलेली. कुठं पाणी तरी मिळतंय का म्हणून वस्ती आहे का ते इकडं तिकडं बघू लागला. तर ठेचकाळायला व्हायचं. खड्ड्यात सायकल धडपडायची. पुढं बघून सरळ चालवू लागला. कसातरी एकदाचा वाड्यापुढं आला. धापा टाकत सायकल उभी केली. सरपंच नुकतच जेवून झोपाळ्यावर बसलं होतं. "पाणी द्या मालक." कसा, बसा बोलला आणि तिथंच मटकन बसला.

सरपंच आत पाहून म्हणाले, "सदुआबाला पाणी आणा रे." सदुआबाकडे पाहून, "टाकलं नीट पाकीट पेटीत. आता ईल दोन दिवसात मंजुरी. हिथं टाकलं आसतं तर आठ दिवस तसंच पडलं असतं." सरपंचाच्या पोरानं तांब्या भरून आणला. सदुआबानं घटाघटा पाणी घोटलं. राग, वैताग, चीड, मनस्ताप सगळंच गिळून टाकलं. पोटात जरा गार गेल्यामुळं बरं वाटलं.

"आरं, हळू हळू पी की. एवढी सायकल पळवीत आणलीस, नळ फुगत्याल... पोटात दुखंल." सदुआबानं पाणी संपवून तांब्या ठेवला. जरा दम खाल्ला. कपाळावरचा घाम निपटला. खिशातलं पाकीट काढून सरपंचाकडं दिलं.

“कारं, माघारी आणलंस? गेला व्हतास न्हवं तालुक्याला?” सरपंच बुचकळ्यात पडलं.

“गेलो व्हतो.”

“मग? पोस्टाची पेटी घावली न्हाय का काय?”

“पेटी घावली पण आज रविवार, पेटीला भलं दांडगं कुलूप. मालक, तुमच्याबी कसं ध्यानात आलं न्हाय? आज पोस्टाला सुटी असती.”

“आरं पण पाकीट टाकायला काय झालं?”

“आता पेटीला कुलूप असताना कसं टाकायचं पाकीट?” सदुआबानं हताश होत विचारलं.

सरपंचानं डोक्यावर हात मारून घेतला.

# दिवाळी

दिवेलागणीची वेळ. उद्या नरकचतुर्दशी. रसरसल्या चुलीवर कळ्या, बुंदी पडत होती. एरवी काटक्या कुटक्या, उसाचे सड, चिपाडे चुलीला जळण म्हणून पण दिवाळी म्हणून चुलीलाही फोडीव लाकडे, ढपल्या आणलेल्या. दारोदारी आकाशकंदील, पणत्या ऐपतीप्रमाणे घर उजवीत होत्या. तेलकट तळलेल्याचा वास रस्त्यापर्यंत रेंगाळत दरवळत होता. बाळूबापूनी धोतराच्या सोग्यात राळ्याचे तांदूळ बांधले होते. चाचपून बघितले. यंदाची दिवाळी सजुऱ्यावरच साजरी करावी लागेल. घेवड्याचं पोतं विकून पोरांना कपडे आणले. चिंध्या लोंबत होत्या,

सदऱ्यातनं उघडी पाठ दिसत होती. तरी तशीच शाळेत जायची पोरं. आपण त्यांना नीटनेटकं खाऊपिऊ सुद्‌धा घालू शकत नाही म्हणून बापूला फार वाईट वाटायचं. दोन बिगं जमीन नवरा-बायको रातंदिस खपायचे. तेवढ्याशा तुकड्यात पिकून पिकून तरी किती पिकणार? मधनं, अधनं आभाळाचं तोंड वासलेलं. पाण्याचा थेंब पडायचा नाही. मग गावात काम तरी काय असणार? यंदा पण पाऊस कमी पडला. सरकारनं दुष्काळाची कामं काढली होती. दोघं पण रोजगार हमीवर जायची. कसंतरी भागायचं. कधी कधी चूल थंडच असायची. मग पोटातली न् काळजातली आग विझवायला बापूचे पाय आपोआप दारूगुत्त्याकडे वळायचे. आता सुद्‌धा बापू झोकूनच आला होता. डोळं लाल इंगळासारखं दिसत होतं. उंची भरपूर, धिप्पाड देह सावरीत धोतराच्या सोग्यातलं राळं सांडणार नाहीत याची काळजी घेत बापू घराकडं निघाला होता. रस्त्यावर गल्लीतली पोरं फटाके वाजवीत होती. पोरांचा गोंधळ चालला होता. ''ये, चंद्या, वातीचा फटाकडा असला तर माझ्याकडं दी ऽ मुकाट्यानं.'' मास्तरांचा राजू दरडावत म्हणाला. ''घावला की दितू रं ऽ'' चंद्या दीनवाणा म्हणाला. चंद्रकांतचा आवाज ऐकताच बापू तिथंच् रेंगाळला. दोन्ही पोरं फटाक्यांच्या फुसक्या गोळ्या करून खिशात कोंबत होती.

''काय करता रं ऽ? त्याज्या मायला...'' बापूच्या आवाजानं पोरं ढुंगणाला पाय लावून घराकडं पळाली. बाळूबापूच्या रागीट, मारकुट्या स्वभावामुळं पोरं त्याच्या थाऱ्याला उभी रहायची नाहीत. बापू राळ्यांचं गठूळं आणि स्वत:चा तोल सावरीत घरात आला.

''आयं ऽ राळं ओतायला आण काय तरी.'' हातात जरमलचं, चेंबलेलं पातेलं घेऊन बापूची आई आली. चुलीच्या जाळानं काळं, करपट खड्डे पडलेल्या त्या पातेल्यासारखी बापूची आई दिसत होती. संसाराच्या झळांनी रापलेली, निबर हाडकलेली, खरखरीत हातातलं पातेलं जमिनीवर बापूशेजारी ठेवत म्हणाली, ''नुसतं राळंच व्हय? डाळ, साखर, त्याला कायच न्हाय आणलं?''

''पैसे नव्हते.'' बिडी शिलगावत बापू म्हणाला.

"दारू ढोसायला पैसं हायतं. सणसूद पण कळत न्हाय. लोकाचं लाडू झालं. आज धनतेरस हाय पूजा तरी कर." बापूची आई बडबडत होती.

"धन आसंल तर करू पूजा का दगड-धोंड्याची करू?" बापू वैतागून म्हणाला. बिडीचा जोरात झुरका घेऊन त्यानं धूर सोडला. तोंडातल्या तोंडात काहीतरी पुटपुटू लागला.

बापूची बायको किस्नाबाई चुलीवर भाकरी भाजत होती. वैलावर चिटकीत डाळ शिजत ठेवलेली. तिथलाच विस्तव घेऊन पोरं फटाक्यांच्या फुसक्याच्या नळ्यातील दारू त्यावर सोडत होती. सुरूसुरू दारू पेटली की चेकळत होती; पण बाहेर बापूला आवाज जाणार नाही अशा दबक्या आवाजात. एक नळी भस्कन पेटली आणि किस्नाबाईच्या भाकरीच्या काटवटीत घुसली. "भाजंल की, मुडद्या ऽ" किस्नाबाई ओरडली.

"काय करत्याती गं?" बापूनं बाहेरनंच विचारलं.

"फुस्क्यातली दारू इस्त्यावर सोडत्यातिया. फासदिशी जाळ व्हतूया." किस्नाबाई तव्यातली भाकरी इंगळावर उभी शेकायला ठेवत म्हणाली.

बापू लडबडत भिंतीचा आधार घेत उठला. पाठीत वाकत चुलीकडं आला तशी पोरं उठून बाजूला पळू लागली. बापूनं चंद्रकांतला पकडलं. त्याच्या खिशातलं फुसकं फटाकडं काढलं. सूर्यकांतनं मुकाट्यानं स्वतःच्या खिशातलं फटाकडे काढून दिलं. बापूनं रागारागानं सगळ्या फुसक्या नळ्या चुलीत टाकल्या. फस ऽ फुस ऽ, सुर्र ऽ आवाज आला. किस्नाबायच्या लुगड्यातही फुसक्या घुसल्या. तशी किस्नाबाय 'ओ ऽऽ य' असं ओरडत उठली. तिच्याकडं जळजळीत नजर टाकत बापू म्हणाला, "बस की मुकाट्यानं. का घालू लाथ कंबारड्यात?" इकडं आग तर तिकडं फुफाटा. किस्नाबाय लुगडं सावरत बसली. नवऱ्यापेक्षा चुलीतला जाळ परवडला. तो अपमानाने जाळीत तरी नाही. घसाघसा काटवटीत ती पीठ मळू लागली. पोरं धसकून आजीजवळ बसली. आजीनं पोरांच्या पाठीवरून हात फिरवला. "कारं बाबा ऽ, पोरांचं फटाकडं चुलीत टाकलंस?"

बापू रागाने त्यांच्याकडे बघत बाहेरच्या खोलीत येऊन बसला. पिऊन आला तरी फारशी बडबड करायचा नाही. मग म्हातारीला बडबड करायला

फावायचे. नुसतं बसून चालणार नव्हतंच. तिनं पोरांना बाजूला केलं न् राळ धुवायला घेतलं. धुवून सावलीत सुकवायचे. सुकले की तव्यावर भाजून जात्यावर दळायचे. गुळाच्या पाण्यात भिजवून ठेवले की रात्रभर चांगलं फुगतं सारण. मग सोजीच्या लाटीत सारण भरून छोट्या साटोऱ्या लाटायच्या. तव्यावर थोडं तेल सोडून भाजायच्या. तळायला एवढं तेल कुठं होतं. राळ्याला हात देता देता तिची बडबड चालूच होती. बापूला सगळा गाव घाबरायचा पण तोच बापू आईपुढं म्याँवमांजर व्हायचा. आईला एक शब्द देखील उलटा बोलायचा नाही. आईची लेकरावर असतेच माया. बापूचीही आईवर फार माया. गरिबीत भरभरून दुसरं तरी काय देणार होती, ती एकमेकांना. बापूची आई पण कडक स्वभावाची, तशीच प्रेमळ पण तेवढीच. कोकणातला फणसच जणू. कुणाची चूक झाली तर तडातडा बोलायला कुणाच्या बापाला घाबरायची नाही. सुनेकडून कामं करून घ्यायची, चुका झाल्या की लाखोली वहायची. माया पण तेवढीच करायची. आगस्ताळ्या नवऱ्याचा मार खाऊन उपाशी राहिलीच कधी सून तर तिला जेवायला घेतल्याशिवाय स्वत: कधी जेवायची नाही. उपासादिवशी उपासाचं काही न करता तशीच किस्नाबाय रानात गेली तर स्वत: वरीचा भात शिजवून कुणाजवळ तरी पाठवून द्यायची. ''राब राब राबायचं मरणाचं. पोटात चार घास तरी घालत जा. पाण्याला आधार. आतडी वाळून जायची.''

एकदा किस्नाबाय तशीच रानात गेली उपास होता. म्हातारीचा जीव तुटू लागला. तिनं वऱ्याचं तांदूळ शेजारच्या पोराला रुपया देऊन आणायला लावलं. तोवर चार शेंगा फोडून शेंगदाणे भाजून कुटले. चार-पाच मिरच्या कुटल्या. जास्तच झाल्या असत्या पण झणझणीत असलं की तोंडाला चव येती अन् तांब्याभर पाणी जास्त जातं. तेवढ्यात पेठंत हिंडून बापू आला.

''आरं काय करतीस? ती कुठं गेली? च्या कर म्हणावं तिला घोटभर.'' डोक्याचा पटका मांडीखाली घेत बापू बसला.

''आरं, ती गेली रानात. मंगळवार हाय न् तशीच गेली बघ. दोन जीवाची. दिवसभर उपाशीच राहील. वायच भात करतीया.'' म्हातारीनं वैलावर भाताचं पातेलं ठेवून चुलीवर चहाला आधण ठेवलं.

"कवाशीक गेली? तिजं तिला काय व्हतं करून घ्यायला?"

"आताच गेलीया. बघ ब्रं मागच्या दारातनं घाटापर्यंत गेली आसंल. दिसली तर हाक मार. घोटबर च्या पिल." बापूनं मागच्या दारातनं टाचा उंचावून बघितलं. काखेत धोतराच्या धडपा न् विळा घेऊन किस्नाबाय पायऱ्या उतरत होती. बापूनं तिला हाक मारली. "आगं ये ऽऽ माघारी फिर."

पुढं पाऊल टाकायची काय बिशाद होती किस्नाबायची. काळीज लख्खन हाललं तिचं. धडधडतच मागं फिरली. जळजळीत नजरेनं बघत बापू तिथंच थांबला. माळ्याच्या घराला वळसा घालून किस्नाबाय मागच्या दारानं आली. म्हातारी भात हलवत होती. मागच्या दाराला पायऱ्या नव्हत्याच. दगडावर पाय ठेवून उंबऱ्यात वाकून चढावं लागायचं. बापू दारातच उभा होता त्याला बघून, किस्नाबायच्या चेहऱ्यावर आट्या पडल्या. मनात म्हणाली, 'गावभर बोंबलत हिंडायचं. गुरांला वैरण काडी कोण करायचं? कुणाचीच काळजी न्हाय.' तिचा वैतागलेला चेहरा बघून बापूचं मस्तक हललं. 'ही समजती काय स्वतःला?' किस्नाबाय उंबऱ्यातन वाकून वर चढत असतानाच त्यानं जळणातलं दांडकं तिच्या पाठीत घातलं. किस्नाबाय कळवळून ओरडली. "म्हातारीला भात करायला लावून तिकडं रानात काय डोंगूर उपसायला निघाली व्हतीस का?" बापू कडाडला.

"आरं मर्दा, तुला काय अक्कल-बिक्कल हाय का न्हाय?" म्हातारीनं असं म्हणत किस्नाबायला धरून बसवले. तिच्या पोटात कळा येऊ लागल्या.

"आसला कुटं राग आसतू का? आता पोराला काय झालं मजी?"

बापू हबकला. आपण रागाच्या भरात काय करून बसलो? कावराबावरा होऊन तो बाहेर येऊन बसला. पोटातल्या कळा असह्य होऊ लागल्या म्हणून किस्नाबाय ओरडत होती. म्हातारीनं प्रसंगाचं गांभीर्य ओळखून बापूला म्हणाली, "जा गाडी जुपून आण. दवाखान्यात नेऊ." बापू लगबगीनं परड्यात गेला. गाडी जुपून आणली. तालुक्याला दवाखान्यात किस्नाबायला ॲडमिट केलं. रस्त्याच्या बाजूला गाडी सोडून बापूनं बैलांना

वैरण टाकली. गाडीखाली सावलीत बसून राहिला. 'ही मेली तर? एवढ्याशा पोरानला आई कुठली?' बापूला पोरांची आठवण होऊन गळा दाटून आला. 'शाळेतनं पोरं आली असत्याली.' नाही नाही ते विचार मनात येत होते. गुडघ्यात डोकं घालून बसलेला. म्हातारी हाक मारत होती पण त्याला ऐकायला येईना. म्हातारी जवळ आली त्याला हलवून म्हणाली, "डाक्टर बोलावत्यातंय." भानावर येत, पटका काखेत ठेवत बापू लगबगीनं निघाला. किस्नाबाय निपचित खाटेवर पडली होत. नर्स सलाईनचं बघत होती. डॉक्टरांनी औषधं लिहून देता देता बापूला सांगितलं, "आता तुम्हाला मूल होणार नाही. पोरीचा जीव वाचला..." पुढचं काही न बोलता तोंडाला पदर लावत म्हातारी किस्नाबायच्या कपाळावरनं हात फिरवू लागली. सदानूकदा करवादलेला, वैतागलेला, रडवेला चेहरा कसा आता लहान मुलासारखा दिसत होता.

चंद्रकांत आणि सूर्यकांत यांच्यावरच पाळणा थांबला. 'बरं झालं. लेक झाली असती तर तिला हुंडा कुठला दिला असता?' अन् मग बापू या चांद-सूर्याला जास्तच जपू लागला पण रागीट स्वभाव थोडाच बदलणार आहे? किस्नाबायला म्हातारीचाच खूप आधार वाटायचा. किती बडबड केली तरी त्यामागची माया तिला कळायची. आता पण बापूनं पोरांचं फटाकडं चुलीत घातलं म्हणून तिच्या तोंडाचा पट्टा चालूच होता.

किस्नाबायनं वैलावरची डाळ शिजली का बघितली. म्हातारीनं लसूण सोलून ठेचून ठेवला होता. शेवटची भाकरी भाजून टोपल्यात टाकली. काटवट धुवून उभी करून ठेवली. चुलीवर पातेलं ठेवलं. डाळीत काळी चटणी, मीठ घालून पळीनं घाटली. तवा उतरून चुलीवर रिकामी चिटकी ठेवली. तेल टाकलं, तापलेल्या तेलात मोहरी घातली. ती तडतडली की लसूण घातला. फोडणीचा वास घरभर दरवळला. त्यावर डाळ ओतताच चर्र ऽऽ आवाजही त्यात मिसळला. त्या वासानं आणि आवाजानं बापूची भूक उसळली. "झालं की न्हाय? वाढ की लवकर." विचाराच्या तंद्रीतून बाहेर येत बापू म्हणाला. दारूचा अंमल बराचसा कमी झाला होता.

“चंद्या, पाणी आण.” चंद्रकांतनं पाण्याचा भरलेला तांब्या दिला. वरची पितळी काढून आईजवळ दिली. किस्नाबायनं त्यात भाकरी मोडून ठेवली. पितळी वाकडी करून पळीनं आमटी ढवळून वाढली. शेवटी वरचा तवंग वाढला. चंद्रकांतनं सोबणी हुडकून पितळीच्या खाली लावत हळूच सांभाळत ते वाफळलेलं गरम जेवण बापूच्या पुढं ठेवलं. म्हातारीनं मूठभर शेंगा पुढं टाकल्या. मग दोन ताम्हणं घेतली. त्या दोघांना पण जेवायला वाढलं.

बापूनं गरम, पांढऱ्या शुभ्र, मऊ भाकरीचा तुकडा मोडला न् आमटीत एका बाजूला कुसकरू लागला. “त्याज्या आयला ऽ पाटलाची पोरं, ह्या ऽ बापूची पोरं रस्त्यावरचं फटाकडं गोळा करत्याती.” अचानक काय झालं म्हणून सगळेच बापूकडं बघायला लागले.

“भिक लागलीय व्हय तुमाला? फुसक्या गोळा करायला?”

“पोरांची जात त्यान्ला काय कळतंय? जेव आता मुकाट्यानं.” म्हातारी बापूजवळ बसून शेंगा फोडून दाणे तिथं बाजूला ठेवू लागली. पण बापूचं जेवणाकडं लक्ष होतं कुठं.

“अगं, कसा जेवू? माझी पोरं त्या मास्तरच्या पोराचं बोलून घेत्याती. पाटलाची पोरं ! अन् त्या मास्तरच्या पोराचं फटाकडं गोळा करत्याती.”

“लय मनाला लागलेलं दिसतंय? आणलं आसतंस फटाकडं पोरान्ला तर कशाला रस्त्यावरचं गोळा करत बसली असती ! पाटलाचं घर म्हणं मोठं घर न् पोकळ वासा. खायला धड न्हाय आन् तू रं कवा आणायचास पोरांला फटाकडं?” म्हातारीचं सुरू झालं. झटदिशी बापूनं ताट सारलं. तिरमिरीतच उठला “आरं, आसं जेवत्या ताटावरनं उठू नगंस. सणासूदीचं.”

“पोरान्ले फटाकडं न्हाय आणलं तर नावाचा बाळूबापू न्हाय मी !” डोक्याला पटका गुंडाळीत बापू म्हणाला.

“आता कुठं चाललास? उद्या पहिली आंगूळ. आज नग जाऊ रानात. झोप हिथंच. दिस उगवायच्या आत आंगूळ करायची असती न्हवं !” म्हातारीच्या बोलण्याकडे त्याचे लक्षच नव्हतं. पायात चपला घालून निघाला. दाणदाण त्याच्या चालण्याने अंगण हादरत होतं. म्हातारी

पाठमोऱ्या लेकाकडं बघत होती. तिचं डोळं पाण्यानं भरलं. पाटलाचं घराणं... म्हातारीचं तोंड कडू झालं. कवातरी आसलं वाडवडिलांची पाटीलकी. जमिनीबरोबर गेली पाटीलकी पण नावाचा पोकळ डोलारा राहिला; गरिबीला सोबत घेऊन. जमिनीचं तुकडं पडत पडत बापूच्या वाटणीला अवघं दोन बीगं आलं होतं. पण पाटीलकीचा तोरा कमी झाला नाही. मधनंच दुष्काळ भेटून जायचा अधिकाच्या महिन्यासारखा. दोन्ही वेळेला पोटभर जेवायला मिळणंच सणासारखं वाटायचं. तोच सण न् कष्ट करणे हा धर्म. अन्न हे परब्रह्म. त्याला आसं मागं सारून जायला नको होतं पोरानं.

म्हातारीला चुटपूट लागली. 'बाप बी असाच तडकू डोक्याचा. जरा काय झालं की भरल्या ताटावरनं उठून जायचा. पाटीलकीची रग हाय तशीच हाय.' डोळं पुसून सुनेला म्हणाली, "तू घे घासभर खाऊन, न् राळं भाज." म्हातारी पोरान्ला झोपण्यासाठी वाकळ अंथरू लागली. किस्नाबायनं राळं भाजायला घेतलं. तिला माहितेय, म्हातारीच्या किती इन्त्या केल्या तरी जेवणार नाही. एकदा वाटलं खावी भाकरी. आतडी नुसती पिळून निघत होती. पण म्हातारी जेवणार न्हाय म्हटल्यावर तिलाही उपाशीच रहावं लागलं. जोराजोरात ती राळं हलवू लागली. नवऱ्याचा तिला राग, राग आला. गरिबीला उपाशी राहणं परवडतं, पण काम ठेवून विचार करत बसणं कसं परवडेल !

किस्नाबायनं भाजलेलं राळं सुपात ओतलं. जातं झाडून पुसून घेतलं. राळं दळताना जातं जड जातं, त्यात पोटात काही नाही. म्हातारी हात लावायला आली. तिला जरा बरं वाटलं. तोंडातून ओवी फुटत नव्हती. नुसती जात्याची घर्घर् न् दोघींच्या काळजातली धडधड. सुन्न संगीत घरभर घुमत होतं. त्या तालावर दोघी दळत होत्या. पोरं केव्हाच झोपी गेली होती.

बापू ओढ्याच्या कडेला आला. सगळीकडे सामसूम झालेली. रातकिडं किरकिरत होतं. आभाळात चांदण्यांची दाटी झालेली. ओढ्याची खळखळ

तेवढी. डोळ्यात बोट घातलं तरी कळत नव्हतं एवढा अंधार. पण बापूचे डोळं त्या अंधारालाही सरावलं. पायाखालचा रस्ता थोडं थोडं दिसू लागला. दारू पिता पिता कशी करायची गुत्तेवाल्याकडून शिकलेला. कधी मधी मदत केली की मापभर दारू फुकट मिळायची म्हणून मदत करता करता शिकला. कधी कधी काहीच चालेना तेव्हा गुपचूप दारू काढून विकायचा. चोरी करण्यापेक्षा ह्यो धंदा बापूला बरा वाटायचा. थंड चूल हिच्याच जिवावर पेटायची. म्हातारीला हे माहीत नव्हतं. नाहीतर चवताळून उठली असती. म्हणाली असती, ''आग लागू दी ह्या संसाराला. उपाशी मेलेलं बरं. ह्या आकाबायच्या पायी आपल्या बी दुसऱ्याच्याबी घरादाराचा खेळ खंडोबा हुतुया.'' आईचं पटत होतं पण करायचं तरी काय? गावात मजुरी तरी सारखी कुठं मिळती? ''त्याज्यायला आपुन काय बळबळं घालतुया का कुणाच्या नरड्यात.'' दारू भरून ठेवलेला टिनपाटाचा डबा वाळूत पुरून ठेवलेला. बापूनं वाळू उकरून डबा बाहेर काढला. डब्यातली दारू मडक्यात ओतली. 'घ्यावी थोडी? नक्कोच. चढली की दुकानापर्यंत जाता येणार नाही.' मडक्याचं तोंड फडक्यानं बांधलं. ओढ्याच्या कडेकडेनं तालुक्याच्या गावाला निघाला. दोन मैलावर दारूचं दुकान आहे तिथं नेऊन विकायची. 'तो साला दुपटीनं इकील गिऱ्हाईकाला' बापूनं दोन शिव्या दिल्या त्याला. बापू झपझप निघाला. दारूचा गुत्ता उशिरापर्यंत उघडाच राहतो पण फटाक्याच्या दुकानाचं काय? 'त्याज्यायला बंद हुव न्हाईत दुकानं मजी झालं.' थंडीचं दिवस. ओढ्याच्या पाण्यामुळं गारठा चांगलाच झोंबत होता. तरुण रक्ताच्या बापूला फटाकं आणायचं याशिवाय कशाचीच जाणीव नव्हती. थंडी वाजत नव्हती की अंधाराची, इचूकाट्याची भीती वाटत नव्हती. भरभर पावलं पडत होती. मनात एकच विचार उद्या पहिल्या अंघोळीदिवशी पोरांना फटाकं द्यायचं.

दिवाळीमुळं दुकानं गजबजलेली. दिव्यांच्या रोषणाईचा झगमगाट डोळं दिपवत होता. अंधारातनं आलेल्या बापूला तर आधी कायच सुधरेना. थोडा वेळ तसाच उभा राहिला. मग सरावला झगमगाटालाही. त्याच्या मनात आलं, ''ह्या लोकांकडं एवढा पैसा कुठून येत आसंल? शिकलं,

नोकरी केली की माप पैसा मिळतू. सरकारच देतं. आपूनबी पोरान्ला असंच शिकवायचं. शहरगावात नोकरीला लावायचं. माझी पोरं पांग फेडत्याली शिकूनशाणी.' विचाराच्या नादात दारूचा गुत्ता कधी आला ते कळलंही नाही. बेवड्यांचं बरळणं आंबट ओल्या वासानं बापू आपसूक थांबला. अंदाज घेत त्यानं मडकं मालकापुढं ठेवलं. म्हणाला, "लौकर पैसं द्या, न्हायतर दुकानं बंद व्हत्याली." मालकानं फडकं सोडून वास घेतला. नोकराजवळ मडकं दिलं. बापूला पैसे देत म्हणाला, "दिवाळीच्या खरेदीला उशीर केला राव. एवढ्यात काय घेणार?"

"पोरान्ला फटाकडं घ्यायचं मजी झालं. कुठल्या दुकानात चांगलं मिळत्याल?" पैसे मोजून सदऱ्याच्या खिशात ठेवीत बापू म्हणाला.

"कुठल्याबी दुकानात चांगलं मिळत्यालं. फटाकडं काय संगळं सारखंच की."

"तसं न्हाय वं, आमा आडाणी माणसाला फसवायची ही तुमची शहरी माणसं, म्हणून म्हनलं." बापूचा रागीट स्वभाव, प्रामाणिकपणा गुत्तेवाल्याला माहीत होता. गरिबीत सुद्धा त्याचा करारीपणा कमी झाला नव्हता. त्याच्याबद्दल त्याला सहानुभूती वाटायची.

"आरं, त्या आझाद चौकात बरग्याचं दुकान हाय, तो चांगलाय. फसवायचा न्हाय. आन् तू रं काय फसतूया." त्याच्याकडं पाहून हसत गुत्तेवाला म्हणाला.

बापूचं उघडझाप दिव्यांच्या चमचमटामुळं डोळं दिपत होतं. मनात म्हणत होता, 'कशाला न्हाय त्याला ही माणसं पैसं घालवत्याती. त्याज्यायला आमाला भर दिवाळीत पणती लावायला चमचाभर तेल नाही की पोटाला पोटभर आनपाणी नाही.' त्याला आठवलं आपण भरल्या ताटावरून उठून आलेलो. अन् जाणवलं आपल्याबरोबर त्या दोघीबी उपाशीच झोपणार. त्याला गाडीवरचा चहा घ्यावासा वाटत होता पण त्यानं मोह आवरला.

समोरच त्याला मोठं फटाक्यांचं दुकान दिसलं म्हणून बापू थांबला. उशीर झाला तरी नुसती गर्दी उसळली होती. 'पोरं, त्यांच्या आया पण

कशापाय आल्यात्याय फटाकडं न्यायला.' त्याचं कावरंबावरं ध्यान बघून दुकानदारानं विचारलं, "पावणं, काय पायजे?" त्याच्या त्या स्वागतानं बापूचा चेहरा आकाशकंदीलाप्रमाणे उजळला.

"फटाकडं पायजेत."

"कुठलं पायजेत? लवंगी, लक्ष्मुतोटा, आटमबाम्ब, भुईनळं, फुलबाज्या, सापगोळ्या, भुईचक्र. ये, त्यांना दाखव रे ऽ"

"एवढं कशाला, बारक्या पोरांला पायजेत. एवढ्या पैशाचं द्या थोडं, थोडं..." बापूनं दुकानदाराकडं पैसे दिले. दुकानदाराने लहान मुलं उडवू शकतील असं फटाकं प्लॅस्टिकच्या पिशवीत भरलं. ती पिशवी बापूच्या हातात देत म्हणाला, "घ्या पावणं."

"एवढंच?"

"पावणं महागाई लय वाढलीया. काय करायचं?"

बापूचा उत्साह मावळला. 'तरी नसल्यापेक्षा आपल्या कष्टालाच काय किंमत नाही. बाकी सगळ्याला आहे.' बापूला भरून आलं. एवढीशी पिशवी सांभाळीत बापू निघाला. ओढ्याकाठानं न जाता मेनरोडनं निघाला. गाव संपलं, दिव्यांचा चमचमाट अन् गोंधळ गलका लांब मागे पडला. खांबाच्या दिव्यांचा उजेड फक्त वाट चालण्यापुरता होता. एकदम हलकं, वाटलं बापूला. रस्त्याच्या एका कडेला बसला. बिडी पेटवून निवांतपणे धूर सोडू लागला. पोट रिकामं होतं. तशी पोटाला रिकामं रहायची सवयच झालीय. पोरान्ला न्हाय असं गरिबीत खितपत पडू द्यायचं. शिकवायचं पोरान्ला. मनाशी निश्चय करीत बापू उठला. खूप थकल्यासारखं वाटत होतं. सावकाश चालू लागला. बापू घरी न जाता अलीकडं परड्यात झोपला. मोडकळीला आलेली बाज होती. गुराढोरांच्या राखणीसाठी रोज इथंच झोपायचा. कधी मधी सकाळच्या पारी किस्नाबाय चहा घेऊन जायची. गरिबीत तेवढंच सुख. बापूला झोप कुठली यायला? या कुशीवरनं त्या कुशीवर करत होता. रिकाम्या पोटामुळं उशिरा कधी तरी ग्लानीतच डोळा लागला.

बापूला जाग आली तेव्हा सूर्य कासराभर वर आला होता. गुरे हंबरत होती. शेणाचा काला झाला होता. गुरांबैलांपुढं मूठ मूठ वैरण टाकली. शेण नुसतं बाजूला सरकवलं. पटका गुंडाळून पिशवीला जपत निघाला. 'उशीर झाला म्हणून आई आता शिमगा करील. आयचं त्वांड मजी आटमबाम्बच. तरी पोरं फुसक्या गोळा करत्याती.' कधी एकदा पोरांच्या हातात फटाकं देतोय असं बापूला झालेलं. 'गरीब आसलो म्हणून काय झालं, पाटलाची हायती पोरं. शीरमंताच्या पोरांनी उड्या मारत फटाकडं वाजवायचं अन् माझ्या पोरांनी टुकूटुकू बघायचं नुसतं. माझ्या पोरांनी... या बाळूबापूच्या पोरांनी लाचार होत फुसक्या गोळा करायच्या? छ्या !' गल्लीच्या चौकात मास्तरचं पोरगं फटाकडं वाजवत होतं. चंद्रकांत आणि सूर्यकांत एका बाजूला उभा राहून बघत होते. बापूला बघताच घराकडे पळू लागले. तसं बापू म्हणाला, ''चंद्या ऽ जा घरातनं उदबत्ती पेटवून आण.'' बापूच्या हातात फटाकं बघून मास्तरचं पोरंग जवळ आलं न् म्हणालं, ''चंद्या, ही घे माझी उदबत्ती. चल आपण वाजवू फटाकडं.''

''जपून वाजवा रं.'' बापू म्हणाला. पोरांच्या डोळ्यात पणत्या तेवल्या. तोंडावर लाडू-कानवले खाल्ल्याचं तेज आलं. बापूचं गोड फराळ खाल्ल्याप्रमाणे पोट भरलं, मन भरलं. फटाक्यांच्या कडकडाडात दिवाळी सुरू झाली.

# शर्टाची गोष्ट

कडूस पडलेलं. गुराखी गुरा-मसरांना गावाकडे वळवत होते. मोलाच्या बायकांची घराकडच्या ओढीने पावलं भराभर पडत होती. प्रत्येकीच्या डोक्यावर काही ना काही होतं. कुणाच्या डोक्यावर जळाण-काटूक तर कुणाच्या डोक्यावर शेरडा-वासरांसाठी गवताचं ओझं होतं किंवा दोन्हीही हातात शेळीची दोरी. दोन-तीन शेळ्या-करडे असली तर त्यांना हाकायला काठी.

सुशीलानं गवताचं ओझं गोठ्यात टाकलं. घरासमोरचं छोटं छप्पर गुरावासरांसाठी बांधलेले. आतल्या बाजूला गुरांची दावण. बाहेरच्या मेढीला

शेरडं बांधायची. छपराच्या एका कोपऱ्यात पावसाळ्यासाठी जळाण-लाकूड साठवून ठेवलेला. तिनं गवताचं ओझं टाकताच सविता सोप्याला टेकून बसलेली उठून आली. शेरडांच्या गळ्यात दावं अडकवून, बिरडं फुटत नव्हतं तरी तसंच ताकद लावून फोडलं. त्यात गाठ अडकवून ओढून घट्ट बसवली. सुशीलानं तिच्याकडं भरल्या मनानं बघितलं. आज न सांगता उठली. शेरडं बांधली पण चेहरा उतरल्यासारखा का वाटतोय? काळजाला कुठं तरी चरा पडला 'शाळेत झालं आसंल काय तरी' सुशीलानं मनाला समजावलं. सविता अभ्यासात हुशारच आहे. आपल्या वाटणीचं काम करून पट्दिशी अभ्यासाला बसणार. मग तिला पुटूपुटू कामासाठी उठवलेलं चालणार नाही. त्यासाठी संगीता एका पायावर तयार असायची. काळ्यांची मोना अन् सविता दोघींची चढाओढ असती; पहिल्या नंबरासाठी. संदीप उंबऱ्यातच पुस्तक घेऊन बसला होता. सुशीलाला बघितलं की उठलाच. कमरेला विळखा घालत म्हणाला, "आयं, खेळायला जाऊ का?"

"च्या पिऊन जा की."

"माघारी येतू की च्या प्यायलो."

"जा." पोरगं भारी हुशार. आई नसली तर घरातच बसणार. उगा भांडणात पोरांची मारामारी झाली की आई ओरडणार. मग ताकीदच दिलेली मी घरात नसताना खेळायला जायचंच नाही. अभ्यास करायचा. घराची राखण करायची. त्यामुळं अभ्यास पण चांगला होऊ लागला. पहिल्या पाचात तरी येणारच. संगीता अभ्यासात थोडी कच्ची होती. पण लई धटाची मावशी. रात्रीच्या वेळी कुणाला बाहेर कुठं जायचं म्हटलं की सोबतीला संगीताच जाणार. पण आता कुठं दिसंना सुशीलाला. तिनं विचारलं, "संगी कुठंय ग?"

"साखर आणायला गेलीय दुकानात." सवितानं माहिती पुरविली.

"पैसं व्हतं का डब्यात?"

"होतं ग. म्हणून तर गेलीय ना." सविता मिश्किलपणे आईकडे बघत म्हणाली. उधार आणणं तिला कधीच आवडलं नाही. ऋण काढून सण करणं तिला कधीही मान्य नसायचं. सुशीलाने बाहेरच्या रांजणातले पाणी

तवलीने घेतले. तिथेच दगडावर हात-पाय तोंड धुतले. चूळ भरून तोंडावरून पाण्याचा हात फिरविला. घरात जाऊन फळीवरचा तांब्या घेतला. त्याचं बुड साडीला पुसत डेऱ्यात बुडवून भरून घेतला. चुलीजवळ भिंतीला टेकून बसली. पदराने तोंड पुसलं. पाणी दिली. कावलेला, तहानेला जीव थंडगार झाला. मनाला शितलाई आली. रिकामा तांब्या खाली ठेवला. श्रांत झालेला जीव थोडा विसावला. सविताने चुलीत बारीक काटक्या घालून त्यावर चिमणीतलं थोडं रॉकेल ओतलं. काडेपेटी शोधत म्हणाली, "आयं, तात्या शर्ट घालून गेल्यातंय."

"आँ?" सुशीलाच्या काळजाचं पाणी पाणी झालं. त्यामुळे तिची उलघाल वाढली. "किती वाजता गेलं?"

"चार वाजता." सवितानं काडी ओढून चुलीत काटक्यावर लावली. भपकन जाळ वरपर्यंत आला. तिनं चहाला पाणी ठेवलं. तेवढ्यात संगीता साखर घेऊन आली. साखरेची पुडी सविताजवळ दिली.

"संगे ऽ, तात्या शर्ट घालून गेलं व्हय?" सुशीलानं खात्री करून घ्यावी म्हणून विचारलं. सविता खोटं थोडंच सांगणारेय. अशा गोष्टी नेहमी खऱ्याच असतात. तरी मनाला वाटतं हे खोटं असावं. म्हणून मग ह्याला त्याला विचारलं जातं. आपल्याच बाबतीत असं का होतं? म्हणून चाललेला मनाचा आक्रोश असा बाहेर पडतो.

"हो." दोन पायावर आईला चिकटून बसत संगीता म्हणाली. "आगंऽ पण तुम्ही कुणीच काय त्यांना बोललं नाही?"

"खवाळलं आसतं मजी?" सविता पातेल्यात चहाची पूड टाकत म्हणाली.

"संदी ऽ प" सुशीलाच्या हाकेसरशी संदीप आत आला. धापा टाकतच म्हणाला, "काय गं?"

"तात्या शर्ट घालून गेलं व्हय?"

"हो ऽ." चुलीवरचं चहाचं पातेलं पाहून संदीप तिथंच बसला.

"माझं काय खरं वाटंना का ग?" सविता वैतागली.

"आगं ऽ पण आता काय करायचं? परत माघारी घरी कसं येत्यालं ग?" सुशीलाच्या बोलण्यानं पोरं पण गंभीर झाली. तात्या घरी यावेत म्हणून काय करता येईल याचा विचार करू लागली.

"आयं, मामा येणारेयत म्हणून फोन करायचा का? त्यांच्या हापीसात! मजी येत्यालं लवकर." संगीता.

"हो ऽ आई तसंच करू." सविता म्हणाली "चहा पिऊन जा बुथवर फोन करायला." तिनं चहाची कपबशी सुशीलापुढे सरकवली.

"आता च्या कसा उतरल घशाखाली?"

"आयं, पी गं लवकर. चल फोन करायला जाऊ." संगीतानं असं म्हणून बशीत चहा ओतून पिऊ लागली. सगळेच चहा पिऊ लागले. चहा पितानाचा फुर्र ऽऽ फुर्र ऽऽ आवाज फक्त होता. सगळ्यांचा चहा पिऊन झाल्यावर सविता कपबशा गोळा करत म्हणाली, "तात्यांनी तिकडूनच मामाला फोन केला तर?" प्रश्नाचं पिल्लू सोडून ती एकेक कप धुवू लागली.

"खरंच की, आता काय करायचं मग?" सुशीलाला गळून गेल्यासारखं झालं होतं. डोळ्यापुढं फक्त अंधारच अंधार.

"मग पुण्याचं काका येणारेयत म्हणून करायचा का फोन?" संगीताकडं तिनं कौतुकानं बघितलं. ही पण काही कमी हुशार नाही !

"व्हय की. त्यांचा फोन नंबर तरी कुठं माहितेय त्यांना." मिट्ट काळोखात मिणमिणत्या उजेडानं निदान आपण कुठे तरी आहोत याचं तरी भान आलं.

"सविता, तू नू संगी जाऊन फोन करून या की. बघू काय म्हणत्यात. मला लय कट्टाळा आलाय." सुशीला विसावत म्हणाली.

"नगं बाई ! तात्यांनी दुसरं काही विचारलं तर मला न्हाय सांगायला यायचं. तूच जा आपली." सविताने कपबशा धुवून शेल्फात ठेवू लागली.

"सैपाक डब्याबरोबरच केलाय ना सगळा"

"सगळं झालंय. आता मी अभ्यासाला बसणारेय." सविता म्हणाली, "कुणी उठवू नका."

"तात्या शर्ट घालून गेल्यातंय अन् तुला अभ्यास तरी कसा करू वाटतूया ऽ"

"उद्या सरांची बोलणी खायला लागत्याली." सविताला वाटलं हे ह्यांचं रोजचंच रडगाणं. ह्यांच्याबरोबर आपण रडत बसलो तर आयुष्यात फारसं काहीच करू शकणार नाही. इथून बाहेर पडायचं असेल तर जास्तीत जास्त अभ्यास करून मेडिकलला जायचं.

"बरं संगे, चल आपुन जाऊ. तिला करूंदी अभ्यास." सुशीलानं डब्यातलं पैसे हातात घेतलं. जाता जाता आरशात बघितलं. केसावरून कंगवा फिरवला. कुंकू नीट लावलं. सावळा, गहूवर्ण रोजच रानात जावं लागायचं त्यामुळे काळाच झालेला. ह्या काळ्या रंगामुळं तर आपण गरिबाघरी पडलो ना ! तिच्या डोळ्यात पाणी तरारलं. माहेरची परिस्थिती खाऊन-पिऊन सुखी. घरातल्या लेकी-सुनांना उन्हाच्या झळा लागल्या नाहीत. आढ्याच्या सावलीत राहिलं तरी रंग गोरा थोडाच होणारेय ! किती दिवस (किती वर्षं?) लग्न जमत नव्हतं. मोठ्या श्रीमंताघरच्यांना गोरीपानच बायको हवी असते. दशरथनं पसंत केलं. खरंच पसंत पडली त्याला सुशीला ! नंतर म्हणाला, "तुझं हरणासारखं टपोरं डोळं लय झकास वाटलं, आवडलं." दशरथ गोरा, नीटस, उंच, रुबाबदार, गरिबीत बी. ए. पर्यंत शिकला. शेतीचा तुकडा. नोकरी नव्हती तरी इच्छा नसताना घरच्यांच्या भुणभुणीमुळं लग्नाचा उमेदवार व्हावं लागलं. सुशीलाचा सावळा रंग असला तरी सुखवस्तुपणाचे तेज, वागणं, बोलणं, सगळं शालीन खानदानी होतं. त्यात तिचे टपोरे बोलके डोळे. डोळ्यांच्या रसरशीतपणामुळे ती सर्वांचं मन जिंकून घ्यायची. प्रश्न विचारताना नजरानजर झाली अन् तिच्या नयनकमळात त्याचा हृदयभ्रमर अलगद अडकला. पसंती कळवली. सुशीलाच्या वडिलांनी फार ताणून धरले नाही. मुलगा सुस्वभावी, सुंदर वाटला. शिकलेला आहे. आज ना उद्या लागेलच नोकरी. शेती आहेच म्हटलं तर पोटापुरती. पिकवतील. कष्ट करावं लागेल पोरीला पण इलाज नाही. भाऊबंद कुजबुजायचे, काळी, कसला नवरा मिळतोय कुणास ठाऊक? एका नातेवाईकानं तर बिजवराचं स्थळ आणलेलं. नाही म्हटल्यावर

म्हणाला, ''असल्या पोरीला कुठला चांगला नवरा मिळणारेय? इथं खाऊन पिऊन तरी सुखील राहील.'' तेव्हाच ठरवलं तिच्या वडिलांनी, 'गरीब असला तरी चालेल पण मुलगा उजवाच असायला पाहिजे.' सुदैवाने दशरथने सुशीलाला पसंत केले. दशरथ सुंदर तर होताच पण सुस्वभावीही वाटला. शिकला आहे.

नवेनवलाईचे दिवस सुशीलाचे फार सुखात गेले. दशरथचे प्रेम, घरातील सगळीच माणसं मोठ्या घरच्या सुशीलाशी चांगली वागत. फुलपंखी दिवस सणावारात भराभर संपत होते. एकत्र कुटुंबात गरिबीची झळ जाणवलीच नाही. सुशीला त्यांच्यातलीच होऊन गेली. पहिली बेटी धनाची पेटीच घेऊन आली. दशरथला एस. टी. महामंडळात कंट्रोलर म्हणून नोकरी लागली. सुरवातीला लांबच्या गावी नोकरीवर रुजू व्हावं लागलं. घरात दुसऱ्यांदा पाळणा हालला. संगीताचा जन्म झाला. नव्या कुरबुरी आणि धुसफुसी वाढल्या. दशरथचा पगार बाहेरगावी राहण्यात, खाण्यातच संपू लागला. अशातच सुशीलाला तिसऱ्यांदा दिवस गेले. ८-१५ दिवसांनी दशरथ यायचा तेवढाच काय तो आधार तिला. घरातल्यांच्या अपेक्षा पुऱ्या होत नव्हत्या. सगळ्याला तोंड द्यायची सुशीलात ताकद उरली नाही. ती काही बोलायचीही नाही. तिला दुसरा पर्याय दिसतही नव्हता. नवरा बाहेरगावी असताना आपण वेगळंही राहू शकणार नाही याची तिला कल्पना होती. पण तिच्या जावेला तिचं तिसरं बाळंतपण करायची मुळीच हौस नव्हती. मग सर्वांनीच विचार करून वेगळी चूल मांडली. नव्या स्वतंत्र संसारात संदीप जन्मला. सगळी उस्तवार आईनं केली. महिनाभर राहिली. तीन मुलं कधीतरी येणारा नवरा. सुशीलाच्या कष्टाला सीमाच राहिली नाही. माहेरचा होता तरी.... मुलं हुशार निघाली. तिचे भाऊ म्हणाले मुलांना चांगले शिकव. त्यांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करू नकोस. त्यांना काही कमी पडू देऊ नकोस. आम्ही आहोत ! त्याच आशेवर सुशीलाला कष्टाला बळ मिळत होतं. दशरथने शेजारच्या गावात बदली करून घेतली. थोडा फार पगार घरी येऊ लागला. तरी वाढत्या वयाच्या पोरांची भूक बी

वाढतच होती. सगळ्यांचं करता करता सुशीला खंगून गेली. तिचं दशरथाकडं दुर्लक्ष व्हायला लागलं. घरातल्या वाढत्या कटकटीमुळं दशरथ मित्रांच्या संगतीत जास्त राहू लागला. त्याच्याही नकळत दारूच्या आहारी गेला.

"आयं, झालं का? चल की लवकर." संगीतानं बाहेरून हाक मारली. सुशीला भानावर आली. पदर नीट डोक्यावरून घेतला. चपला घालून संगीताला म्हणाली, "चल."

"पैसं घेतलं ना?" संगीतानं विचारलं.

"हो. हे काय घेतलं की." रुपायाची दोन-तीन नाणी दाखवत सुशीला म्हणाली. रस्त्यानं चालू लागली तसे विचारांचं मोहळ पुन्हा डोक्यात घोंगावू लागलं. मुलं लहान, त्यांचं करायचं, म्हशी, शेळ्या, कोंबड्याकडं बघितलं न्हाय तर पोरांना खासभर चांगल खायला कुठून घालणार? त्यातनंच चार पैसे सुटतही होते. दशरथचा निम्मा पगार दारूतच जात होता. नुसती दारूच पित नव्हता तर पिल्यावर चार-चार दिवस गायबच. किती सांगितलं की, 'घरी येत जा.' सुरुवातीला सुशीला बडबड करायची म्हणून मग पिलं की घरी येणंच बंद केलं. दारू पिल्यावर बायको रागावणार नाहीतर काय पाया पडेल? घरी आल्यावर म्हणायचा, "पिल्यावर तुझ्यापुढं येऊच वाटत नाही." तिला वाटायचं 'आपून काय खातुया व्हय ह्यांना !' दिवस भराभर संपत होते पण पिणं हळूहळू वाढतच चाललेलं. नशेत मग दुसऱ्याच कुणाच्या तरी घरी जायचं. ओळखीचे लोक घरी आणून सोडायचे पण अनोळखी घरी पिणारा माणूस गेल्यावर काय हालत होईल? या विचाराचा कडू-जहर घोट सुशीलानं गिळला. मारहाण, भांडणं, भाऊबंदांना तमाशा वरचेवर बघायला मिळू लागला. नणंदेला तिची ही ससेहोलपट बघवेना. तिनं कुठला तरी देवऋषी बघितला. त्याच्या सल्ल्याप्रमाणे दोन बकरी कापली. जागरण गोंधळ घातला. सुशीलाच्या भावानं सगळा खर्च केला. देव शांत झाला आणि दशरथची दारू खरंच सुटली. दोन-तीन वर्ष अजिबात हात लावला नाही. किती सुखात गेली ती वर्ष. नोकरी करून शेती बघताना गुरासारखा राबायचा दशरथ. आईबापाचं कष्ट बघून पोरं पण झटून अभ्यास करायची. केवढं समाधान मिळत होतं. सुख यापेक्षा आणखी वेगळं काय असतं? हे

सुखाचे दिवस कसे संपतात कळतच नाही. संपावेत असंही वाटत नाही. तरी नियती तिचे फासे टाकतच राहते. सूर्याला ग्रहण लागतं तर सुखाला का नाही लागणार? की देवाच्या पोटातली दोन्ही बकरी संपली कुणास ठाऊक. अन् दशरथने पुन्हा प्यायला सुरुवात केली. खाकी गणवेषावरच जायचा न् ड्युटी संपली की सहा वाजता सायकलची घंटी वाजवत यायचा. पण हल्ली हल्ली खाकी गणवेषावरून साधा खाजगी शर्ट घालून जायचा अन् सहाची सायकलची घंटी वाजायची नाही. सहाला घंटी वाजली नाही की सुशीलाच्या हृदयाचा ठोका चुकायचा. साधा शर्ट घालून गेला दशरथ की सहाची घंटी वाजायचीच नाही. अगदी चार-चार दिवस. आता हे नेहमीचंच झालेलं. सुरुवातीला चौकशी तरी करणारे भाऊबंद आता दुर्लक्ष करू लागले. एवढा पसारा, गुरं-ढोरं, पोरं सोडून ती तरी कुठं कुठं शोधणार? गावात असलं तर ठीकच कोणी तरी येऊन सांगायचे किंवा आणून सोडायचे. पण परगावी ती कशी जाणार? मग भावाला फोन करून कळवायचे. तेवढाच आधार. आजही दशरथ शर्ट घालून गेलाय म्हणूनच सगळे चिंतेत आहेत. ड्युटी संपल्याबरोबर त्याने घरी यावं म्हणून फोन करायला सुशीला निघाली पण तिचं काळीज चांगलंच धडधडू लागलं. तिनं संगीताचा हात हातात घेतला. दोघी एकमेकींना आधार देत चालू लागल्या. टेलीफोन बुथमधून तिनं दशरथला त्यांच्या कंट्रोल ऑफिसमध्ये फोन लावला. नशीब ! दशरथ जागेवर होता.

"आवो, मी सुशीला."

"का गं? काय झालं?" पलीकडून धास्तावला आवाज.

"लवकर घरी यायचं जमंल का?" सुशीलानं मऊ आवाजात विचारलं, "काय कामं य आता? कालच तर उसाला पाणी पाजलंय." दशरथ वैतागला.

"काम काय न्हाय वं. पुण्यावरनं दाजी आलं व्हतं. पंढरपूरला गेल्यातंय. ते जाता जाता आलं व्हतं घरी. नुसता च्याच पिऊन गेलं. नऊ-दहा वाजेपर्यंत जेवायला येतू म्हणाल्यातंय." एका दमात सुशीला बोलली. तिला धाप लागल्यासारखं झालं.

"मग येऊ दे की. मटण आण कर सैपाक."

"आता अंधार पडलाय मटण कोण आणायचं? तुम्हीच येताना घेऊन या की." आपल्याला हे कसं सुचलं याचं तिलाच आश्चर्य वाटलं.

"बरं बघतो."

"बघतो न्हवं मटण घेऊनच लवकर या." सुशीलानं फोन ठेवला. वाटेत राधामावशी भेटल्या. "सुशीला कुठं? फोन करायला गेलतीस व्हय?"

"हो. तुमी कुठं?" त्यांच्या हातातला डबा पिशवीकडं बघत सुशीला म्हणाली.

"रेशनींगचं राकेल आलंय. रांग लागलीय. जाती लवकर नंबर लावायला."

"मावशी संदीपला डबा घेऊन लाऊन देती. त्याचा पण तेवढा नंबर लावा की." सुशीला अजीजीनं म्हणाली.

"व्हय, व्हय. लौकर दी लाऊन." मावशी लगबगीनं गेल्या.

"संदीप, धर डबा. राधामावशीनं नंबर लावलाय रेशनींगला. राकेल घेऊन ये. तांदूळ कसलाय ते पण बघ." त्याच्या हातात डबा, पैसे देत सुशीला म्हणाली. चांगलंच अंधारून आलं होतं. सुशीलाचं अंग आंबून गेलेलं पण तिन्हीसांजेला झोपू नये म्हणून तशीच भिंतीला टेकून बसली. संगीताला देवाला दिवा लावायला सांगितला. गुडघ्यावर हनुवटी टेकून विचारात गढून गेली. 'कवा न्हाय ते खोटं बोललीया. काय होतंय कुणास ठाऊक? दाजी तर येणारच न्हायीत. पण ह्यान्ला आल्यावर काय सांगायचं? मारहाण, भांडाण, तमाशा, नक्को झालंय सगळं. किकला जीव. कुठं तरी पळून जावं वाटतंय. पण ही एवढी सोन्यासारखी पोरं सोडून जायचं तरी कुठं? एकदा ताईला म्हणलं जाती पोरान्ला घेऊन अण्णांकडं? तर ताई म्हणाली, "येडी हाईस का? इथं किती केला तरी तुझा हक्काचा संसार आहे. घर, गुरं, ढोरं, शेत आहे. तिथं भाऊ-भावजयीच्या संसारात तुझं काय स्थान आहे? इथं मालकीण आहेस तू. तिथं कोण? अन् दाजींना तरी कोणंय तुझ्यशिवाय?" तवापास्न माहेराला जायचा विचार मनातून काढूनच

टाकला. पण थकला जीव, किती मरमर धावायचं?" सायकलच्या घंटीनं सुशीला विचारातून जागी झाली. तिचा जीव उभारला. मरगळ गेली. संदीप पण तिकडून पांढऱ्या पिशवीत डबा घालून येताना दिसला. दशरथला वाटले मटणच घेऊन येतोय. सायकल उभी करत म्हणाला "कुठनं आणलं रे?"

"नेहमीच्याच दुकानातनं." संदीप म्हणाला.

दशरथला वाटलं आता मटण पण आणलं. पावणं येईस्तोवर रानातनं चक्कर टाकून यावं. पोरं खुश झाली. आजच्या दिवसापुरतं ग्रहण सुटलं होतं. सुशीलानं पटदिशी चूल पेटवून चहाला आधण ठेवलं. दशरथनं गणवेशावर घातलेला ढगळ, साधा शर्ट काढला. खाकी गणवेश उतरवून घरातला पायजमा शर्ट घातला. हातपाय, तोंड धुवून चुलीपुढं येऊन बसला. म्हणाला, "झाला का चहा?"

"झाला की, ही काय गाळतीया." सुशीलानं कपबशी त्याच्यापुढे सरकवली. चुलीतल्या काटक्या मागे ओढल्या. "तुला न्हाय व्हय घेत?" दशरथची नेहमीची सवय. एक घोट तरी तिला चहा द्यायचाच. सुशीलाला वाटायचं अर्ध्या कपासाठी यातायात. त्यापेक्षा घेऊच नाही.

"मी आताच घेतलाय रानातनं आल्यावर."

"आणखी घे घोटभर माझ्यातला." त्याने कप सुशीलाला दिला. बशीतला कप फुर्र ऽ फुर्र ऽ करत स्वत: संपवला. बशी ठेवत म्हणाला, "रानात जाऊन येतो." सुशीलाला वाटलं, मटण आणायचं काहीच बोललं नाहीत. त्यांच्या मनात नसलं मटणाचं तर... आपण तरी कशाला विषय काढा. म्हणून मग तीही गप्प बसली. 'न्हायतर इथून पुढं कधी शिजवायचं न् मसाला वाटून कधी करायचं. दाजी तर येणारच न्हाईत. आपण तरी कशाला विषय काढा?' शेळीच्या, म्हशीच्या धारेच्या तयारीला लागली.

दशरथ रानातनं आला. तडक चुलीकडं गेला. कडकडून भूक लागलेली. पावणं येईस्तोवर थोडं कडाण प्यावं. पातेलं उघडून बघितलं तर तुरीच्या डाळीची आमटीच पातेल्यात. दशरथचं जाम डोकं सणकलं. "मटण कुठंय?" अधीरतेने सुशीलाला म्हणाला. त्याला वाटलं मटण करून कुठं

ठेवलं पातेलं हिनं. मी काय खातोय, व्हय सगळंच. मेव्हण्याचीच माया करतीया. त्यानं पुन्हा रागात विचारलं, "कुठं ठेवलंय मटनाचं कालवणं?" त्याच्या आवाज़ातली जरब बघून सुशीला थिजून गेली. आता आपल्यापुढं काय वाढून ठेवलंय या कल्पनेनं ती पांढरीफटक पडली. तिचं काळीज फाकू लागलं. तरी होता होईल एवढं तिनं स्वत:ला घट्ट केलं. अन् म्हणाली,

"तुमाला येतानाच मटण घेऊन यायला सांगितलं व्हतं की. तुमीच आणलं न्हाय." तिनं रानातनं येताना गवारीच्या शेंगा आणलेल्या. ते गाठोडं सोडून निवडत बसली. संगीता मदत करू लागली. दशरथ तरा तरा तिच्याकडं आला. तशी संगीता उठून जाऊ लागली. सुशीलानं खुणेनंच तिला बस म्हणून सांगितलं. तेवढाच आधार. सविताचं अभ्यासातनं लक्ष उडालंच. नुसती खाली मान घालून वहीवर गिरगिटा करत बसली. आता काय होईल सगळ्यांनाच प्रचंड दडपण आलेलं.

"पावणं येणारच नव्हतं. खोटं बोललीस. का सांगितलं खोटं? का?" दात ओठ खाऊ लागला.

"आव्हो येतो म्हणालं नऊ वाजेपर्यंत." कसंबसं धीर गोळा करून सुशीला बोलली.

"मग मटण का आणलं न्हाय? येणारच नसत्यालं न्हायतर मटण आणल्याशिवाय राहिली असतीस व्हय?"

"तुमाला सांगितलं व्हतं आणायला. तुमी का न्हाय आणलं?"

"घरी येऊन पैसे घेऊन मग जाणार हातो मटण आणायला. मी काय एवढं पैसे घेऊन गेलो न्हवतो ड्युटीवर."

"मंग घरी आल्यावर का न्हाय आणलं?" हातातली शेंग मोडत सुशीला म्हणाली.

"संदीपनं मघाशी पिशवीत काय आणलं मग?"

"राकेल."

"मला वाटलं मटणच आसंल. त्याला विचारलं सुद्धा मी कुठनं आणलं तर म्हणाला, नेहमीच्याच दुकानातनं!"

"मग राकेल नेहमीच्याच दुकानातनं आणत्याती की." त्याही परिस्थितीत सुशीलाला हसू फुटतं की काय वाटले. त्यामुळे तर दशरथ आणखी चिडला.

"पावणं येणार आसतं तर आसं गप बसलीच नसती. तू खोटंच सांगितलं. का केलं आसं? मी जातो... मरतो... जातो कुठं बी. माझी कुणाला गरज न्हाय... मला बी न्हाय कुणाची गरज... कुणी वाट बघू नका माझी."

"जावा, दाजी आलं तर काय सांगू?" तिला वाटलं आता भूक लागली कुठं जाणारेयत.

"ते कशाला येत्यातंय? तुमची सगळी नाटकं कळली मला. जातो मी. तिकडं डुटी सोडून आलोय." त्याने कपडे घालायला सुरुवात केली. त्याचं ते निर्वाणीचं बोलणं ऐकून सुशीला घाबरली. पुढचं इघ्न टाळण्यासाठी घरातच काय होईल ते होईल. तिला कुठूनसं बळ आलं.

"दाजी जर आलं तर सगळं सांगीन मी. खोटं कशाला बोलू? जाताना हितनं च्या पिऊनच गेलं. काम वाढलं तर मुक्काम पडल म्हणालं. काम संपलं तर येतो म्हणालं नऊ-दहा वाजेपर्यंत. पण आलं तर तुमचं काय खरं न्हाय." सुशीला कधी नव्हे ती धिटाईने बोलत होती. पोरं पण अवाक् झाली. दशरथने आता बाहेर जाऊ नये यासाठी तिची धडपड चालली होती. तो बाहेर गेला की पिणार अन् कुठं तरी लोळत पडणार चार दिवस. ते टळावं म्हणून ती खोटंच काय काहीही बोलायला, करायला तयार होती. अगदी युद्धाच्या पावित्र्यात उभी होती दारात. काही झालं तरी मागे हटणार नव्हती. दशरथला बाहेर जाऊनही देणार नव्हती. तिच्या या ठामपणामुळं, कणखरपणामुळं दशरथ नरमला. 'त्याला वाटलं खरंच पावणं आलं तर आपण उघडं पडणार. पुण्याचं पावणं म्हणजे सुशीलाच्या बहिणीचे पती. मामलेदार. कडक शिस्तीचे. कामाला वाघ. पण सुपारीच्या खांडाचं व्यसन नाही. आपण दारू सोडल्यापासून वरचेवर मेव्हणीला घेऊन यायचे. दोन-तीन दिवस राहून गरिबाघरची मीठभाकरी आनंदाने खायचे. देवमाणूस. सुशीला एवढं म्हणतीया तर येणारच असत्यालं.' दशरथनं अंगात घातलेला शर्ट काढला. खुंटीवर अडकवला. पुन्हा जुना, मळकट सदरा घालून

सविताजवळ बसत म्हणाला, "किती अभ्यास करतीस? मोनाला मागं टाकणार वाटतं यंदा !" सविता गालात हसली. पुन्हा अभ्यासात मन वळवू लागली.

सुशीलानं संगीताकडं बघितलं. ती खुशीत येऊन गवारी टुचू टुचू मोडत होती. संदीप पुस्तक घेऊन तात्यांना तक्क्यासारखा रेलून बसला होता अन् मोठ्यानं कविता पाठ करत होता,

"सदैव सैनिका...
पुढेच जायचे
न मागुती
तुवा फिरायचे..."

# अधू

"माझी वनी आज यायचीय तिला खारं वांगं लयं आवाडतं." गंगूवैनीनं वांगी चिरून विळी कोपऱ्यात उभी करून ठेवली. चुलीवर चहाला आधण ठेवलं. चहाचं पातेलं बघून सोनामावशी खुश. "मंग आताच करून ठेवताय व्हय?" म्हणत लसूण सोलू लागल्या. शेतात भांगलायला मजुरी करणाऱ्या बाया घरी आल्या तर चहा घेतल्याशिवाय जायच्या नाहीत. ठेंगणी, काळ्या-सावळ्या रंगाची, अपऱ्या नाकाची गंगूवैनी सोनामावशीला म्हणाली, "आवो, आता सकाळच्याच एस. टी. नं येणारेय. रातीच नागपुरात बसली आसलं. पहाटं उजाडतानाच बारामतीत आली आसंल. पहिल्या गाडीनंच इल आता."

“नागपूरला गेलीय व्हय?” लसणाच्या सोललेल्या पाकळ्या वाटीत ठेवत सोनामावशी म्हणाल्या.

“हो. आता वना नसती गावाकडं. नवऱ्याच्या मागंच आसती. तिचा दीर पण तिथंच असतू. परवा दिशीच इकास गेलाय आणायला.”

“काकी कुठं धुणं धुवायला गेल्या का?”

“हुं.” म्हणत गंगूवैनीनं चहात दूध ओतलं.

‘तिला धुण्याचंच पडलेलं असतं. बरं झालं तपल्या मनानं गेली ती. न्हायतर कसलातरी सैपाक ठेवला असता करून.’

“काय सोनामावशी, आज खुरपायला न्हाय का जाणार?” वशाबापूनं अंगणातनं विचारतच आत आला. “नदीकडंचं कालच झालं खुरपून. आता कुठं सुरवात करायची तेच इचारायला आलीय.” सोनामावशी डोक्यावरचा पदर नीट करत जरा सरकून बसल्या. ‘रामकाठीतच जावा. मळ्यात कालच पाणी दिलंय. अजून वापसा आला नसंल. तोवर रामकाठीतलं कडवाळ खुरपून व्हईल.” भिंतीचा आधार घेत वशाबापू बसला. “मला उशीरच व्हईल. वनाला जेवायला घालती नू मंगच येती.” गंगूवैनीनं दोन कपात चहा गाळला. वशाबापूला एक दिला. एक मावशीला. चहाचा कप बघून बरं वाटलं तरी वशाबापू म्हणालाच, “सारखा कशाला च्या करता?” “राहू द्या मंग.” गंगूवैनी. “आता दिलाय तर घेतू. पुढं आलेल्या अन्नाला न्हाय कसं म्हणायचं. है का न्हाय मावशी.” पदराआड तोंड लपवित सोनामावशी हसू लागली.

“नकू नकू म्हणायचं नू साडेतीन हाणायचं.” गंगूवैनीनं चुलीतला काळपट भाजलेला कांदा काढला. पाट्यावर ती मसाला वाटू लागली. सोनामावशीनं कपबशी भांड्याच्या घमेल्यात ठेवून निघाली. “मावशी, वायच लक्ष द्या बायांकडं. मालक न्हाय म्हणलं की बसत्यात्या मिश्री लावत.” “व्हय, व्हय. माझं आसतं लक्ष पण तुमी या लवकर.”

गंगूवैनीनं चुलीवर पातेलं ठेवलं. पातेलं तापेपर्यंत वांग्यात वाटलेला मसाला भरला. पातेल्यात तेल ओतलं.

"काय बी म्हन वना लांब नागपुराला गेलीय खरं पण शेरगावात राजाराणीचा संसार कसा झकास चालला आसंल बघ." दाढीच्या खुंटावरून हात फिरवित वशाबापू म्हणाला. "दीर पण हाय की तिथंच." गंगूवैनीनं तापलेल्या तेलात भरली वांगी टाकली, तसा चर्र आवाज आला. "मला बी लय वाटायचं शेरगावात घर असावं. सगळ्या पोरान्ला तितंच ठिवून शिकवावं पण न्हाय जमलं." सुस्कारा सोडत डोक्यावर हात फिरवत वशाबापू म्हणाला, "पोरगी राहतीया आता. जिवाला बरं वाटतं." भारावून बोलताना खंतही होती कुठं तरी. उंचेला, गोरा रंग, भरपूर मिशा. पोरवयात तालमीत दंडबैठका काढलेल्या. मजबूत बांधा. घरची शेतीवाडी, गुरं, कशाचीच ददात नव्हती, एक शिक्षण सोडलं तर ! त्यामुळं पोरांनी तरी शिकून मोठं साहेब व्हावं, शहरात रहावं. असं त्याला खूप वाटायचं. बारामतीला घर किंवा जागा घेण्यासाठी चौकशीही करत होता. पण एकदा ताप आला न् वशाबापूच्या अर्ध्या अंगातून वारं गेलं. गंगूवैनीची सेवा, आईबापांची पुण्याई, डॉक्टरच्या प्रयत्नांनी वर्षभराने वशाबापू बिनकाठीचं चालू, फिरू लागला. पण डावा पाय ओढतच. मुलं मोठी होता होता शिकत होती. वनिता, विकास दोघंही मॅट्रीकला धडक मारून आले. गणित, इंग्रजी नाहीच सुटला. मग शिक्षणच सोडून दिलं. वनिता वशाबापूवर गेलीली. चांगला नवरा मिळाला. पोरगी सुखात आहे याचं समाधान होतं.

दादांनी मळ्यातनं मक्याची कणसं सोलूनच आणली. चुलीपुढं ठेवत म्हणाले, "उकडत ठेवा मीठ घालून, येता जाता खाईल वना." "तिकडंच ठिवायची. मला उशीर हुतूया. बाया लावल्यात्याय." चुलीपुढंच्या ढिगानं गंगूवैनी वैतागली. डोक्यावरचा रेशमी पटका तसाच घामेजल्या चेहऱ्यावरून फिरवत खुंटीवर ठेवला न् म्हणाले, "बघू मी पातेल्यात भरतू." मध्येच कणसं ठेवल्याची चूक त्यांना उमगली. तेवढ्यात मोठी आय, वनाची आजी आली. "सरा बाजूला. पसारा घालताना समजत न्हाय." तिनं मोठं पातेलं घेऊन कणसं त्यात भरली. सुनेला म्हणाली, "उठ. मी टाकती भाकरी. तू जा चार घास खाऊन." "असू द्या. वना आल्यावर जेवती मी." "तिला न्हाय उपाशी ठेवत. तू जेव. तवर येतीया ती. तिचं त्वांड

बघ नू जा." गंगूवैनी चरफडत उठली. 'लेक इतक्या दिवसांनी यायचीय तरी रान सुटत नाही. नवऱ्याला कष्टाची कामं होत नाहीत तर आपण करायलाच पाहिजेत. लग्नाचा भार सगळ्यांनी पेलला. आता कामाला मागं सरून कसं चालेल.' तिनं हात धुतला. तेवढ्यात वनाचा चुलता आला, "वाढा जेवायला. आज काय पेशल केलंय वनासाठी?" गंगूवैनीनं मग तिघांना जेवायला वाढलं. स्वतः ताटलीत रात्रीची उरलेली आमटी अन् भाकरी होती ती घेतली.

नदीच्या कडेला येड्या बाभळीची, निंबा-पिंपळाची अस्ताव्यस्त वाढलेली झाडे. तिथंच एस. टी. यायची, तेच एस. टी. स्टॅण्ड. सावली एस. टी. ची वाट बघत बसायची लोकं. गडीमाणसं भट्टीची पांढरी धोड कपडे घालून तर बाया ठेवणीतली पातळं नेसून घोळक्या घोळक्यानं कलकला करत बसलेल्या. धुण्याचे घमेले, बादल्या, पाण्याचे हंडे घेतलेल्या बायांची सकाळची लगबग चाललेली. गडीमाणसं गुरं पाण्यावर नेत होती. बाजूलाच विठूबा न्हाव्याचं पत्र्याच्या शेडमध्ये सलून सजलं होतं. टेपवर सिनेसंगीत कोकलत होतं. बाकड्यावर बसून न्हाव्याच्या पोराची मित्रमंडळी खिदळत होती. सलूनच्या शेजारी दामूअण्णाचं हॉटेल होतं. वर काडांचं छप्पर, भिंती पांढऱ्या मातीनं सारवलेल्या. जमीन शेणानं. दामुअण्णाची परकरी पोर रोज सकाळी हॉटेल झाडून काढायला यायची. टेपवरच्या गाण्याबरोबर गुणगुणत तिचं काम चाले. तिनं केर काढला. केरसुणीवर भरला अणि मागच्या बाजूला टाकला. तिथंच भिंतीवर केरसुणी झटकली. आत आणून दाराच्या मागे ठेवली. कपबशा धुवून, पुसून ठेवल्या. तापलेल्या दुधावर झाकण ठेवलं, "आण्णा, जाऊ का? शाळा भरंल आता." तिथंच अंगणात बसलेल्या आपल्या बापाला तिनं विचारलं. "बरं, बरं, जा. जेवायच्या सुट्टीत ये मजी च्याची भांडी घासून ठिवशील. सारखा च्या करून करून लई काळं व्हतं. मग तुलाच ताप हुतू." "व्हय." म्हणत दामुअण्णाची लेक पळाली. दामुअण्णा तंबाकू मळत एस. टी. ची. वाट बघत बसला.

आभाळात उडालेल्या धुळीच्या लोटाबरोबर एस. टी. बसचा आवाज आला. तशी सगळीजण ढुंगणावरची माती झटकत उठली. दामुअण्णानं तंबाकू तोंडात कोंबली न् स्टोव्हला पंप मारू लागला. भरधाव येणारं ते धूड आपल्याच अंगावर येतं की काय म्हणून बायामाणसं एका बाजूला झाली. गाडी वळवून लावली अन् ड्रायव्हर, कंडक्टर ऐटीत दामुआण्णाच्या हॉटेलात विराजमान झाले.

"सगळ्यांन्ला उतरू द्या न् मग चढा." नेहमीसारखा पोक्त आवाज. कुणी खिडक्यातून रुमाल, पिशव्या टाकून सीट रिझर्व करून ठेवले. कुणी ड्रायव्हरच्या दरवाजातून आत शिरले. उतरणाऱ्याला दरवाजातला चक्रव्यूह फोडून कसं निसटावं याचा विचार करावा लागत होता. ज्याचं कौशल्य अधिक तो पटकन बाहेर पडे.

"बाजूला सरका की. आमाला उतरू द्या." विकास खेकसला.

"अगं बया, जाधवाची वना का गं?"

"आधी वर चढा मग बोला."

आढ्याच्या सावलीत राहिल्यामुळे गोरेपणाला झळाळी आलेली. पांढराफेकच. झुळझुळीत साडीचा पदर पिनअप करून एका बाजूला सोडलेला. हातात पर्स. पायातले सॅण्डल्स् चमकत होते. माहेराला आलेल्याचा आनंद चेहऱ्यावरून ओसंडत होता. भुरभुरणाऱ्या केसांनी वना शहरवासी झाल्याचं दिसत होतं.

"आरं, ती बघ इक्याची बहीण." सलूनमधल्या टोळक्याचं लक्ष गेलं. "आयला, शेरात गेलं की जाधवाच्या पोरी बी नखरं करत्यात्या की." खांद्यावरची पर्स सावरत वनिता निघाली. "मुराळकी आली दिवाळीला." हौसामावशी डोक्यावरचं धुण्याचं घमेलं घेऊन वनाबरोबर चालू लागल्या. "लय खराब झालीस. लग्न मानवलं न्हाय वाटतं."

विकास हातात सुटकेस घेऊन झपझप घराकडे निघाला. त्याला वाटलं, 'हिची सगळीजण चौकशी करणार. सगळ्यांना सांगत सवरत येणार. आपण आपलं जावं घरी.'

विकास आल्याबरोबर म्हणाला, "आई, आंगूळ करायचीय. पाणी तापस्तोवर जेवू का? लय भूक लागलीया. च्या पण पिलो न्हाय." विकास हातपाय धुवून आला. चुलीवरच्या पातेल्यावरचं झाकण उघडून बघताच त्याचा चेहरा खुलला. "आरं, एकटाच कसा? वनाला आणली का न्हाय?"

काकी म्हणाल्या. "बाईसाहेब येत्यात की मागनं, हळूऽ हळू. रस्त्यातलं दगाड-धोंडं चुकवत."

"आका आली, आका आली." करत सगळी पोरं वाड्यात तिच्यापुढं पळत आली. मोठ्या आयनं भाकरीचा तुकडा अन् पाण्याचा तांब्या घेतला. तुकडा-पाणी वनितावरून ओवाळून लांब वाड्याच्या बाहेर गोठ्याकडे फेकून दिला.

दिवाळी चार दिवसावर आली. बायांची दळणं, भाजण्या, तयार करणं, अनारशासाठी तांदूळ भिजत घालायचं. कितीतरी कामं. नुसती धांदल उडालेली. मुलांची फटाक्यावरची चर्चा बरीच स्फोटकपणे चाललेली. काकीबरोबर वनिता धुवायला नदीवर गेली तेव्हा शिंपल्या, शिरगोळे गोळा करून आणलेले. अंगणातल्या शिकेकाई कुटायच्या उकळात कुटू लागली. "कशाला गारगोट्या कुटत बसलीया? इल इकात आणायला रांगोळी." वशाबापू तिथं बसत म्हणाला. "कुटती की. कशाला पैसे घालवायचे." "आता पोरगी खरी संसाराला लागली." वशाबापू कौतुकाने म्हणाला. "न्हायतर काय ! हाटू बसायची इकातची रंगीत रांगोळी आणायसाठी." मोठी आय म्हणाली. ती वाटी घेऊन अंगणात बसली.

"वना तू एवढी गप का गं? आल्यापास्न बघतिया घडा घडा बोलतच न्हाय." काकी म्हणाली. तिला वाटलं, 'ही आता तासंतास बोलत बसंल, नवऱ्याचं कौतुक सांगेल. लग्न झाल्यावर या घरी आलो तेव्हा वयात येणाऱ्या वनाचीच सोबत व्हायची. आधार वाटायचा. दोघींचं छान मैत्र जुळलेलं. पण कशाचं काय ही तर बया तोंडच उचकटेना.' मोठी आय विलायची सोलून आतले काळेशार सुगंधी दाणे बाजूला काढीत होती. ती म्हणाली, "आता नांदून आलीया फरक पडणारच की. पैला आवखळपणा कसा

राहील? बाईच्या जातीचं आसं ऽ च असतं.'' ''तरी पण लयच खराब झालीया. तोंडावर टवटवीच न्हाय. आपल्याच नादात असतीया सारखी.'' आईची माया बोलली.

''आयं, काय गं सारखं बोलायचं? तू तुझ्या कामाच्या घाईत. दिवसभर रानात. घडीभर तरी बसलीस माझ्याजवळ?'' ''आता बघ न्हाय जाणार रानात.'' गंगूवैनीचं हृदय भरून आलं. खूप वाटायचं पोरीला जवळ घ्यावं. बोलावं पण उठल्यापासून कामाची घाई. दिवसभर मागचं सगळं काकीच बघती. रात्रीचा सैपाक करती म्हणून सकाळचा तरी सैपाक उरकून जावं लागायचं. रात्रीची जेवणं झाली की भांडी घासू लागायची. धरणीला पाठ टेकली की डोळा लागायचा. बोलायचं तरी कधी? सुपातली डाळ फडाफडा पाखडून तिनं स्वच्छ घमेल्यात ओतली. घमेलं उचललं न् गेली गिरणीत. ''हिचं असं आसतं. सारखं काम. कोण सांगतं का? बसली पोरीजवळ तर कोण काय म्हणंल? दळायला काय कुणीबी जाईल की.'' मोठी आई म्हणाली.

''करूंदी माझ्या वाटणीचं करतीया. मी असा बसून खाणारा. तिला कुठं हितागुजाचं बोलाया येतं.'' वशाबापू. त्याचं बोलणं ऐकून काकी फणकाऱ्यानं आत गेली. 'जसं काय आम्ही कामच करत न्हाय. म्हणे माझ्या वाटणीचं करतीया. ह्यांच्या जीवावर तर शेती चाललीया तवा? न्हायतर लेकीचं लगीन कसं केलं आसतं.' तिची धुसफूस, आदळआपट वनिताच्या लक्षात आली. ती म्हणाली, ''आसं कसं म्हणता बापू, काम सगळेच करत्यात की. आपल्या घरात मोठी आय, दादा, तुंमी तरी कुठं बसता. होईल तेवढं करताच की. नांगर तेवढा धरायला येत नाही म्हणून काय झालं.'' ''अगं नांगूर, कुरी धरली तरच शेतकरी न्हायतर काय हाय.'' त्याला आठवलं. गावात आपल्यासारखी कुणाला कुरी धरायला यायची न्हाय. नंबर लागलेलं असायचं. त्याज्या आयला पुरात उडी टाकली नसती तर कशाला आला असता ताप. तवा व्हडाचढ लागलेली. लय मस्ती व्हती. सगळ्यान्ला दाखवाची व्हती आपली ताकद. लय ताकद व्हती. बाळ्याला, किस्नाला मागं टाकलं अन् रातच्याला हाथरूण धरलं. वाटलं

बरं वाटलं एक-दोन दिवसात पण कशाचं काय. काय ती सुताराची छबी भान गेल्यासारखी बघत व्हती आपल्याकडं. तिची नजर लागली आसंल सालीची...

तवा लय बाळ्याच्या मागं लागायची. पण टाकलंन् तिच्या बाळ्याला मागं. आजारी पडल्यावर आली व्हती. तवा हिला वाटलं दोघांचं काय तरी आसंल. तिला समजावता समजावता नाकी नऊ आलं. न्हायच समजली. बापू कितीतरी वेळ भूतकाळात गेला.

मोठ्या पातेल्यात पाक करून घेतला. पक्का झालेल्या पाकाचं पातेलं खाली उतरवलं. गंगूवैनीनं दोन्ही हातानं पातेलं धरलं. नानानं बुंदीचं घमेलं त्यात ओतलं. काकी झाऱ्यानं हलवू लागली. मोठ्या आयनं त्यात मणुके, विलायची टाकली. चांगली मिसळून घेतली. "या आता सगळीजणं लाडू बांधायला." मोठ्या आयनं ऑर्डर सोडली. पातेल्याभोवती जागा मिळेल तिथे सगळे बसले. मोठ्या आयनं एक लाडू वळून वनिताजवळ दिला. "धर, देवाला निवद दाखव. अन् खा. राहू दे लाडू बांधायचे." "आकाचं काय लाड चालल्यातय. आमाला म्हणतंय का कुणी खा." विकास म्हणाला. "तुला काय उपाशीच ठेवलंय." गंगूवैनी असं म्हणताच, काकी म्हणाल्या, "तू नांदून ये तुझं पण आसंच लाड करू न् लाडू खायला देऊ." सगळे खो खो हसायला लागले. वनिता सोडून.

दुपारी करंज्या करायचं चाललं होतं. सारणानं करंजी भरली, करंजीनं सुप भरलं तसं चेष्टामस्करीनं घर भरलं. वनिनाचं मन तेलातल्या करंजीसारखं तळतळत होतं. "भाऊबीज झाली की दुसऱ्या दिवशी शामराव येणारेयत." नाना सांगत आला. करंजीची कड कातरल्यासारखं गंगूवैनीचं काळीज कातरलं. "वना, कडा नीट दाब गं न्हायतर कानावला फुटला की तेलाची नासाडी." वनाची तंद्री लागलेली बघून काकी म्हणाल्या. "हूं. घट्ट, घट्ट दाबून धरायला पाहिजे, तोंड सुद्धा." वना मनातल्या मनातच घुसमटू लागली.

"आगं, आगं एवढं बी दाबू नगंस पोळपाटला चिकटली की पाती." गंगूवैनीनं तिच्या पोळपाटावरची करंजी काढून घेतली न् म्हणाली, "जा. बास कर लाटायचं.'

"अजून येळ हाय म्हणलं शामरावांला यायला." नाना असं म्हणताच वनिता आत पळालीच.

वनिताच्या मनात काहूर माजलं होतं. काय करावं, सांगावं का नको? तोंड आवळलं तरी आत होणारी घुसमट कशी सहन करायची? किती दिवस? अधू असलेला बाप, आता कुठं मिसरूड फुटलेला कोवळा भाऊ, दादा-मोठी आय थकलेले सगळे. नाना-काकीच्या उपकाराखाली. न्हाय सांगावं तर परत त्या नरकात जावं लागंल. तो तर तिथं टपून बसलाय बोका. मलई खाऊन नामानिराळं होणारा. वनिताच्या अंगावर सरकन काटा आला. तिला स्वत:ची किळस वाटू लागली. शिसारी आल्यासारखं झालं. तिला घरात बसवेना. ती उठली आणि दिंडीदरवाजात जाऊन बसली. पवनला खेळवत मोठी आय तिथंच बसली होती. तिच्या कुशीत वनिता शिरली. "वना, तुला बरं न्हाय का गं? दवाखान्यात तरी जाऊन ये. लईच सुकलीयेस बघ." तिच्या पाठीवरून हात फिरवत मोठी आय म्हणाली. "कसला दवाखाना न् कसलं काय वाटोळं झालंय सगळं. काय सांगावं न् कसं सांगावं तेच कळेना. नाही गं सोसवंत." मोठी आय चरकली. तिनं इकडं तिकडं बघितलं तिच्या पाठीवर थोपटलं. तेवढ्यात वशाबापू हातात पिशव्या घेऊन आला. वनिता नीट सावरून बसली.

"काय आणलं?" पवननं पिशवीत डोकावत विचारले.

"तुमाला कापडं, फटाकडं, आकाला पातळ, तुमच्या दाजीला पोशाख."

"बापू, त्यान्ला कशाला पोशाख आणला? लग्नात केलंय की एवढं." वनिताने पिशव्या हातात घेत म्हटलं.

"येडी का खुळी पहिली दिवाळी तुमची."

पिशव्या घरात ठेवून वनितानं बापूला तांब्या भरून दिला. गंगूवैनीच्या करंज्या करून झालेल्या. काकी तळत होत्या. पसारा आवरून झाडून काढलं. वशाबापू हातपाय धुवून येऊन बसला. तांब्याभर पाणी घटाघटा पिऊन म्हणाला, "मस्तपैकी च्या करा. लय फिरलो." डाव्या पायावरनं हात फिरवत म्हणाला, "महागाई तर काय वाढलीया."

मोठ्या आयनं पुढ्यात पिशव्या ओढल्या. आतली कपडे काढून बघितली. फटाक्यांचा खोका गंगूवैनीजवळ देत म्हणाली, "लांब ठेव. आताच दाखवू नगंस पोरान्ला." पातळाची घडी काढून बघितली. सूत चाचपून बघितलं. "बघ, माझ्या बापूला लय पारख हाय. मोरपंखी रंग तुला लय खुलून दिसंल." "मला नको, मी न्हाय जाणार." मोठी आय हबकली. हिंच्या गप बसण्यामागं काय आक्रीत घडलंय कुणास ठाऊक? "खुळी गं पोरगी. रहा तुळसीच्या लग्नापर्यंत. मी सांगतू तसं पावण्याला. पावणा लय शांत सोबावाचा हाय. ऐकत्यालं बघ." बापू म्हणाला.

"मी तिकडं कधीच जाणार नाही." गुडघ्यात डोकं खुपसून वनिता रडू लागली. तिच्या हमसून रडण्यानं सगळ्यांची मनं हादरत होती. काय झालं? काय झालं?? गंगूवैनीनं विस्कटलेले कपडे पिशवीत भरले. वनिताला कसं सांगावं तेच कळेना. काळाठिक्कर पडलेल्या बापूला पाहून मोठी आय चरकली. वनिताला जवळ घेतलं. वनिता तिच्या खांद्यावर डोकं ठेवून रडू लागली. "मी न्हाय जाणार त्या नरकात. मला लावू नका तिकडं." वनिताच्या रडण्याच्या आवाजाने सगळे गोळा झाले. मुलं कावरीबावरी झाली. आईला बिलगली. काकीनं त्यांना खेकसून दूर लोटलं. 'तिन्हीसांजच्या येळंला ही का रडाया लागली?' म्हणून तिला आलेला राग तिनं पोरांवर काढला. "बापू, मी न्हाय जाणार." वनिताचा घोषा. "काय झालं ते तरी सांग की." मोठी आय तिचं डोळं पुसत म्हणाली. सगळ्यांचा जीव टांगणीला लागला.

"कसं सांगू बापू? तुमचं मन बी अधू व्हायचं ऐकून."

"मस्त खंबीर हाय मी. मला काय धाड भरलीया. सांगच तू. काय केलं कुणी तुला?" बापूला कळेना शामराव एवढा शांत. पोरीला कशाचं दुःख

आसंल. "सांग, माझ्या बाय, मोकळ्यापणानं सांग. नग मनात आग ठिवूस. सांग... चांगलं न्हाय बाई आसं. हं सांग." "त्यो दिर..." "त्यो ऽ रमा व्हय, त्यानं काय शिव्या दिल्या का काय तुला? जीभच हासडून काढतो त्याची. त्याज्या मायला." "ते पण सहन केलं आसतं पण..." वनिता पुन्हा जोरात रडू लागली. "शिव्या बी दिल्या नाहीत. मग केलं तरी काय?" "त्यानं माझी अब्रु लुटली." वनितानं हंबरडा फोडला. नुसती ती ओरडत होती. तिचं आक्रंदन पाहून गंगूवैनी शिळाच झाली. काकीनं डोळ्याला पदर लावला. "तवा तुझं मालक कुठं व्हतं?"

"रात्रीची ड्युटी व्हती त्यांना. मी आतल्या खोलीत झोपलेली. त्यानं कडी वाजवली. पाणी पायजे म्हणाला. मी म्हणलं खाटंखाली तांब्याभरून ठेवलाय. तर म्हणाला संपलं. लगीच कसं संपलं? मला शंका आली पण... पाण्याला नाही तरी कसं म्हणायचं... काढली कडी. त्याला पाणी द्यायला आत वळली तर त्याने झडपच घातली... कायच सुचंना. सगळं लुटलं त्या राक्षसानं..." वनिताच्या गहिवरानं वाड्याच्या भिंतीही थरारल्या. "भानावर आली आता कुणाला तोंड दाखवायचं न्हाय म्हणून तशीच उठली धडपडत. बाहेर अंधारात चालू लागली. हिर जवळ करावी, न्हायतर नदीच्या कुशीत तोंड लपवावं. त्या गावात नीट काय माहीत बी न्हवतं. मोकळ्या रस्त्यानं चालत निघाली तर त्यानं फरफटतच आणली. आत ढकलून बाहेरनं कडी लावली. आयं, सगळं शिकवलं तसं जीव कसा द्यायचा हे बी शिकवलं असतं तर कशाला ही येळ आली असती. कुणालाच घोर लागला नसता."

"आसलं वंगाळ बोलू नगंस तिन्हीसांजचं. इतक्या दिवस आसलं इक पोटात तरी कसं ठिवलंस?"

"लय आग होत व्हती पण जीव तरी कुठं जात व्हता."

"काय होऊन बसलं रं देवा?" असं म्हणून वशाबापू कपाळावर हातानं थडा थडा मारू लागला. त्याच्या तोंडातून वर्षाव होऊ लागला. डोळे आग ओकू लागले. उठून उभा राहणार पण दोन्ही पायातलं अवसानच

गेलं. तो मटकन खाली बसला. अमावस्येची रात्र गडद काळी, कुट्ट, भयाण भासत होती. रात्रभर कुणालाच डोळा लागला नाही. संताप, हतबलता, निराशा यांनी सगळ्यांनाच घेरून टाकलं.

"उद्याच जाऊन त्याची तंगडीच मोडतो." विकासचा संताप पोटातून ओठात आला. मोठ्या आयला धडकीच भरली. आता ह्या पेटत्या पलित्यांना आडवायचं तरी कसं? काय झालं बरं वाईट तर? कसं सांगायचं पोरांना?? त्याचा जीव घेतला तरी कलंक जाईल? फुकाट पोरं तुरुंगात जायची. "दम धरा, नीट विचार करा. उद्या पैली आंगूळ, सणासुदीचं वाइटवकटं काय व्हायला नको." "आता काय चांगलं व्हायचं राहिलंय? राक्षसाचा वध करूनच येतो आंगुळ करायला. पहिली आंगूळ करायला त्यालाच आधी नरकात पाठवायला पायजे." कुणीच ऐकायच्या तयारीत नव्हतं. मोठ्या आयच्या मनात नाही नाही ते विचार यायला लागलं. काकीलाही वाटलं त्याला चांगली अद्दल घडवायला पाहिजे. तरी छाती धडधडू लागली. गंगूवैनी नुसती एकटक शून्यात नजर लावून बसलेली.

दादा, वशाबापू, नाना, विकास वनिताच्या घरी गेले. सकाळची न्याहरी आटोपलेली. सूर्य वर चढू लागलेला. वनिताचा सासरा धोंडूजी अंगणातल्या खाटेवर गोडधोड जरा जास्तच झाल्याचे सुस्तावला होता. तृप्तीची ढेकर देत, गरगरीत पोटावरून हात फिरवित पहुडला होता. त्या चौघांना असं अचानक येताना बघून जडावलेल्या डोळ्यांवरची झोप उडाली. कसातरी खाटेवर उठून बसला.

"कुठंय तो रम्या? बाहेर ये म्हणावं." आल्या आल्याच वशाबापूंची फायर ऐकून धोंडूजी गांगरले. सुस्तीमुळे डोक्याला ताणही देता येईना. रमाचा एकेरी उल्लेख, शिव्या ऐकून त्याच्या आईने बाहेर डोकावलं. 'पोरानं गावात काय भानगड केली सणासुदीची?' म्हणून बघतेय तर व्याही मंडळी. ती पटकन बाजूला झाली. आत जाऊन लेकाला म्हणाली, "श्याम वनिताचं वडिलं, चुलतं रं कशाला आल्यातंय असं आमनधपक्या? सांगावा न्हाय, काय न्हाय?"

श्याम बाहेर आला. रमेशच्या सगळा प्रकार लक्षात आला. तो मागच्या दारानं केव्हाच पसार झाला.

"या की आत." श्यामने आतल्या बाजूला सतरंजी अंथरून म्हटलं, "या, बसा." "बसायला न्हाय आलू." "आधी त्या रम्याला बोलवा." "बाहेर गेलाय. तुम्ही आत तरी या." आजूबाजूचे लोक थांबून थांबून बघायला लागले. दादाला वाटले उगाच जगाला तमाशा कशाला दाखवायचा? त्यांनी वशाबापूचा हात धरून आत नेले. "बोलवा की त्याला. काळं त्वांड दाखवायची लाज वाटती की काय त्याला. त्याज्या xxxxx" वशाबापूच्या तोंडाचा पट्टा चालूच. "झालं तरी काय? नीट सांगा तरी काय ते?" दादानं वशाबापूला शांत केलं न् सगळा प्रकार सांगितला. श्यामचा चेहरा काळाठिक्कर पडला. खाली तोंड घालून बसून राहिला. पराभूत.

"कुठं गेला तो रम्या? त्याजा मुडदाच पाडतू. पोरीच्या आयुक्षाचं मातेरे केलं भडव्यानं." नाना म्हणाला. दोघांच्या शिव्या ऐकून धोंडूजी चिडले. "तुमच्या पोरीची कायम चूक नसंल कशावरनं? नखरं बघितलं का तिजं? तुमच्या सुनंनं मॅक्सी घातली असती तर चाललं असतं? बॅटनं फुलं का काय ते खेळायला जाती. तुमाला चालतं का हे? तिनंच पोराला नादाला लावलं नसंल कशावरनं?"

"ये ऽ हरामखोरा, माझ्याच पोरीला बोल लावतूस? नासकी आवलाद काढून ठिवलीस. नखरं करती म्हणं. तिज्या नवऱ्याला चालतंय म्हणून जाती खेळायला. तू पण जात जाकी चावडीत." "त्या रम्याला बोलव आधी. तुझ्याबरूबर वाद घालायला टायम न्हाय आमाला." "घरात न्हाय तो."

"कुठं आसंल तिथनं घेऊन ये. त्याज्या xxxx"

"जा की हुडका तुमीच. माझं काय नडलं न्हाय. सोताच्या लेकीला वळाण लावता येत न्हाय न् माझ्या पोरावर आरोप करताय." "ये गप बसतोस का आता. लय बोललास तर जीभच हासडीन." "दुसरा पाय जाईल पावणं. माझ्या घरात बोलताय तुमी हे ध्यानात ठीवा." धोंडूजी

गुरगुरला. श्याम काय बोलणार तेवढ्यात नाना ओरडला, "पावणं, तुमी गप बसा. जा रम्याला बोलावून आणा."

मुकाट्यानं श्याम उठून बाहेर गेला. रम्यानं आपल्या सख्ख्या भावानं एवढं करेपर्यंत मला काहीच कळू नये. थू ऽ ह्या जिंदगानीवर. वनिता पण काही बोलली नाही. का नाही सांगितलं तिनं मला? माझ्यावर का नाही दाखविला विश्वास तिनं. वनिता ऽ' रम्याला गावात शोधू लागला. उन्हाची जाणीव नाही. वणवण फिरला. एकदाचा गुरवाच्या घरी सापडला. त्याच्यावर लाथा बुक्क्याचा मारा करत फरफटतच घरी आणला. त्याला बघून वशाबापूच्या डोळ्यात खून चढला. दादानी त्याला धरून ठेवलं. "बोल, तू केलंस ते खरं का खोटं?" "खरंय सगळं." रम्यानं कबुली दिली. त्यानं पटकन दादाचे पाय धरले. "माफ करा मला. माझ्यावर माझं कंट्रोलच राहिलं नाही." दादा मागे सरकले. म्हणाले, "करून सवरून आता कशाला ह्यो साळसूदपणा." "एवढी बार करा माफ. परत नजर उचलून बी न्हाय बघणार वैनीकडं" "ये XXXX तीजं नाव घेऊ नगंस." नाना त्याला पकडण्यासाठी पुढं सरसावला. केस मुठीत धरून त्यानं पोटात गुद्दा मारला. रम्या कळवळला. विकासनं पाठीमागून लाथ घातली तसा हेलपांडत पडला. त्याच्या आईला हे बघवेना. तिनं दादांचं पाय धरलं. "दादा, एवढीच येळ माझ्याकडं बघून त्येजा अपराध पोटात घाला. बापू पदूर पसरते. एवढी भाऊबीज घाला पदरात. परत जर त्यानं आसं केलं तर त्याजं नक बी दिसणार न्हाय. एवढं ध्यानात ठिवा. पुना आसं न्हाय व्हणार."

"पुना पाठवतोयच कशाला ह्या नरकात? मला संभाळायला इल तवर इल न्हायतर हिरीत ढकलीन. पण तिला नांदायला न्हाय पाठीवणार." वशाबापू डाव्या पायावर हात ठेवून पाय ओढीत चालू लागला. विकासनं त्याला सावरलं. आजूबाजूच्या नजरा चुकवत चौघेजण निघाले.

वशाबापू वाड्यात न जाता गोठ्यात दगडावर टेकला. आपल्या जुन्या, मजबूत वाड्याकडे, भक्कम दिंडीदरवाजाकडे खिन्नपणे बघत. गंगूवैनी गोठा झाडत होती. शेण काढून झालेलं. खराटा टाकून ती बापूजवळ भुईवर

बसली. ‘‘काय झालं?’’ विचारून तरी काय उपयोग होता? तरी नकळत प्रतिक्रिया उमटलीच. ‘‘पैल्यांदाच अधूपणाची जाणीव झाली. बघ. लंगड्या बापूचा अधू, पडझड झालेला ह्यो संसार न् मोडकं, तोडकं सपान. नदीत वाहत आलेल्या छपरासारखं...’’ जरा वेळानं म्हणाला, ‘‘वना कुठाय?’’ ‘‘हाय दुपारची भांडी घासतीया.’’ वशाबापूनं चमकून गंगूवैनीकडं बघितलं. ‘‘ऐकंनाच. सगळी कामं करायलाच पायजेत आता. खायला काळ न् भुईला भार कशाला? रानात पण येत जाईन म्हणाली. न्हाय म्हणू नगंस.’’ तरण्याताठ्या पोरीच्या संसाराचं वाळवंट होणार म्हणून वशाबापू आतून पार ढासळला. दोन्ही तळव्यात तोंड लपवून ढसाढसा रडू लागला.

# कपातले वादळ

"सौरभ, निमा दूध खाणं टेबलावर ठेवलंय ते घ्या." सौरभ हातपाय धुवून टॉवेलने पुसत पुसतच आला. टॉवेल मंडीवर ठेवत खुर्चीवर बसला. खाण्याची बशी जवळ ओढत म्हणाला, "अहा ऽ मटार पोहे." पोह्यावर लिंबू पिळत म्हणाला, "आई, मी पण येऊ का ग तुझ्याबरोबर? तायडी फायडी माझ्याशी नीट खेळत नाहये. सारखी मैत्रिणींबरोबरच खेळते." आईची फिरायला जाण्यासाठीची आवराआवर बघून सौरभ कुरकुरला. दिवसभर शाळेत बसून आल्यावर त्याला आईशी खूप बोलायचे असते पण आई लगेच निघते. सौरभला ते आवडायचे नाही.

"अरे, मग राहुल, धनुबरोबर खेळ ना. आम्ही एक किलोमीटर जाऊन तेवढेच परत येणार. मधेच पाय दुखतात, चल म्हणायचे नाही."

"बापरे नको बाबा." दूध पिऊन सौरभ पळाला.

"आई, लवकर ये गं. मधेच कुठं गप्पा मारत बसू नकोस." निमा पोह्यातले मिरचीचे तुकडे बाजूला काढत म्हणाली. "नाही ग सासूबाई, लवकर येते." हल्ली जाच करायला सासू नाही पण ही मुलं फारच... असं कर, तसं नको म्हणून सदा किरकिर करतात. त्यांना आई सदा न् कदा घरात रहायला पाहिजे. आपण त्यांना सवय लावायला हवी की आईही खूपदा घरात नसते तेव्हा व्यवस्थित रहावं. नोकरी करत नसले म्हणून काय २४ तास बांधून घ्यायचं? बाकीच्यांचं जाऊ दे पण ही मुलंही गृहीत धरतात प्रत्येक गोष्टीला. प्रेमाचे हे रेशीमबंध तसेच अलगद सोडायचे असतात. कुणालाच त्रास होणार नाहीत असे. तिने लेकीची समजूत घातली, "लवकर येते हं सासूबाई."

"वहिनी" पदराबरोबर देहाला सांभाळीत भोसले वहिनींनी हाक मारली. मदुराने पायात चपला सरकावल्या. दार ओढून घेतलं. तिची चपळ हालचाल भोसलेवहिनी पाहत होत्या. त्यांच्या डोळ्यातील असूया पाहून मधुरा सुखावली.

भोसल्यांचा एम. आय. डी. सी. त टूल्स बनविण्याचा कारखाना आहे. अनंत भोसल्यांच्या कष्टामुळे त्यांच्या लघुउद्योगाची चांगलीच भरभराट झालेली. लक्ष्मी घरात पाणी भरू लागली. वहिनींच्यावर देखील प्रसन्न होऊन अंगाखांद्यावर खेळता खेळता चांगलेच बस्तान बसविलेले. त्यामुळे अनंत भोसले त्यांना रोज फिरायला जाण्याबद्दल सक्ती करायचे. ते स्वतः पहाटे मित्रांबरोबर जायचे. बाईसाहेबांना एवढ्या लवकर उठणं नको होतं आणि माघारी येऊन मुलांच्या शाळा-कॉलेजात जाण्याची तयारी, चहा-नाष्टा. त्यापेक्षा त्या संध्याकाळीच जाणं पसंत करतात. मधुरालाही जोडीला कोणीतरी हवंच असतं. नाहीतरी नंदूला कुठला वेळ मधुराबरोबर फिरायला यायला. गावातील बिझी डॉक्टर आहे ना तो. ह्या फिरण्यामुळे तरी डोकं जरा शांत राहतं. नाहीतर वेड लागलं असतं.

"वहिनी, तुम्ही बाहेर कुठं गेलात की माझी भारी पंचाईत होते. सुर्यवंशी वहिनींना विचारलं तर नाहीच म्हणतात. दुसरं तरी कोण येण्यासारखं आहे?"

"त्यांच्या नवऱ्याला नाही आवडत असली थेरं."

"संशयही फार घेतात म्हणे."

"त्या आहेतच तशा सुंदर. खुळावून जातो माणूस."

"म्हणून असं कोंडून घ्यायचं? इकडं तिकडं बघायचं नाही. कुणाशी बोलायचं नाही. हसायचे नाही. नाहीतर का बोललीस? काय बोललीस? का हसलीस? असल्या प्रश्नांनी भंडावून सोडतो. बिचाऱ्या कोमेजल्या जाईसारख्या वाटतात."

"आपल्या नवऱ्यांचे असं काही नसतेय म्हणून बरंय."

"आमचे हे तर हाकलतात."

"हाकलतील नाही तर काय?" मधुरा त्यांच्याकडे पाहत पण मनातच म्हणाली.

"अहो, परवा तर गंमतच झाली." भोसले वहिनी सांगू लागल्या. "उटीला गेलो तेव्हा पंजाबी ड्रेस घाल म्हणून मागे लागले." "अय्या खर ऽ ऽ ऽ च." मधुरा जवळ जवळ ओरडलीच. आता मात्र त्यांना जाड्या भोसले वहिनींचा हेवा वाटला. आपल्याला नंदू कधीच असं काही म्हणत नाही. त्याचं असल्या गोष्टीकडं लक्षच नसतं. आपल्याकडं तरी कुठं असतं. त्या सुर्यवंशीवहिनीकडे चुकीच्या पध्दतीनं तरी नवरा लक्ष देतो. असे लोक म्हणे अतिप्रेमापायी असे वागतात. मग नंदूचे आपल्यावर प्रेमच नाही की काय? तिला छातीत पिळवटल्यासारखं झालं. दिसामासानं असंच होत असेल का? खंत तरी कशाकशाची करायची? तरी भोसलेवहिनी किती सुखी म्हणायच्या. तिनं सुस्कारा सोडला.

"आता या वयात शोभतं का हे असलं वागणं." भोसले वहिनी.

"आणि देहालाही." मधुरा मनातच.

"मुलगी लग्नाला आलीय."

"मॉडर्न आई म्हणून अभिमानच वाटेल की. पुण्याला जीन्सही सर्रास घालतात."

"वहिनी, तुम्ही का ड्रेस घालत नाही. तुम्ही तर क्यूट दिसाल."

"हे म्हणतात, आजूबाजूचं वातावरण असेल तसं रहावं. म्हणजे माणसाशी जवळीक साधता येते. आपुलकी, आत्मीयता वाढते." मधुरा म्हणाली.

"तेही खरंय हं. या गावात बायकांनी असं तिन्हीसांजेचं फिरायला जाणं तरी लोकांना कुठं रुचतं?" भोसले वहिनी. दोघींच्या गप्पांत घर कधी आलं ते कळलंच नाही.

"या वहिनी, कॉफी घेऊ या." मधुरा दार उघडत म्हणाली.

"आधी पाणी द्या." धापा टाकत भोसले वहिनी बसल्या. मधुराने पाणी आणलं. मुलांना हाक मारली. मुलं आईला दखल घेतल्यासारखी करून पुन्हा पळाली. मधुराने गॅसवर कॉफीला दूध + पाणी ठेवलं. तेवढ्यात फोनची रिंग वाजली.

"हॅलो ऽ"

"मधुरा, मी बोलतोय. आज जेवायला येत नाही. पाटलांकडे बारसं आहे, तिकडेच जातोय."

"बरं, बाळाला काहीतरी न्या."

"बरं." फोन कट झाला.

मधुराने गॅस बंद केला. साखर आणि कॉफी मगात घालून त्यावर गरम दूधपाणी ओतलं. मगात चमचा ठेवून एक मग भोसले वहिनींच्या हातात देत म्हणाली, "ह्यांचं नेहमीच असं असतं. सारखं कुणाचं ना कुणाचं आमंत्रण."

"वहिनी, तुम्ही का जात नाही?"

"तुमच्या खेड्यातले लोक बायकोला एवढं आग्रहाने कुठे बोलावतात आणि बोलावलं तरी मला नाही बाई आवडत, एवढ्या पंक्तीत दाटीवाटीने बसायचं. गर्दी, गोंधळ नुसता. मुलांना कंटाळा येतो. अभ्यासाकडे दुर्लक्ष होतं ते वेगळंच."

"बरं चला, निघते. स्वयंपाक करायचाय. तुम्हाला आता सुट्टीच की."

“हूं. आता सकाळच्याच उरलेल्याला काहीतरी जोडायचं.” भोसले वहिनी गेल्या. “आई, किती गं गप्पा मारता. अभ्यासात लक्ष पण लागत नाही.” निमा कुरकुरली.

“तू कधी आलीस खेळून?”

“तू बाळाला काही तरी घ्या म्हणून सांगत होतीस ना तेव्हा. कुणाचं गं बाळ?” निमा.

“ते कुठल्या तरी पाटलांचं बारशाला जाणारेयत बाबा.”

“आई, झोप आलीय.” सौरभ कॉटवर लोळत म्हणाला.

“अरे, गृहपाठ पूर्ण केलास का?”

“सकाळी करतो की.”

“ह्या ऽ म्हणे सकाळी करतो. उठायचं आठ वाजता, अंघोळ नऊ वाजता, जेवण दहा वाजता. लगेच शाळेची वेळ झाली. कधी करणार गृहपाठ? आई, त्याला झोपू देऊ नकोस.”

“तुला काय करायचंय तायडा, फायडा.” तिला वेंगाडून दाखवत सौरभ पुन्हा लोळू लागला.

“झालं का तुमचं सुरू? अजून तासभर नीट अभ्यास करायचा. सौरभ ऊठ. हातपाय तोंड धू म्हणजे झोप जाईल.” तिने सौरभचे दप्तर उघडून आतील वही, पाटी, पेन्सिल वगैरे काढले. सौरभला अजून सहा पूर्ण नाहीत. बालवाडी जवळ नाही आणि अभ्यासही होईल म्हणून पहिलीतच घातलेला. त्याला गृहपाठ नसायचाच. मग मधुराचं थोडं फार करून घ्यायची.

दारावरची बेल वाजली. मधुराने घड्याळात पाहिले. फक्त नऊ वाजलेले. मुलांना झोपवताना तिचाही कधी डोळा लागला ते कळलेच नाही. दार उघडले तर नंदू पाठमोरा संपत जाधवशी बोलत उभा राहिले. अरेच्या ! जेवायला जाणार होता नं काय? जेवला का नाही कुणास ठाऊक? मधुरा आत येऊन बसली. ‘नंदू नक्कीच जेवला नसेल, त्याशिवाय एवढ्या लवकर कसा येईल? विचारावं तरी.’ म्हणून मधुरा बाहेर येऊन पाहतेय तर नंदू गप्पात गुंग. जाधवही सारखा नंदूच्या खांद्यावरून आतच नजर लावून बोलत होता. त्याची ती धीट, निर्ढावलेली नजर पाहून मधुरा चटकन आत

आली. हा संपत जाधव कंत्राटं वगैरे घ्यायचा. धिप्पाड, काळा रंग, त्यावर दाढीमिशांचे वाढलेले खुंट अजागळ, गुंड वाटायचा. गावात त्याच्या नेहमी काही ना काही भानगडी चालू असत. नंदू कशाला एवढा वेळ बोलतोय त्याच्याशी? जेवून पण आलाय की नाही कुणास ठाऊक? विचारावं तरी काय करतोय तो जाधव? मधुरा पुन्हा बाहेर आली यांच्या गप्पा सुरूच. तो काहीतरी म्हणत फिदी, फिदी हसत होता. मधुरा बाहेर गेली की नजर तिच्यावरच पडत होती. त्याच्या नजरेच्या टप्प्यातच मधुरा जात होती त्याला तो तरी काय करणार? त्याची ती किळसवाणी तांबारलेली नजर बघून मधुरा पुन्हा आल्या पावली माघारी. 'काय करावं? जेवला की नाही एवढं सांगून तरी गप्पा कुटत थांबावं. पण नाही. एवढ्या लवकर आला म्हणजे जेवलाच नसणार. करावाच थोडासा स्वयंपाक. पण विचारावं तरी एकदा.' मधुरा पुन्हा बाहेर आली. पुन्हा ती रोखलेली नजर पाहून तिला काही विचारायचं धाडस होईना. नंदूला साधी चाहुलही लागत नसेल का? मागं वळून पहावं तरी निदान खुणेनं तरी विचारलं असतं. आवडेल नंदूला? तो जाधव तरी कसा? वाटेतच अडवून बोलतोय. मूर्ख. मी त्याला काय घाबरायचं ! मधुरा धाडस करून पुढं गेलीच. "अहो, जेवला का?" "नाही." नंदूचे डोळे आणि बोलण्यातली जरब पाहून मधुरा चरकली. पुढे काहीही न बोलता माघारी फिरली. तिने टोपलीतला कांदा काढून चिरला. 'माझी काय चूक आता, जेवून आले नाहीत, हे सांगायचं सोडून खुशाल गप्पात गुंग.' नाक ओढीत तिने डोळे पुसले. गॅस पेटवून कढई ठेवली. अंड्याची भुर्जी आणि भाकरी केली. नंदू रात्री नेहमी भाकरीच खात. भात नसला तरी चाले. खाण्याचे अजिबात नखरे नसत. पण हे असं वेळी-अवेळी येणं पाचवीला पुजलेलं. फोनच नसता केला तर असा अवेळी स्वयंपाक करायची वेळ आली असती का? राहिला असता शिल्लक तर कामवाली तरी खुश झाली असती. एखाद्या दिवशी चारीठाव स्वयंपाक करावा न् यानं घरी न कळवताच जेवून यावं. नंतर मग जेवायची इच्छाच राहत नाही. वर मल्लीनाथी, "अगं, मनं राखावी लागतात. नाहीतर दवाखान्यात कोण येईल?" बायकोचं मनं तेवढं राखायची गरज नसते

ह्या नवऱ्यांना. जातेय कुठं? कुठं जाईल...? किंवा मग फोन करायचा विसरला गडबडीत त्या अमक्या तमक्या पेशंटमुळे. तेवढी निकडच वाटत नाही तर विसरणारच की. हे नेहमीच असं असतं. पण करणार काय? साप म्हणू नये चावला न् नवरा म्हणू नये आपला... आलीया भोगासी...' अशीच समजूत काढीत स्वत:ची, मुलांची एकेक दिवस ढकलायचा. कशाला ढकलावा लागतोय. जातोच आपोआप.

"वाढ जेवायला." बूट काढत रागातच नंदूने ऑर्डर सोडली. वॉश घेतला. टेबलाशी येऊन बसला. मुकाट्याने जेवू लागला. मधुराही घुश्श्यातच होती. आपली काहीच चूक नसताना ही अशी धुसफूस का? तिचे डोळे सारखे पाण्याने भरत होते. जेवायचंच होतं तर आल्या आल्या नाही का सांगायचं? जगावेगळे झालेत डॉक्टर. नंदू जेवून उठला तसं तिने टेबल आवरून झाकपाक करून मुलांजवळ जाऊन झोपली. नंदू स्वत:च्या बेडरूममध्ये टक्क जागा. डोळे झाकावे म्हटले तरी झाकेनात. सारखा मघाचाच प्रसंग डोळ्यासमोर दिसत होता. जाधवचे आत पाहणे, मधुराचे आत बाहेर करणे. नवरा रात्री जेवतो, रोजच जेवतो ! विचारून स्वयंपाक करतेय...? एवढं विचारण्यासाठी किती येरझाऱ्या घालायच्या. तो साला जाधव सारखा आतच बघत होता. त्याच्या गप्पा संपत नव्हत्या आणि मधुराच्या येरझाऱ्या. मधुरा आत बाहेर करत होती म्हणूनच तर हा गप्पा वाढवित होता का? आपण पाठमोरे असल्यामुळे मागे मधुरा बिनधास्त दर्शन देत होती ! नंदूच्या मस्तकात भुंगा शिरला.

मधुरा... तो... म्हणून आत बाहेर चालले होते की काय? ... आणि त्याचं बोलणं वाढवणं. तिला माहितेय ना त्याच्याशीच काय या गावातील कुणाशीच मधुराने बोलू नये वाटतं. गावगुंड साला. ही खेडवळ माणसं वाटली होती तेवढी अडाणी नसतात; तर चांगलीच रंगेल, बेरकी असतात. याचा अनुभव नंदूला अनेकदा आलेला. आज एक ॲबॉर्शनची केस होती. १७-१८ ची कोवळी पोर. आईबाप गयावया करत होते. हातापाया पडून 'आमची अब्रू वाचवा' म्हणून विनवीत होते. पोरीला विचारलं, 'कसं झालं हे?' वाटलं कुणी आडबाजूला नेऊन... किंवा या गरिबाघरच्या

मुली दहा रुपयाच्या नोटेसाठी, एखादया वडापावसाठी सर्वस्व देणाऱ्या. गरिबांच्या चारित्र्याची किंमत ती काय? पण तिनं मान खाली घातली. लाजूनच. होय तिचे गाल आरक्त झालेले. की भास झाला? काही असो. तिच्या गरीब आईबापाची मात्र लाज राखायलाच हवी. त्यांची तीच अनमोल संपत्ती असते. अशी ही खेड्यातली माणसं. यांची सेवा करण्यासाठी आपण पुणे सोडून इथे आलो. आपल्यासाठी मधुरा. हल्ली मुलं शाळेत जायला लागल्यापासून दुपार खायला उठते, वेळ जात नाही म्हणायची खरं. भोसले वहिनींबरोबर फिरायला जाते अलीकडे. हल्ली घरात आपलंच लक्ष नसतं. काय म्हणायचंय तिला तरी. पण मी तरी काय करू? हे सगळं घरासाठी, तिच्यासाठीच करतोय ना? मला वाटत नाही एंजॉय करावं? थोडं झालं दुर्लक्ष म्हणून मधुराने असं वागावं? तिच्या येरझाऱ्या आणि त्याचं 'ते' आत पाहणं. फक्त जेवलात का? एवढं विचारण्यासाठी कितीदा डोकवायचं? की फक्त ते निमित्त? मेंदूचा नुसता भुगा झाल्यासारखं वाटतंय. नंदूने सहावी सिगारेट पेटवली. जोरात झुरका घेतला. त्याला आठवलं, एकदा अशीच मधुरा खिडकीत उभी राहिली होती. बाहेरून जाधव जात होता. अर्थात, आत तिच्याकडे पाहत. आपण जवळ गेल्यावर केवढ्यांदा दचकली. का दचकली? नंदूच्या हाताला चटका बसताच त्याने सिगारेट ॲशट्रेमध्ये विझवली. झोप उडालीच होती. पलंगावरची मऊ गादी रुतायला लागली. तो उठून हात मागे टांगून येरझाऱ्या घालू लागला. बाहेर दाट अंधार, रातकिड्यांची किरकिर भयाण शांतता भंगून टाकीत होती. मधुरा खरंच असं काही करेल? तिचं प्रेम कमी झालंय का? या असल्या गोष्टींचा विचार करायला वेळ कुठं असतो? तो नकळत मधुराजवळ गेला. मंद उजेडात तिचा चेहरा अजूनही किती कोवळा, गोड वाटतोय. झोप लागली? थकते बिचारी, मुलं, घर सांभाळताना थोडे का कष्ट पडतात? त्यात आपण असे. उगीचच तिच्यावर... काहीतरी... नंदूला स्वत:चीच शरम वाटली. तो साला... मधे आला ना, त्याचं तोंड बघितल्यामुळे हे असले घाणेरडे विचार मनात आले. किती हा संकुचितपणा? माझी मधुरा तशी नाहीच मुळी. त्याने मुलांच्या, तिच्या अंगावरचे पांघरूण सारखे केले. पलंगावर येऊन पडला. डोळे मिटून कपाळावर हात आडवा ठेवून झोपण्याचा प्रयत्न

केला. अंग आंबून गेलेलं. आता मरून जाण्याएवढी गाढ झोप लागावी वाटलं त्याला. क्षणभर जडावले डोळे. त्या डोळ्यास मधुरा दिसली खिडकीत उभी राहिलेली आणि बाहेर जाधवाच्या छद्‌मी हसण्याने नंदूची झोप पळाली. तो ताडकन उठून बसला. त्याने गदागदा डोके हलवले. डोळे मिटून पडला. पुन्हा तेच.... मधुरा बाहेर डोकावतेय... जाधव आत. नंदूने घड्याळात पाहिले. आताशी एक वाजलाय. छे... सोक्षमोक्ष लावलाच पाहिजे. आत्ताच्या आता. बी. पी. वाढलेयच. हार्टअ‍ॅटॅक यायचा. चाळीशीत हा धोकाही मोठ्या प्रमाणात असतो. त्याला दरदरून घाम फुटला. गुदमरल्यासारखं होतंय. तो उठून मधुराजवळ गेला. हलकेच तिला म्हणाला, ''इकडे ये.'' मधुरा जागीच होती. नंदू झोपलेला नाही हे तिला कळत होतं. पण आपलं काही चुकलंच नाही तर. तिच्या काही लक्षातच येत नव्हतं, हा असा का वागतोय? नुसते डोळे गळत होते. मधुरा नंदूच्या बेडरूममध्ये आली. बेडरूम दोघांची पण नंदूच्या उशिरा येण्यामुळे ती खूपदा मुलांजवळच झोपत असे. ती पलंगावर बसली. नंदू रागात आहे पण का? काय बिनसलंय? विचार करण्याचीही ताकद नव्हती. करून तरी काय उपयोग? मुलांसमोर कशाला वाद घालत बसायचे. तरी हे असं अपरात्री नंदूने बोलावणं हे खासच प्रेमाचे नव्हते . भितीनं थिजून गेली मधुरा. काय बोलतोय आता नंदू याची वाट पाहू लागली. 'माझी काही चूक नसताना तुम्ही असे का वागता?' हे विचारायचीही तिची हिंमत होईना. अखेर नंदूच म्हणाला, ''मघाशी आत बाहेर का करत होतीस तो बाहेर उभा असताना. कळा येत असल्यासारखी.'' आता मात्र मधुराच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला. म्हणून हा चिडलाय तर. ''तुम्ही जेवायला येणार नाही म्हणून फोन केला होता ना? पाटलाच्या घरी बारशाला जाणार होतात ना?''

''नाही गेलो. उशीर झाल्यावर विसरलोच.''

''पण मी स्वयंपाक केला नव्हता. सकाळचं उरलं तेच खाऊन झोपलो. तर तुम्ही लवकर आल्याचे पाहून जेवला नसणार हा अंदाज केला मी. स्वयंपाकच करणार होते पण आधी विचारावं तरी म्हणून बाहेर येत होते तर त्या जाधवाचं थोबाड पाहून आत यायची. पण तुम्ही जेवला की नाही

या विचाराने चैन पडेना म्हणून पुन्हा बाहेर. तुम्ही गप्पात एवढे गुंग की साधं मागं वळूनही बघायला तयार नाही. मला तर काहीच सुचत नव्हतं. मुलं पण झोपलेली. त्यामुळे नकळतच आत बाहेर होत होते. विचारलेलं तुम्हाला आवडणार नाही म्हणून विचारायला यायची तरी धाडस होत नव्हतं. बाहेरून आल्यावर एवढं गुंग व्हायचं असतं का? माझं आतबाहेर चाललंय त्याच्याशी काहीच कर्तव्य नसल्यासारखं ढिम्म उभे होतात.'' मधुरा रडवेली झाली. नंदूला एकदम हायसे वाटले. डोक्यावरून प्रचंड ओझं उतरल्यासारखं मोकळं, मोकळं. त्यानं मधुराला जवळ घेतलं. मधुरा काही बोलणार, एवढ्यात तिचं तोंड बंद केलं. चिडलीच मधुरा. ह्याचं हे असंच असतं. आधी रागवायचं आणि मग... नेहमी याच्या मूडभोवती फिरतच जगायचं फक्त....? तिनं सगळं बळ एकवटून त्याला दूर केलं. ''तुमच्या मनातच हे असं कसं आलं? खेडवळ लोकांच्यात राहून हेच सुचणार. हीच पारख केलीत बायकोची?'' मधुराचा आवाज वाढला. तिचं मन आक्रंदत होतं. ''स्वत: कुणाशीही दारात बोलत उभे रहायचं. वर माझ्याच घरात फिरायला मला बंदी. आहे ना हे घर माझे? तुमच्या मनात कसं आलं हे?'' मधुरा जाऊ लागली. तिला रोखत नंदू म्हणाला, ''सॉरी मधु.''

''सॉरी म्हणून मनावर झालेली जखम बरी होते?'' तिच्या विद्ध प्रश्नाने नंदूही घायाळ झाला.

''तूच सांगतेस ना मुलांना 'सॉरी' म्हटलं की मनात काही ठेवायचं नसतं.''

''तुम्ही काही मूल नाही.''

''कुठलं मलम लावू म्हणजे माझ्या आई, आपल्या मनावरची जखम बरी होईल.'' नंदू गुडघ्यावर बसून तिचे हात हातात घेत म्हणाला. मधुरा बरीच शांत झाली. त्याच्याजवळ बसत म्हणाली, ''मनाच्या निर्मळतेचं मलम अन् विश्वासाचं बँडेज, डॉक्टरसाहेब.''

# क्षमा

“बापू ऽ बापू ऽऽ उघडा की ऽ दार.” वन्सनी दारावर धडका मारल्या. आतून कायच आवाज आला न्हाय. दाराच्या फटीतनं बघितले. फटीतनं हात घालून कडी काढायचा लय प्रयत्न केला. मामांची ती खोली येगळी व्हती. तिथं खाटेवरचं बसून रहात. जेवायापुरतं सोप्यात यायचं. तेवढंच. रोजच्या जेवायच्या जागेवरच धनी भिताडाला टेकून बसलेलं. ‘रोज हिथच बापाबरूबर जेवायचो.’ येत आसलच की इच्चार मनात. काम करणारा माणूस असा बसून राहिलेला बघवत नव्हता. मी आत कोनाड्यात झोपलेली. वन्स माझ्याजवळ आल्या नुसत्या बसून,

बसून गेल्या. पोरं चितागती झाल्याली. आत बाहेर करत व्हती. 'आपल्या आयला कायतरी झालंय आपुन रडायचं न्हाय, न् काय बी मागायचं न्हाय.' एवढं त्यान्ला कळत व्हतं. वन्स बायसाबांकडच पोरान्ला जेवायला घालत हुत्या. हे आसं किर्तीदी चालणार हाय. आज तिसरा दिवस मामांनी सोताला कोंडून घेतल्याला. तवापास्न धनी बी नुस्त बसून हायती. तीन दिवस चूल पेटली न्हाय का कुणाच्या पोटात आनपाणी न्हाय.

काय पाप केलं आपुन? देवा सांग काय्र पाप केलं म्हणून आसं आक्रीत घडलं रं? कुठ गेला व्हतास तू? केवढा दबदबा ह्या माणसाचा गावात. किती मान देत्याती. ऐरा-गैरा वाड्यात पाऊलसुदीक टाकायचा न्हाय. सोभावच कडक. आत्याबाय तर वाऱ्यालासुदीक उभा रहात न्हाईत. आसं कसं आत्याबायचं तरी? नवरा मजी देव आसतू. किती कडक असला तरी काय डोक्यात दगाड घालील व्हय? म्हातारपणी जवळ बसावं, सेवा करावी ते राह्यलं बाजूलाच, जवळ फिरकत बी न्हाईत. अशा का लांब लांब रहात असत्याल्या? कसलं भांडाण असावं दोघांचं? नुसतं पटत न्हाय म्हणून कुणी आसं येगळं राहिल व्हय? मामांला केवढं देवधर्माचं येड. पोथ्या वाचायला देवळात जायचे. पुराणाचा अर्थ तर काय सांगत्यांत सगळं गाव लोटतं ऐकायला. आताशा नीट ऐकायला येत न्हाय न् डोळं तर पारच गेलं. सारखं खोलीत बसून असत्यातं. पोरं बी आज्जाची किती लाडकी. सगळं कसं नीट चाललं हुतं. कुणाची द्दिष्ट लागली माझ्या संसाराला. देवा कसलं सत्व बघतुयास रं? कसं जगावं आता कुठं जावं?

लगीन झालं तवा ल्हानच हुतो आपुन. लुगड्याचा बोंगा बी आवरायला येत नव्हता. थोरल्या बायसाब सारखं वरचंच काम सांगायच्या. मग सैपाक शिकायचं राहिलंच. कवा बसलीच भाकरीला तर आत्याबाय टोपल्याजवळ बसायच्या, टोपल्यात भाकरी पडली की कुत्र्याला टाकायच्या. म्हणायच्या, 'भाकरी करता करता शेंबूड पुसती. त्याच हातानं पीठ मळती.' मग न्हायची जायची चुलीपुढं. मोठं हाड. नुस्तं बसुन कोण खायला घालणार? शेणघाण काढायची, भांड्याचा गराडा घासायचा. धुण्याचं घमेलं घेऊन नदीवर जायचं. आत्याबाय शिळंपाकं वाढतील तेवढं खाऊन, गुरांमागं जायचं.

माहेरात बी साळंत जायचं सोडून गुरामागं जायची. आता बी तेच नशीबाला आलं. कडूसं पडताना जळणाचं वझं घेऊनच घरी यायचं. तवर बायसाबांचा सैपाक व्हायचा. उष्ट, खरकटं काढायचं. सगळी भांडी घासायची. धरणीला पाठ टेकली की कवा डोळं मिटायचं ते बी कळायचं न्हाय. कोंबड्याच्या बांगला उठायचं. घाण्याला बैल जुपल्यासारखं कामाला जुपून घ्यायचं. जात्यावर बसलं की पायली पायली जोंधळं दळायला लागायचं. आत्याबाय पीठ भिताडावर टाकून बारीक हाय का मोठं ते बघायच्या. बारीक आसलं तर भिताडाला चिटकून बसायचं. मोठं पीठ आलेलं चालायचं न्हाय. पहाटेच्यापारी ओव्या बंद होऊन शिव्या ऐकायला लागायच्या. सगळं मुकाट्यानं करीत हुती. करावंच लागायचं. कुणाचाच आधार नव्हता. धनी बी कवा कड घेयचं न्हायीत. वली बाळातीण असताना सुदीक शेण काढायला लावलं, भांडी घासायला लावलं. शेणातला किडा शेणात राहत न्हाय तर माझी पोरं लहानाची मोठी झाल्याबिगर राहत्याली का? ह्योच माझा इसावा. थोरला पांडू सहा वरसाचा झाला. त्याला साळंत घालायचं चाललं हुतं. म्या धन्यास्नी धडा करून सांगितलं, ''त्याज्याकडं लक्ष देत जा. येवस्तशीर साळा शिकवा. वायच तरी ध्यान देवावं.''

''तर. ध्यान दिल्याशिवाय शिकत्याली का पोरं. पाडव्यालाच घेऊन जातो की. मास्तर म्हनल्यातंय नुस्तं नाव घाला. पाटी-पेन्सील मागनं आणली तरी चालंल.'' पाडव्यादिशी त्यांचं ध्यान गुडी उभा करण्यातच. म्याबी भिताडावर शेणाचं पाडवं काढण्यात दंग केसून आला सांगायला. म्हणाला,

''पांडूची आय आज पांडूचं नाव घालणार न्हवं साळंत.'' तवा ध्यानात आलं.

''आरं पांडू, चल, चल साळंत नाव घालायचंय. चल आंगूळ घालती.'' पांडूनं भोकाड पसरलं. तसंच दगडावर उभा करून पाणी काढलं. आत्याबाय म्हणाल्या, ''आग उंडगे, वायंच दगडानं घास की हातपाय, खट चढलाय सणासुदीचं तरी निर्माळ ठिवीत जा की द्वाडा.'' हातापायावरनं दगूड फिरवला. एकच चड्डी न सदरा हुता. पाडवा म्हणून काल नीट धुऊन आणलेला. पोरंग तेवढ्यानंच किती चांगलं दिसत हुतं. गालाचा मुका

घेतला, आलाबला घेतला. धन्यास्नी म्हनलं, ‘‘न्या जावा.’’ आता माझं पोरगं शिकुनशान मोठ्ठा सायेब हुईल, म्हणून जीव हरकून गेला. मनातली गुढी आभाळात टेकली.

पावसाळ्याच्या तोंडावर साळा सुरू झाली. रानातल्या पेरणीची घाई. माळवं टोकायचं, सप्या पाडायच्या. लगी आलं खुरपान. दिसबर रानात. बायसाब कशाला पोरांकडं लक्ष देत्याला? पोरं गावभर बोंबलत, गोट्या खेळत हिंडायची.

‘‘आवो, पोरांचं साळंत ध्यान न्हाय. वायच मास्तरला इचारून तरी बघा.’’

‘‘आता रोज साळंत जायचं काम न्हाय का त्याजं? मास्तर तरी काय करत्यालं? साळंत बसलं तर शिकवित्यालं ना? हे कार्ट साळंतच जायना.’’

तेवढ्यापुरतं दोन रट्टं मारायचं. कवा नुस्तचं खवळायचं. पोरास्नी दापलं की आपलं बैलं, गाडी अन् रान ह्याच्याशिवाय काय सुचायचं बी नाय. मीच एकदा केसूला म्हनलं, ‘‘आरं केसू, पांडूला नेत जा तुझ्याबरूबर.’’

‘‘माझ्याबरोबर नेतू पण त्याजा पहिलीचा वर्ग हाय. कवा पळून येतं मला बी माहीत होत न्हाय.’’

केशवाचं साळंत डोकं चालायचा. पांडूचं कसं व्हायचं आपून साळंत गेलं तर आत्याबाय, बायसाब लयच घालून-पाडून कुजकं बोलत्याला. धन्यास्नी तरी आवडलं व्हय? मला तर एक दीस घरात राहू देत न्हायती. रानात बाया रोजानी लावलेल्या त्यांच्याबरूवर तरी जायालाच लागायचं. लय इच्यार केला. आसं एका जागी हाय तवर काय करायला यायचं नाही. दोघांनीबी उनातानात नुस्त राबायचं. फुकटचं सालगडीच की. कष्टाचं न्हाय काय वाटत पण एवढं करूनबी माझ्या लेकरांची हेळसांड व्हायला लागली. धन्यास्नी ह्याचं कायच न्हवतं. मग म्याच ठरवलं अन् वायली चूल घातली. कोण काय बोललं तर बघू पुढंच पुढं. पण कुणी बोललं न्हाय. आत्याबाय माझी हाडीक झीडीकच करायच्या. त्यांना वाटलंच आसल बरी घाण गेली घरातली. मामा मात्र माझ्याकडचं राहायला आलं. एवढं कडक पण माझा कच्चा-करपा सैपाक मुकाट्यानं खायचं. कवा नावं ठिवली न्हाईत.

सणातला तर पुरणाच्या पोळ्याचं नुस्त तुकडं ताटात ते तुकडंच खाल्लं पण त्यांच्याकडं गेलं न्हाईत जेवायला. बापासारखा आधार वाटायचा. आता काय झाले त्यांच्या मनात कुठला, राक्षस खवीस आला. आपल्या बापासारख्या सासऱ्यानंच... अंगावर काटा उभा राहतोय त्या येळेची आठवण झाली तरी माला माझी घाण वाटू लागतीया. वन्स गाठ घ्यायला आल्या व्हत्या. आत्याबायकडंच राहिल्या. त्या दिवशी दुपारच्याला त्यास्नी जेवायला बोलावलं व्हतं. मामा न् धनी रोज बरूबरच जेवायचं. ती दोघं जेवून उठल्यावर आम्ही दोघी जेवायला बसलो. धनी तिथंच बोलत बोलत आडवं झालं म्हणून खरकटं लोटायचं ठिवून भांडी घासून घेतली. जरा कुठ उलीसं पडल्यासारखं केलं की निघालं रानात रोजच आसं नुस्तं काम न् रान पोरांच्याकडं लक्ष न्हायच. सुपारीच्या खांडाचं बी येसन न्हाय, पण हे कामचं हायच की. त्याच्याकडून आशा तरी कशाला करू. मीच रानात जात न्हाई येगळं राहिल्यापासून माहेराला पण गेली न्हाय. माझं हे सोन्याचं लाटं घरात ठिवून मला कुठं सुदिक जाऊ वाटायचं न्हाय. आय न् आण्णाच यायचं कायबाय घेऊन. एकदा अण्णा चुली पुढं आलं बोलायला. त्यान्ला जायचं व्हतं. तर मामा लगीच म्हनालं, 'झालं का लेकीसंग हितागुजाचं बोलून? माझ्या बापाइषयी पण पाप ह्यांच्या मनात. तवापास्न आण्णा उंबरा शिंवला न्हाइत. आय तेवढी यायची. असल्या गोष्टी मनात ठेवूनच दिवसाला तोंड दयायचं. वाढत्या पोरांकडे बघून दीस काढायचं. माझी लेकरं आता चांगली दिसू लागलेली. तोंडावर रया आली. डोक्याला त्याल मिळू लागल येळंला. अंगावर धडूत कपडा नीट दिसाया लागला. माझा सोन्याचा संसार..... कुणाची द्दिष्ट लागली. त्या दिवशी धनी गेलं न् म्या केरसूणी घिऊन लोटायला लागली. तर मामा मधल्या चौकटीवर दोन्ही हात ठिवून उभा राहिलेलं. ते आसं दुपारी कवाच आत येत न्हाइत, एकदा जेवून गेल्यावर. पोरं बी साळंत गेलेली. मला वाटलं वन्स हायती म्हणून आलं आसत्यालं. त्यान्ला म्हनलं, "वन्स तिकडं गेल्यात्याय." ऐकायला कुठं नीट येतं. जोरात वरडावं तवा थोडं कानात शिरायचं. त्यांची नजर बी येगळीच वाटली. तरी वरडून सांगितलं. खुणेनं हात तिकडं केला न् पदूर

नीट करून लागली लोटायला. जात्यालं आता म्हनलं तर आतच आलं, न् धरलं की दोन्ही हात गच्च. केरसुणी पडली. डोक्यावरचा पदूर बी घरंगळला. घशाला कोरड पडली तरी जीव खाऊन ओरडली, "ये पांडू ऽऽ किस्ना ऽऽ गोपाळा" वरडत हुती मामांनी भिताडात खेचलेलं काय हालाय येईना का काय हुईना. काळजात धडकी भरली. धनी लांब गेलंच न्हवतं. हाका ऐकून पळतच आलं. मामांला दोन्ही हाताच्या कवळ्यात धरून बाजूला ढकललं. मामा भेलकांडत चौकटीवर जाऊन आपटलं. कपाळाला हात लावून तसंच तरातरा आपल्या खोलीत जाऊन दार लावून घेतलं. ह्या गोंधळात बायसाब, वन्स आल्या. सगळं ध्यानात आलं त्यांच्या. वन्सनी आपल्या भावाला सावरलं. बाहेर सोप्याला नेऊन बसवलं त्या पण तिथंच जवळ बसल्या. बायसाबांनी माझ्या डोक्यावर पदुर घालून कोनाड्यात बसवलं. पाणी दिलं. केवढं घोर इघ्न टळलं पण मनाचं काय? तुटलेलं मन कसं जडायचं?? जिव्हारी बसलेला घाव कसा निघायचा भरून??? कसं असं आलं मामांच्या मनात? लेक माहेराला आलेली. तिला काय वाटलं आसंल? देवधर्म करणारा माणूस... देवधर्मानं अन् पोथ्यापुराणं वाचून देहाची भूक दाबून टाकता येती पण ती मरतेय थोडीच? वासनेची आग इझली तरी राखंखाली इंगूळ राहतच आसंल की तवा तर असा भडका उडाला. मग माजावर आलेल्या जनावरासारखं ह्यांला सुना का लेकी कशा वळखू यायच्या? मादी हाय एवढं खरं. तळपट कसं हुईना रं देवा असल्या जनावरांचं? देवा, काय रं पाप केलं हुतं म्या माझ्या सासऱ्यानं माझा हात धरावा. कारं असं....??? पाच पांडवाची द्रौपदी हासली हुती आंधळ्याची पोरं बी आंधळी म्हणून. मी कुणाला काय म्हणली नव्हती. देवा, तरी मला का ही शिक्षा? तुझ्या दारी न्याय हाय का न्हाय? का असं केलंस देवा, का?

पोरं साळेतनं आली की त्यान्ला सांगितलं आजी आजारी लगीच जायचंय. चला ! म्हनलं, पोरान्ला घिऊन निघाली धनी एक न्हाय, दोन न्हाय. गुडघ्यात डोकं घालून बसल्यालं. म्या बी न्हाय इचारलं. काय इचारायचं? त्यांची तरी काय चूक म्हणा. वन्सनी आडवलं, म्हणाल्या,

"येडी का खुळी? माहेराला जाऊन आबरू येशीला टांगतीस का? दादाकडं बघ. तू धीराची हाईस. पोरांकडं बग. माहेरात न्हाय कड लागत. भाव-भावजयात निभत न्हाय माझ्या बये. घर सोडू नगंस. लेकरासाठी, नवऱ्यासाठी जाऊ नगंस." वन्सनी पोरांचं नाव घेतलं. माहेरात तरी काय हुतं हाता तोंडाशी दोन येळंला गाठ पडायची पंच्यात, त्यात आपली भर. तिथंच वन्सच्या गळ्यात पडून हंबरडा फोडला. "काय करू तरी काय आता कुठं जाऊ?" वन्सनी समजावलं पोरंबी गप झाली. तवापास्न झोपूनच हाय. बायसाब पोरांला जेवू घालायच्या.

वन्सनी दार फुडं ढकलून फटीतनं बघितलं, "बापू ऽ बापू ऽऽ उघडा की वो ऽ दार. आसं कितींदी बसणार?" आत कायच हाल, चाहूल दिसंना. वन्सनी घाबरून दारावर जोराजोरात धडका द्यायला सुरुवात केली. तसं मामांनी भिताडाकडं तोंड फिरवलं. वन्सचा जीव भांड्यात पडला. त्या भावाजवळ बसल्या, "दादा रं, तू तरी हाक मारून बघ, आरं ऽ बाबा झालं गेलं गंगेला मिळालं. आपली पुण्याई थोर म्हणून पुढचं वाईट-वकटं टळलं. माणसाचं मन लई वंगाळ, जेवढं दाबून, दडपून ठिवल तेवढं फट मिळाली की उसळी घेतं, की त्या उसळीनंच फाटतं? त्या येडाच्या भरात मग काय हुईल त्याजं त्यालाच भान रहात न्हाय. माणसानं कसं मोकळ्या मनानं सगळ्यासंग बोलावं, हसावं, रहावं. बापूंचा सोभावच लई कडक. हसून-खेळून न्हायच कधी. कुणासंगच मिळून-मिसळून राह्यलं न्हाईत." वन्सनी व्हठावर जीभ फिरवली. डोळ्याच्या कडा पुसल्या. तेच हात जमिनीवर आपटलं. वर आढ्याकडं बघत राहिल्या. थांबून बोलू लागल्या, "भावबंध कुजबुजाया लागल्याती. काय आसलं ती आपल्या घरातच राहुदी. सदरवर फोदरे नगं उघडं करू." धन्याच्या पाठीवर हात ठिवून म्हणाल्या, "मरू द्यायचं म्हाताऱ्याला तसंच?" धन्यानी चमकून त्यांच्याकडं बघितलं. परत म्हणाल्या, "तू बघ हाक मारून एकदाच. न्हायतर मी जाती बाबा. माझी पोरं बाळं ठिवून हिथं किती दीस राहू?" धनी उठलं. हातापायाची हाडं कडाकडा वाजली. माझ्याजवळ आलं. मुकाट्यानं बसलं. मामांनी अपराध केला होता. शिक्षा कुणाकुणाला भोगावी

लागतीय. वन्सच म्हणाल्या, "आगं सरसोती, आसं किती दीस चालायचं. तू झोपून, हा असा पडून. रानात कामाचा खोळंबा हुतूया. गुरं, ढोरं, ही लेकरं दुसऱ्याच्या जिवावर किती दीस तगत्याली. पोरं बघ कशी दीनवाणी दिसत्याती. साळा बुडतीया. तूच आता संपव बाई हे गिरान. सोडव सगळ्यांना. केलाय बापूंनी गुन्हा तूच दे शिक्षा पण दार उघडायला लाव. न्हायतर जिवाला काय तरी करून घेत्यालं." वन्सचा आवाज भरून आला. मी उठून बसले. त्यांन्ला म्हनलं, "बघा तुमी हाक मारून." त्यांनी माझ्याकडं बघितलं. हजार प्रश्न त्यांच्या डोळ्यात. डोळ्यानी खुणावलं. जा म्हनलं. तसं धनी उठलं. पार रया गेली हुती अंगातनं. चार दिसात म्हातारं झालं. वन्स बी गेल्या मागोमाग. आजचा चवथा दीस. धनी तवापास्न एक शबूद दिखील बोलले न्हाईत. त्यांच्या तोंडातनं आवाजच निघंना. नुस्त्याच दारावर धडका द्यायला लागलं. वन्सच म्हणाल्या, "बापू, दादा आलाय. आता तरी उघडा की, दार."

"बापूऽऽ" धडका मारता मारता ह्यांनी हंबरडाच फोडला. काळजात कालवाकालव झाली. काय हुईल? काय कळेना. "बापूऽ उघडा दार." ह्यांनी परत हाक मारली. दारावर धडका दिल्या. वाड्याच्या ह्या जाडजूड भिताडाबाहीर आवाज गेला न्हाई तरी आज ना उद्या कुणाच्या कानावर गेलं तर? जळळं मेलं. गेली असती माहेराला तर बरं झालं असतं. असा तोंड दाबून बुक्क्यांचा मार तरी नसता. कष्ट तर कुठंबी करायचंच की. पण धन्याचं काय?

"बापू, दादा आलाय आता तरी उघडा दार." वन्स रडत रडत म्हणाल्या, "बापू, झालं गेलं गंगेला मिळालं. माफी दिली सरसोतीनं. उठा की बापूऽ उघडा दार. तुमाला पोरांची आन हाय." वन्स थांबून हुंदके देत होत्या. "बापू, सरसोतीनं माफी दिलीय. उठाऽ"

वन्स कशाच्या आधारावर म्हणाल्या माफी दिलीय? बरूबर हाय त्यांचं. माफी द्यायची इच्छा नसली तरी सासऱ्याला, पोरांच्या आज्याला, नवऱ्याच्या बापाला मी काय शिक्षा देणारेय? दुक गिळायचं पोरांसाठी. सोसण्याशिवाय बाईच्या जन्मात दुसरं कायच नसतं का? असं वाटतं गाव

गोळा करावा, चावडीवर जावं न्याय मागायला. पण धन्यास्नी किती दुक झालं आसतं. गावातला सगळा आब मातीला मिळाला असता. त्यांचा बाप असा हाय म्हणल्यावर मन वर करून चालायला आलं नसतं. गावाला काय बोटं घालून मोठं करायला येतं. एकाचं दोन करून कथा वाढीवल्या असत्या. झाकली मूठ लाखाची म्हणायची अन् इसरायचं. खरंच इसरल हे सगळं? जन्माचा डाग लागला. ह्यो तर जाणारच न्हाय पण घरादाराची आब्रु आपल्याच हातात हाय. इतक्या दीस इज्जतीनं राहिलो आपुन. आताबी आसच रहायचं. आईबाचं नाव घालवायचं न्हाय. हिथंच राहायचं. घरासाठी, लेकरांसाठी मन दगडाचं करायचं. गिळायचं हे बी दुक.'

'बापू ऽ बापू ऽ' करून धन्याचा आक्रोश चालला हुता. वन्स बी रडत हुत्या. माझं काळीज धडधडत हुतं. काय व्हतंय कुणास ठाऊक? चार दीस कुणाच्याच पोटात आनपाणी न्हवतं. डोळ्याला अंधारी आली का कुणास ठाऊक धनी एकदम कोसळलं. डोळं पांढरं झालं. वन्स, बायसाब घाबरल्या. ''सरसोती, पाणी आन गं ऽ दादाचं डोळं बघ कसं झाल्यातंय.'' पोरं दादा, दादा करून वरडू लागली. मी पळतच बाहेर गेली. बायसाबांनी पाणी आणलं. वन्सनी घोटभर पाणी सोडलं त्यांच्या तोंडात. मी उशाला बसली, 'देवा, का रं परीक्षा बघतोस?' आत्याबाय तरातरा आल्या. दाराजवळ तोंड नेत म्हणाल्या, ''काय याड लागलंय का जीव चाललाय? बास झाली सोंगं, ढोंगं. हिथं पोरगं तडफडायला लागलंय. माणसाला तरास तरी किती द्यायचा?'' बडबड करीत ह्यांच्याजवळ आत्याबाय बसल्या. तोंडावरनं हात फिरवू लागल्या. ''डोळं उघड रं माझ्या लेकरा.'' त्यांच्या आवाजानं, चाललेल्या कालव्यानं मामांनी दार उघडलं. सगळी गपगार झाली. ह्यांनी बी डोळं उघडलं. नू चरकलंच काळीज चराचरा. थट्टा-कट्टा गोरापान देह म्हातारपणात बी एखादीला भुरळ पडावी आसं मर्दानी रूप. नुस्त काळंठिक्कर पडलेलं. गालफाडं बसलेली. खोल डोळ्यातली नजर इझून गेलेली. कशातच जीव नव्हता. मामा धन्याजवळ येत म्हणालं, ''उघड रं डोळं. आणखीण घोर लावू नगस. तुझ्या पाया पडतू.'' मामा ह्यांचं पाय धरू लागलं तसं धनी धडपडत उठलं.

“बापू, माझं कशाला पाय धरता? सुनंचं धरा.”

आधी हात धरायचा न् मग पाय...

“बास झालं की आता. झालं गेलं इसरा...” मला गदगदून आलं. वन्सच्या खांद्यावर डोकं ठिवून कोंडलेली वाफ मोकळी केली. घळाघळा गळणाऱ्या धारांनी मामांनी केलंलं पाप धुवून जाईल? मन निर्मळ हुईल?? जन्माला लागलेला बट्टा जाईल???

# फुललं समाधान असमाधानातून...

पावसाच्या भुरभुरीने ओलसर झालेली माती. शेजारीच चहाची टपरी. निंबाचं झाड त्याच्या आडोशाला ग्रामपंचायतीची पत्र्याची शेड असलेलं ऑफिस. गाववाल्यांची मिटींग चालू होती. पालकमंत्रीही आल्यामुळे ऑफिसबाहेर झाडाखाली बरेच कार्यकर्ते तंबाकू मळत बसलेले. कुणी कुणाशी फारसं बोलत नव्हते. सर्वांचे कान आत होते. सरपंच तावातावाने बोलत होते, "सचिव झाला म्हणून मारामारीचा परवाना मिळाला का त्याला पक्षाकडून? गुन्हेगारालाच मारलं नं त्यानं? उगा त्याच्यावर अन्याय का?"

दुसरा गावकरी - "तो कोण सचिव? आम्ही मोठं केलं त्याला."

सरपंच - "आवो, ह्यो साहेब आल्यापास्न गावाला कायदा कळायला लागला. परवा त्या गलांडेच्या सुनेवर बलात्कार झाला, तिनं दिला जीव. ह्यात गलांडेचा काय दोष पण पोरीच्या बापानं फिर्याद केली. सासरच्यांनीच छळलं, मारलं म्हणून. दोन्ही कुटंबाला मोलाचा सल्ला देऊन साहेबांनी त्यांचे लाखो रुपये तर वाचवलेच पण कोर्ट कचेऱ्याच्या तापातूनही सोडवलं की. दुसरा असता तर दोन्हीकडंच पैसे खाऊन हात वर केले असते. तुम्हाला सांगतू हा खेडून, गावकरी आले तर स्वत:च्या खर्चानं चहा-पाणी करतो."

गावकरी - "अशा नि:स्वार्थी साहेबांनी एकदम बदली करणं, असं तडकाफडकी घालवणं बरं दिसतं का?"

"बरं, मी फोन करतो एस. पी. साहेबांना. म्हणजे नीट खुलासा होईल." पालनकर्ते म्हणवणारे मंत्री म्हणाले. ह्यांनाच अडचणीचा होऊ लागला हा साहेब. अडले-नडले लोक पुढाऱ्याकडे जायचं सोडून पोलीस स्टेशनला येऊ लागले. हा लेकाचा कुणाला न जुमानता सगळ्यांच्या अडचणी सोडवू लागला तर निवडणूक लढवायची कशाच्या जिवावर? हे कार्यकर्ते पण त्यांच्याच नादाला लागलेत काय म्हणावं?

"यात काय खुलास्याचं? अं? त्या माजुऱ्याला पद मिळालं, लयच मस्ती आली की त्याला. चांगली जिरवली इन्स्पेक्टरनं. तो नाहीच सोडत कुणाला. बरं हा खोटं बोलला. पुरावा बघूनच पोलिसांनी चोपला न् त्याला. पक्षापेक्षा कुणी मोठा नसतो. कळू द्या त्याला बी."

"आता कुठं आपल्या गावाला शिस्त लागलीय. ती या साहेबामुळं. अन् लगीच राव बदली केली त्यांची?"

"नुकसान आपलंच की वो."

"जनतेत आपल्या पक्षाची प्रतिमा गुन्हेगारांना पाठीशी घालणारे अशीच होईल."

"बरं बघू रद्द करायला लावू बदली."

"रद्द झालीच पायजे. न्हायतर आमी उपोषणाला बसू."

"रात्रीपर्यंत ऑर्डर आली नाही तर उद्या शहर बंद."

"बघतो, करतो, तुम्ही शांत रहा?" वगैरे सांत्वन करीत पालकमंत्री आलिशान गाडीत बसून गेले.

गावकऱ्यांचं समाधान नाहीच झालं. त्यांनी गाव, पेठ, बंदची नोटीस पाठवली पोलीस स्टेशनला. नवीन आलेल्या इन्स्पेक्टरनं फौजदार जायभायला विचारले, "हा काय प्रकार आहे?"

"सर, त्या कॉन्स्टेबल गोसावी न् त्या साहेबांचं गुळपीठ चांगलंच जमतं. त्यानंच पेटवलंय सगळं."

"एका कॉन्स्टेबलमुळे गाव, पेठ बंद रहाणं शक्यच नाही."

"असं गहाळ बसू नका. त्याला मोकळा सोडू नका." फौजदार जायभायने नव्या साहेबांना कानमंत्र दिला.

पो. निरीक्षक हिम्मतराव पाटील यांना बदलीची ऑर्डर आली. फारसा विचार न करता नव्या इन्स्पेक्टरकडे चार्ज सोपवून कोल्हापूरला निघून आले. गोसावीनी बरीच मोर्चेबांधणी केली. गावातील वातावरण तापलेले, गावची सुव्यवस्था धोक्यात येऊ नये म्हणून मंत्री, एस. पी. वगैरे म्हणाले, "चर्चा करू. त्यांना भेटायला सांगा." आमदार म्हणाले, "अहो, आमच्या सचिवाला मारलं. आमची इज्जत काय राहिली. पक्षबांधणीसाठी लोकांचं मन राखावंच लागतं. तसं कोण जुमानणारेय? तरी त्यांनी माझी माफी मागितली तर करूच की रद्द बदली. चांगला आहे हे आम्हालाही माहितेय. पण आमची काही किंमतच नाही त्याला." आमदार, मंत्री, एस. पी. साहेब, पत्रकार मंडळी. गोसावी सगळ्यांना भेटून सांगत होता. दोन महिन्यापूर्वीच पत्रकार संघाचा पुरस्कार मिळालेला हिम्मतरावांना. सगळे पत्रकार, जनता पाठीशी होती. मग व्यापारी तरी कसे मागे राहतील?

गोसावींचा साहेबांना कोल्हापूरला फोन आला. "सर, आपल्याला एस. पी. साहेबांनी भेटायला बोलावलंय."

"गोसावी, भेटून काही उपयोग होणार नाही. जाऊ द्या हो."

"तसं नाही सर. तुम्ही याच. काम होईलच. काल सगळं गाव, दुकानं बंद होती. रस्त्यावर माणसं फिरकली सुध्दा नाहीत. तुम्ही भेटाच साहेबांना."

"मी आताच आलोय. आता लगेच निघणं शक्यच नाही. पहाटे निघतो मी. तुमच्या समाधानासाठी. बाकी काय विशेष?"

"मला जास्त बोलता येत नाही. तुम्ही लवकर या." गोसावी दबक्या आवाजात म्हणाला.

स्वयंपाकघरातली झाकपाक आटोपून मेधा आली. "काय झालं? कुठे निघाला लगेच पहाटे?"

"बहुतेक रद्द होईल बदली. साहेबांनी भेटायला बोलावलंय. पहाटेच निघतो." हिम्मतरावांचा चेहरा फुलून आला. कष्टाचं चीज झालं. जनतेनेच न्याय दिला. द्यायलाच पाहिजे. सुख, शांती वर अंगारे ठेवून रात्रंदिवस कुणासाठी काम करतोय? फक्त पगारासाठी? सर्वसामान्य, खालच्या थरातील लोकांना न्याय मिळावा, कमीत कमी आपलं ऐकून घेणारा आहे कुणी तरी एवढा दिलासा पीडित लोकांना मिळावा म्हणून तर जिवाचं रान करतोय. पण पुढाऱ्यांना किडा उठतोय. त्यांच्या पुढे कोणी जायला नको. पोलीस अधिकाऱ्यांनी ह्यांच्यापुढे नुसता गोंडा घोळायला हवा. मग ब्रह्मदेवही बदली करणार नाही. जनतेचे सेवक म्हणवतात स्वतःला... जनतेनेच शेवटी न्याय दिला म्हणून हिम्मतराव खुष होते.

"काल गोसावीबाईंचा फोन आलेला. म्हणत होत्या, नवा साहेब जेवायला सुद्धा सोडेना घरी. स्वतःबरोबरच जेवू घालतोय. शेजारचे लोक फोनवर बोलले ऐकताहेत न् नव्या साहेबाला जाऊन सांगताहेत. खोचरेने तर फटाकडे वाजले." मेधा सांगू लागली. तिनं तेलाची बाटली घेऊन त्यांच्या उशाशी बसली.

"कळलंय मला. सगळ्या काड्या घालायचं काम जावडेचंच. त्याला परवा लय झापलं होतं ना."

"गोसावीला मात्र त्रास. कितीच्या एस. टी. ने जाता?"

"सारख्या असतात गाड्या. पाचलाच निघतो म्हणजे, दहा वाजेपर्यंत पोहचले तरी."

"मग चारलाच उठावं लागेल. गवार निवडलीय दुपारी तीच देते चपातीबरोबर. चालेल का?"

"दे काय तरी. गोळी खायला बरं पडतं. चला कान्होबा, झोपू या." त्याचं टी. व्ही. कडं लक्ष नव्हतं. बाबा टेन्शनमध्ये आहेत म्हणून तो शांत बसलेला. पण आता बाबांचा नॉर्मल स्वर कानावर पडताच कान्हा म्हणाला, "बाबा, मी येऊ का?"

"कशाला रे ऽ. आता कुठे कॉलेज सुरू झालंय. बघू काय होतंय ते. परवा लगेच माघारी येतो."

मेधाने त्यांच्या डोक्यावर तेल ओतलं. "अगं अगं, एवढं कशाला?"

"जिरवते सगळं. म्हणजे शांत झोप लागेल."

"शांतच आहे मी. मला काही टेन्शन नाही. मी काय कुठेही ड्युटी करायला तयारच आहे."

"ग्रामीण भागातच तुम्हाला म्हणजे तुमच्या स्वभावासारख्या लोकांना स्कोप असतो नै. थाट असतो अगदी. पोलीस अधिकाऱ्याचा खरा रुबाब खेड्यातच." मेधा म्हणाली. तालुक्याच्या परिसरातले खेडूत शेतकरी भाजीपाला, सिताफळं, आंबे वगैरे आणून देतात. दूधवाला खरवस देतो. हुर्डापार्टीची तर मुलांची चैनच असते. शिवाय किती मानतात लोक."

"मर, मर काम करावं लागतं कसला रुबाब न् कसलं काय?" हिम्मतरावांचा नेहमीचाच शेरा.

"थोडं शांतपणाने घेत जा ना. किती सारखी बदली होते. वाढत्या वयाबरोबर थोडं टिकून राहण्यासाठीच म्हणतेय. किती दगदग." मेधाने हळुवार कपाळावरून हात फिरविले. ती म्हणाली, "गेल्या वर्षीच अण्णा हजारेंनी तुमचा गौरवचिन्ह देऊन सत्कार केलेला ना. त्यांना बघा की सांगून." तिला आपण फार योग्य उपाय सांगितल्याचा आनंद झाला. पारनेरला असताना अण्णांना ती भेटायला गेली पण मुंबईला गेल्यामुळे भेटू शकले नाहीत. नंतर नेहमीप्रमाणे पहाटेच कोल्हापूरला राळेगणसिद्धीच्या मार्गे जाताना अण्णा सकाळी फिरण्यासाठी आलेले रस्त्यावर भेटले. तिला केवढा आनंद झालेला. नमस्कारासाठी वाकणार पण ते नको म्हटल्यावर

तशीच थांबले. त्यांचं साधेपण, नम्रता खूप भावलेले. त्यांनाही ह्यांच्या कामाबद्दल आदरच आहे, होता म्हणून सत्कार केला. ह्यांना कुठल्याही पारितोषिकापेक्षा तो मोठा वाटत होता. "बदलीचं घाणेरडं राजकारण; कशाला त्या सज्जन संत पुरुषाला त्रास. लोकांनी स्वत:हून बंद पाळलाय. बदली रद्दच करावी लागेल. आता मी नाही मागे लागणार पुढाऱ्यांनीच माझ्या मागं लागायला हवं." मेधाला त्यांचं हे अहंकारी बोलणं खटकलं तरी कान्हाला आपले बाबा हिरो वाटायला लागले. त्याला उलट तालुक्याच्या गावाहून नगरला बदली झाल्यामुळे आनंदच झालेला. तो म्हणाला, "बाबा, नगरच चांगलं. तिथं मोबाईलला रेंज येईल."

"तसं नाही रे, तडकाफडकी हाकलल्यासारखं बदली होते म्हणून वाईट वाटतं. नाहीतर बदली होणं नवीन का आहे?" मेधाने तेलाची बाटली उठून ड्रेसिंग टेबलवर ठेवली. "ह्यात वाईट वाटण्यासारखं कायेय? ज्यांनी माझ्याविरुध्द काम केलं, त्यांना नामुष्की मला काय त्याचं? बदली रद्द होऊ दे एकेकाला घोडाच लावतो." त्यांचं असं बोलणं ऐकून मेधाच्या पोटात धस्स् झालं. डोक्यावरनं हात फिरवत आडवे झाले. मेधाने त्यांना पांघरूण घातले. ह्यांच्या रागीटपणावर पांघरूण घालता आले तर. परवा आऊट पोस्टच्या हवालदाराला पेट्रोलींग करायला सांगितलेलं. स्वत: दुसरीकडे गेले. वाटेत मधेच काय वाटले कुणास ठाऊक ड्रायव्हरला गाडी माघारी घ्यायला लावली. येऊन बघताहेत तर कचेरीचे दार बंद. हवालदार ड्युटीवरचे शिपाई झोपलेले. थाड्दिशी दारावर लाथ मारली. शिपायांना पळता भुई थोडी झाली. मागच्या दारातून, भिंतीवरून दोघे पळून गेले. कचेरीतला टी. व्ही., आरसा ह्यांच्या लाठीच्या तावडीत सापडले. गोसावींनी शांत केले. गोसावींना याची सवय झालेली. मेधा तिथे नसताना गोसावीची बायको जेवणाचा डबा देत त्यामुळे गोसावीचं बंगल्यावर येणं जाणं असे. मेधा आल्यावर मुलंही येत. दोघां कुटुंबीयांचा जिव्हाळा निर्माण झालेला. गोसावी कामाला वाघ, निर्व्यसनी त्यामुळे दोघांचे सूत चांगले जुळलेले.

हिम्मतरावांनी बंगल्यासमोरच्या आवारात लाल माती टाकून, व्हालीबॉल खेळण्यासाठी जाळी बांधून दिली. पोलीस शिपाई इथं तिथं भटकण्यापेक्षा सायंकाळी खेळतील म्हणून. एवढं मैदान आहे तर खेळावं इथंच ड्युटी संपल्यावर. पण एकदा एस. पी., डी. वाय. एस. पी. वगैरे वरिष्ठ नगरहून आले तरी हे लोक ड्युटी संपली म्हणून पोलीस स्टेशनला न येता तसेच खेळत राहिले. झालं हिम्मतरावांनी ते नेट, बॉल काढून घेतले, ''कामं सोडून खेळताय. लाजा नाहीत वाटत.'' चांगला पायंडा बंद पडला ह्यांच्या रागापायी. त्यांचा रुद्रावतार प्रथम बघणाऱ्यांची पॅण्ट ओली होत असे.

हिम्मतरावांनी स्वखर्चाने पोलीस लाईनीतील संडासपर्यंत पाईप लाईन करून दिली. टाक्या बसवल्या. रात्रीच्या वेळी पोलिसांच्या बायका बंगल्यासमोरच्या आवारात संडासला बसत म्हणून. पोलीस स्टेशन जवळच्या बोअरजवळ पावसाळ्यातले वळचणीचे पाणी जिरवण्याची सोय केली. ऑफिस तर भलतेच सजवले. कामात कुणी चुकारपणा केला की मात्र खैर नाही. त्यांना कामाशिवाय कुठलंच व्यसन नव्हतं. पोलिसांनी दारू पिऊ नये म्हणून अधूनमधून लेक्चर देत. हिम्मतराव सरकारी गाडी बंगल्यापर्यंत न्यायचे नाहीत. आवाराच्याच पलीकडे पोलीस स्टेशन मग चालतच जात. शेजारीच पोलीस लाईन. त्यांच्या चालत जाण्या-येण्यामुळे लाईनीतील नळावरच्या भांडणाला आळा बसलेला. दुकानात, दवाखान्यात वगैरे वैयक्तिक कामासाठी चालत किंवा रिक्षाने जात. सायंकाळी ते पोलीस स्टेशनला निघालेत म्हटले की घड्याळ लावावं अशी ठरलेली वेळ. पेट्रोलींगमुळे सकाळची वेळ थोडी मागे-पुढे होत. येण्याची बंगल्यावर मात्र पुढेच असे. सुट्टीत किंवा अधूनमधून मेधा आली की बिर्याणी, पांढरा रस्सा, कोल्हापुरी तांबडा रस्सा वगैरे चार-पाच ठिकाणी डबे जात. पण बाकीचे तीस-चाळीस तसेच राहत. मग एके दिवशी सगळ्याच पोलीस स्टाफला जेवणाचं आमंत्रण दिलं. मेधाने पंधरा किलोची बिर्याणी केली. सगळा स्टाफ तृप्त झाला आणि महिनाभरात बदलीची ऑर्डर आली. एरवी खाण्यापिण्यात फारसा चोखंदळपणा नव्हताच. म्हणून तर गोसावीबाईंना

डबा देताना काही वाटायचं नाही. 'असेल तसे खातात' म्हणायची. 'टेन्शनच नसतं' घरचं जेवण मिळतंय म्हणून हे खुष. जगण्यापुरतं जेवायचं. जेवणासाठी थोडंच जगायचं? बायका मुलांना आरामात राहता येईल एवढा फ्लॅट आणि घरखर्चाला पैसे पाठविलं की झालं. त्यांनी काटेकोरपणाने खर्च करून आनंदात रहावं. आपण गुन्हेगारांच्या नि:पातासाठीच ही नोकरी करतोय ही श्रध्दा.

ऑफिसमधला फोनही फक्त सरकारी कामासाठी वापरायचा. येणारे फोनही कामापुरते बोलून ठेवावेत. सतत एंगेज राहता कामा नये. फोनला लॉक लावल्यामुळे लोकल कॉल करायचीही सोय राहिली नाही. शिपायांना ऑफिसात बसल्या बसल्या गावाकडची खुशाली विचारणं कठीण होऊन बसलं. नाराज झाले बिचारे. असं काही असू शकतं, हे त्यांना माहीत नव्हतं. नाहीतर ड्युटीवर आलं की गावाकडची चौकशी. रोजगारी खुरपायला किती लावलेत? पाणी पाजलं का? भाजीपाल्यावर औषध मारलं का हे आता घरच्या फोनवरून विचारणं कसं परवडणार? त्या खर्चात गावाकडे फेरी मारलेली बरी. तर साहेब सारखा सोडत नाही. धाब्यावर जाऊन फुकटचं पिणंच काय, छोले भटूरे खाणंही बंद झालं. मोकळ्या रानात चरायची सवय लागलेली. आता फक्त दावणीत टाकलेली वैरण पुरेना, गोडही लागेना. बंधनाचा काच सोसवत नव्हता. किती दुखवायचे? लोकांनी मग शिव्याशाप दिले तर काय दोष त्यांचा? हा साहेब कधी जातोय याची वाट बघणारे असे अनेक होते. त्यातील धाडसाने फटाके वाजवणारा खोचरे एखादाच. पोलीस शिपायांच्या बायका मात्र खुष होत्या या साहेबावर. त्यांनी खात्री होती हे साहेब असताना आपले नवरे पित नाहीत, कुठे उंडारत नाहीत. आता 'इंकम' कमी झालाय खरा.

नवे एस. पी. साहेब आले तेव्हा जाणाऱ्या एस. पीं. नी जिल्ह्याची थोडक्यात माहिती दिली. पो. इ. हिम्मतराव पाटलांनी माहिती देताना म्हणाले, तो कुणाच्याच बापाचं ऐकत नाही. मंत्री असू दे नाहीतर लोकप्रिय साधुसंत. गुन्हा करणाऱ्यांना तो सोडत नाही. कुणाचीच गय करत नाही. अशा लोकांमुळे तरी सर्वसामान्य जनतेत थोडाफार कायद्याचा वचक

आहे. वेळ प्रसंग आल्यावर स्वतःच्या जिवाची पर्वा करत नाही. एकदा आरोपीला जिवंत पकडण्यासाठी दहा फुटावरून उडी मारली. पाय फ्रॅक्चर झाला तरी गडी फक्त दोन महिने रजेवर होता. जरा उठू बसू लागला की कुबड्या घेऊन हजर झाला. आता सुद्धा लंगडतोय पण त्याच्या ते गावीही नाही. अंगातली रग तशीच. मंत्र्या, पुढाऱ्यांचे बदल्यासाठी सारखे फोन येतात. ह्यांच्या तत्त्वनिष्ठेमुळे तर वैताग येतो. पण अशा सनकी लोकांना आपणच जपायला हवं.'' असं बरंच काही ऐकलेलं, नंतर अनुभवल्यावर हा रांगडा मर्द एस. पी. साहेबांच्या चांगलाच लक्षात राहिला. त्यामुळेच आताही ऑर्डर काढताना आधी त्यांना विचारले, ''तुझ्या बदलीसाठी दबाव येतोय. तू दुसऱ्या बाजूनी प्रयत्न कर.'' तर हिम्मतराव म्हणाले, ''साहेब, तुम्हाला योग्य वाटेल तेच करा, तुम्हाला अडचणीत आणण्याची माझी इच्छा नाही.'' त्यांना वाटलं होईल महिनाभरात. सचिवाच्या प्रकरणापासून असं काही होणार याची साधारण कल्पना आलेली, पण एवढ्या तडकाफडकी? साहेबांनी सकाळीच विचारले आणि दुपारी तीन वाजता हातात ऑर्डर. पाठोपाठ दुसरा इन्स्पेक्टर चार्ज घेण्यासाठी हजर. त्याच्याकडे चार्ज सोपवून कुणालाच न भेटता हिम्मतराव कोल्हापूरला गेले. मागे बरंच रामायण घडलं. दोन्हीही पक्षांचे कार्यकर्ते साहेबांच्या बाजूने. बदली रद्द करण्याचा चंगच बांधला त्यांनी.

हिम्मतरावांना आत कुठेतरी खोल जखम झालेली. अशावेळी तिथं थांबावंसंच वाटलं नाही त्यांना किंवा असंही असेल की अनपेक्षितपणे झालेल्या या मानसिक आक्रमणापुढे हतबल होऊन पळ काढावासा वाटला. वरवर कणखर असले तरी आत कुणाच्या आधाराला त्यांना जावेसे वाटले. तो आधार होता कोल्हापुरात! घरी गेलं की मन शांत होतं. निर्भय होतं. ही शांत निर्भयता उराशी बाळगून ते पुन्हा एस. पी. साहेबांना भेटायला गेले.

दुपारचे अडीच वाजले. आभाळ गच्च भरून आलेलं. महाराष्ट्रात दुष्काळ आहे पण कोल्हापुरात मात्र पावसाने चांगलाच जोर धरलाय. बाहेर जाणंही नको वाटतंय. पश्चिमेच्या खिडकीतून दूरवर पोलोग्राऊंड, उसाचं गुऱ्हाळ,

शेतं, झाडं ओलांडून नजर जोतीबाच्या डोंगरावर स्थिरावते. ढगांनी आच्छादलेल्या डोंगराला न बघता आल्यामुळे पुन्हा हिरव्या शेतावर, पोपटी ग्राऊंडवर रेंगाळते. पावसाळी, ताज्या हवेत आल्याचा स्वाद असलेला चहाची आठवण व्हावी किंवा गरम कॉफीचे घुटके घेत टी. व्ही. समोर बसायचे सोडून, मेधा अस्वस्थपणे फोन भोवती घिरट्या घालत होती. खिडकीलगतच्या शिरीषाला कळेना त्याची मनसंवादिनी आज आपलं कौतुक न्याहळायचं सोडून अशी बेचैन का आहे? आज तिचं डुलणाऱ्या शिरिषाकडं लक्ष नव्हतं की हिरव्यागार परिसराकडे. तिनं नवऱ्याला मोबाईल लावला. कट झाला. एस. पी. साहेबांच्या केबीनमध्ये असावेत. दुपार कलू लागली तरी तिला जेवायची आठवण नाही. तिनं अर्धवट सुकलेले कपडे आतल्या दोरीवर टाकले. नाहीतर जराशा भुरभुरीनं पुन्हा भिजायची. उगाचच हलक्या-सालक्या कामात वेळ घालवू लागली. एरवी पूजा झाली की कधी एकदा ताटावर बसू असं व्हायचं. सकाळी चहा पिताना पेपरवर फिरवलेली नजर आता जेवताना सगळं नीट वाचून काढते. जेवताना त्याचीच कंपनी असते तिला, दुपारी तरी. तिला आवडतंही फार दुपारभर फक्त स्वत:चंच असणं. साफसूफ केलेल्या स्वच्छ घरात प्रसन्न शांतता, सकाळ पासून धावपळ केलेल्या शरीराला विश्रांतीची ओढ लागते. पण आज कशातच लक्ष लागेना. उगाचच आवराआवरी चाललेली. कान्हा नुकताच कॉलेजात जाऊ लागलेला. आल्यावर कॉम्प्युटरशी खाटखूट करून जेवला. आधी भात खा म्हणून नेहमी बडबड करणारी मेधा आज काहीच बोलली नाही. जेवल्यावर ''गीतेचा अध्याय वाच'' म्हणाली.

''संध्याकाळी वाचेन.''

''आताच वाच ना. बघ कसा चंदनी सुवास दरवळतोय. पोटोबा पण शांत झालाय. कसं प्रसन्न, पवित्र वाटतं अशा वेळी. पटकन एकाग्रता होते.''

कान्हाने धुसफुसत खुर्ची ओढून देवासमोर गीता वाचायला सुरुवात केली. ''बघ अक्षरं पण कळेनात.'' जोरात टेबलावर गीता आपटली. मेधाने गीता हातात घेऊन म्हटलं, ''अरे, दहावीला संस्कृत घेतलं तरी ही बोंब.''

"ते वेगळं." मग मेधानेच चार-पाच श्लोक वाचून दाखवत म्हणाली, "ही काय इंग्रजी नाही. पूर्ण शब्दाचं स्पेलिंग बघून मग उच्चारायचं. असं बघ,

'अ ऽ ना ऽ श्रित: क ऽ र्म ऽ फलं का ऽ र्य क ऽ र्म ऽ करो ऽ ति य:'

स ऽ सं ऽ न्या ऽ सी ऽ च यो ऽ गी ऽ च न नि ऽ र ग्नि ऽ र्न ऽ चा ऽ क्रिय:'

अशी एकेक अक्षरे उच्चारत पुढे जायचं. तोंडात शब्द बसले की सोप्पं पडतं. मग अर्थही जातो उमगत हळूहळू. तू सुरुवात तरी कर." जरा गॅप पडला की लगेच विसरतात. सारखं मागं लागावं लागतं. गीता वाचून झाल्यावर देवाला नमस्कार करून उठला. पौंगडावस्थेतील अवस्था, अर्धवटपणा, फुटणारा आवाज, बेढब चेहरा आणि तिरसटपणा. जिथं तिथं असंच का? तसंच का? "अरे, तुझा आवाज बघ कसा पहाडी आहे. ह्यावर जरा मेहनत घेतलीस तर नुसतं बच्चन, पाटेकरसारखं आवाजी दुनियेत राज्य करशील." "हूं." करणंही त्याचं गुरगुरल्यासारखं वाटतं. कॉटवर पेपर वाचता वाचता लोळत झोपीही गेला. पुन्हा घरभर शांतता. अंगावर येणारी, नीरव कळलेली दुपार.

तिनं पुन्हा एकदा मोबाईल लावला. "हं. बोल."

"काय झालं? कुठं आहात?"

"मी मुसळेंच्या घरी जेवतोय. एक मिनीट हं. त्यांच्या मिसेसकडे देतो." मुसळेची बायको बोलू लागली. पारनेरला गोसावींच्या शेजारी राहणारी म्हणून जास्त परिचय. आता नगरला बंगला बांधून राहिलेले. मुसळेंनी तिथेच बदली करून घेतली. ह्या कॉन्स्टेबल लोकांनाही जमतं हवं तिथं बदली करून घेणं.

"हॅलो ऽ बाई ऽ कधी येता आमचा बंगला बघायला?"

"येईन की." अचानक काही बोलावं ते सुचेना तिला.

"तुम्ही इकडून गेल्यापासून आम्हाला विसरलात ना?"

"नाही हो ऽ कशी विसरेल. मनिषा कशी आहे? तिचं बाळ?" मुसळे फॅमिलीची वेबसाईट आता ओपन झाली.

"चांगलीय. तिकडंच असती आता ती. डी. एड. ला पास झालीय."

"सर्व्हिसचं काय झालं?"

"काय होणार आता ? राखीव जागांमुळं आपली मुलं मागंच पडतात. प्रयत्न करायचे. बाई, या की एकदा." मुसळेबाईचा आवाज भरून आला. तिनं मोबाईल साहेबांकडे दिला.

"हॅलो, मी आता जेवलो की जातो बंगल्यावर. एस. पी. साहेब म्हणाले, दुसरं पोलीस स्टेशन देतो. नको म्हटलं. साहेबांना म्हटलं येतो तुमच्याजवळच... जाऊ दे झालं. साहेबांना अडचणीत आणण्याची इच्छा नाही. अन् माझ्यामुळं कुणाला त्रास पण नको. ठेवू का?"

किती सहज स्वीकारतात सगळं. गेले चार दिवस पोटूशी बाईसारख्या वेणा सुरू आहेत. शेवटी हेच पिल्लू निपजायचं होतं तर. बरं झालं गोसावीबाईंचा रोज डबा देण्याचा त्रास वाचला. मागे दुसरे इन्स्पेक्टर आलेले नवीन तेव्हा ती म्हणालेली, "त्यांना नाही दिला डबा. एकदा दिला की तसंच चटावत्याती." तेव्हा मेधाला वाटलेलं उंचावरून खोल दरीत ढकलून दिलंय तिथं आपण दलदलीत फसलोय. मिंधेपणा हा असाच असतो. नको म्हटलं तरी ऐकायची नाही देतेच डबा. या डब्यामार्फत गोसावीचं स्थान अबाधित रहातं. सगळे जळतात त्याच्यावर. आता नव्या साहेबांकडे चुगल्या करतील म्हणून हिम्मतरावांनी चार्ज सोडला तेव्हाच म्हणालेला, "आता मला राहू द्यात साहेबांच्या बरोबरच. हक्काचे कसले मिंधे करून ठेवलेल्या साहेबांनी जावंच लागतं केव्हातरी. त्याच्या पायाखालची जमीन सरकलेली. कारण अवघं पोलीस स्टेशन त्याच्या वागण्यानं दुखावलेलं. ह्या लिबलिबीत गुंतवळ्यातून सुटका तरी झाली. दोन दिवसात तिकडून एक, दोन फोन आलेले. निरोपासाठी लिहून ठेवलेले. त्यांना फ़ोन करून काय ती हालहवा समजून घ्यावी वाटायचं. पण आपल्या नवऱ्याला हे आवडणार नाही. त्यांच्या बाहेरच्या नोकरी, काम वगैरेंच्या संदर्भात लक्ष घातलेलं त्यांना आवडायचं नाही. 'लय घाणंय.' दोन शब्दात त्यातील भाव कळून मेधानेही फारसं खोलात जाऊन विचारलं नाही. तेवढी जवळीक साधताच येऊ नये असे वागायचे. बाहेरच्या घाणेरड्या जगाशी संपर्क आल्यावर सुतकी

वागतात तसे. वर आणखी, "माझं मी बघून घेईन. माझ्या कामात बायकोनी लुडबूड केलेली नाही खपत मला." असे अनेकदा स्वाभिमानी डंख पचविलेत तिने. विषकन्या जसं थोडं थोडं विष पचवत असतात तसंच मेधासारख्या ९६ कुळीतल्या स्त्रिया अशा अपमानांनी आपली पतीनिष्ठा सोडत नाहीत. झोपण्यासाठी मासा पाण्याबाहेर कधी येईल का? तसं तिला आधी खूप काही वाटायचं नव्या नवलाईची स्वप्नंही रोमॅन्टीक होती. पण हळूहळू कळत गेलं तिला, सिनेमातलं, पुस्तकातलं जगच वेगळं असतं. बाईला कशा सगळ्या गोष्टी उमजत जातात ! सरावतात !! तशी तीही मग सरावली त्यांच्या संसारात.

बदली तर झालीच आहे तरी गावात काय चाललेय, आपल्या नवऱ्याबद्दल काय भावना आहेत लोकांच्या हे जाणून घेण्याची प्रचंड उत्सुकता तिला गप्प बसू देईना. फोनमुळं ते सहज शक्यही आहे. चार भिंतींना ओलांडून जायचीही गरज नाही. नवऱ्याबद्दल चांगलं ऐकण्यासाठी तिचे कान आसुसले होते. बरं चाललं होतं. उगाचच झाली बदली. एकदा असंच बंगल्यात राहायला आल्यावर ऐसपैस बंगला, बाग वगैरे तिला फार आवडलं पण सहा महिन्यात बदली झाली. तिला गप्प बसवेना. काय चालवलाय खेळ? नवरा यावर मौनच धारण करतो. मग तिनं एस. पी. साहेबांनाच पत्र लिहिलं, "आताच ॲडमिशन झालीय. मुलगा रुळू लागलाय. वगैरे आणि बदली इथंच जवळपास केली तर बरं होईल." असंच काही बाही. अर्थात अशा पत्राची दखल कुणीच घेत नाहीत. घरादाराची चाललेली फरपट तिला असह्य होत होती. सारख्या शाळा बदलून पोराचं शिक्षण नीट कसं होईल ही चिंता तिला भेडसावत होती. बरं, बरेच लोक पाचगणी सारख्या शहरात ठेवतात मुलांना, ह्यांना तेही नको. भावाच्या मुलाला घातलेलं परवडत नाही म्हणून काढलं. तर आता स्वतःच्या मुलाला कुठल्या तोंडाने घालणार. पैशाचं जमवलं असतं कसंही पण घरच्यांना मग काय वाटेल. हे असं सगळं. आत्यंतिक अस्वस्थतेपोटी तिनं टाकलेल्या पत्राबद्दल नवऱ्याला सांगितलं. काहीतरी सांत्वनाचे चार शब्द ऐकायला मिळतील वाटलं तर चांगले उखडलेच. "कशाला

लिहिलंस? उगाच गैरसमज फार, कपटी, संशयी आहेत ते. काय, काय लिहिलंस पत्रात?'' तिला याची कल्पना होतीच. आपण फार प्रामाणिक आहोत त्यांच्यापासून लपूनछपून काही करत नाही. करायचंच नसतं मुळी. पती परमेश्वराला नंतर कळतंच सगळं. त्यापेक्षा सगळं खरं खरं केलेलं बरं. नंतर चांगल्याच अक्षरात पत्र लिहायचं तर आधीची कॉपी राहतेच की. ती नवऱ्याच्या हातात देऊन मेधा गुपचूप स्वयंपाकघराकडे पळाली. धाकधूक होतीच. पण काहीच बोलले नाहीत. बहुतेक तिची तगमग त्यांच्यापर्यंत पोचली असावी. टी. व्ही. बघत नेहमीप्रमाणे जेवणं झाली. उठता, उठता म्हणाले, ''सहामाही झाली की करू कोल्हापूरला शिफ्ट.'' जेवणाइतक्या सहजपणे याही गोष्टी पचवायची ताकद येऊ लागते हळूहळू. आता सवयीमुळे म्हणा, वाढत्या वयामुळे म्हणा थोडा आत्मविश्वास आलाय. भीती थोडी कमी झालीय. तिनं पत्रकाराकडे फोन लावला.

''हॅलो ऽ नासीर पठाण का?''

''बोलतोय.'' ती जरा वेळ गप्पच. कायच सुचेना. नक्की कसं बोलायचं

''हॅलो ऽ'' पलीकडून पुन्हा आवाज आला.

''हॅलो ऽ काल तुम्ही फोन केलेला ना. साहेबांच्या बदलीचे काय झाले?''

''आपण कोण?''

''मी त्यांची मिसेस.''

''साहेब कुठायेत?''

''ने नगरला गेलेयत. रात्री बंगल्यावर येणारेयत. मला इथे काहीच समजेना.'' तिनं खोटंच ठोकून दिलं. कृती करू लागलं की बराच आत्मविश्वास गोळा होतो की. ''तिथे काय चाललेय कळेल का?''

''परवाचा बंद यशस्वी झालाय. साहेबांनी सांगितलंय दोन दिवसात काम करतो. नव्वद टक्के काम होईल. नाहीतर आम्ही सगळे पत्रकार उपोषणाला बसणार आहोत.''

''बरं. खूप टेन्शन आलं होतं म्हणून केला फोन.''

''नंतर कळवू आम्ही.''

''थँक्यू ऽ'' दहा टक्केच खरी. कटू सत्य कळल्यावर दिलासा नाहीच मिळत. मनाची धाव चालूच राहते. कुठेतरी काडी मिळतेय का बघतच,

शोधतच राहतं मन. एस. पी. साहेबांचं दोन्ही डगरीवर पाय ठेवून काम चाललंय. दोन्हीकडेही आश्वासनं देताहेत. त्यांना कुणालाच दुखवायचं नाही. मूळ काढताना काट्याला काहीच वाटलं नाही. आजूबाजूलाच ठणका. पण तोही होईल कमी. एकीकडे प्रामाणिकपणा, कष्ट, तळमळ, निष्ठा. तर दुसरीकडे राजकारण, सत्ता, प्रतिष्ठा, बेरजा-गुणाकार यांचे खेळ. पुढाऱ्यांना दुखावून चालत नाही. एक वेळ पाटीलसाहेब घेतील समजून पण राजकारण्यांचा इगो-प्रॉब्लेम कसा निस्तरायचा? अहोरात्र ढोरकष्ट करणाऱ्या एका किंचित पोलीस इन्स्पेक्टरची खुर्चीपुढे काय किंमत? बळीचे शेर हेच वाईट वाटतंय पण अनेकांना, त्यातही प्रतिष्ठितांना दुखावण्यापेक्षा निरुपद्रवी खड्याला बाजूला करणे सोपे होते. त्यांनी स्वतःचं स्थान सांभाळण्यासाठी तेच केलं. तापलेल्या जनतेला थंड होईपर्यंत झुलवत ठेवायचं म्हणजे झालं. मेधाची तगमग वाढत होती ती या सगळ्यांमुळे. हे राजकारण हिम्मतरावांच्या लक्षात येत नसेल का पण घाण म्हणून फिरवायची पाठ. त्यांना ते जमत होतं पण का असा अन्याय? मेधा स्वस्थ बसू देईना. असं कातडं पांघरून बसायचं किती दिवस? दगडासारखं केलेलं मन केव्हातरी तडे जाणारच की. हादरे बसून हतबलतेचे झरे डोळ्यावाटे कढत बाहेर पडतात. किती समजावायचं स्वतःला? किती द्यायचा धीर? त्यांना फुले नकोच आहेत. तिला गप्प बसवेना. तिनं आणखी एक नंबर लावला.

"हॅलो."

"मोरे बोलतोय."

"मी कोल्हापूरहून बोलतेय. साहेबांच्या बदलीचे काय झाले?"

"बरं का ताई, आम्ही आमच्या परीने खूप प्रयत्न करतोय. ऐंशी टक्के काम झालंय. उद्या, परवा कळेलच." खऱ्याचीच टक्केवारी वाढू लागलीय.

"तिकडे वातावरण कसं आहे? काहीच कळत नाही. खूप टेन्शन आलंय. खरं तर साहेबांना असं फोन वगैरे केलेलं नाही आवडत, पण ते इथं नाहीत. काहीच सुचेना म्हणून केला फोन." अतिताणामुळे किंवा तो पलीकडचा आवाज ताई म्हणाला त्यामुळे पण मेधानं सगळं खरं सांगितलं.

"काही काळजी करू नका ताई. साहेबांचा तत्त्वनिष्ठ स्वभाव माहितेय आम्हाला. मी कळवतो उद्यापर्यंत. काळजी करू नका. आम्ही प्रयत्न करतोय. साहेब आम्हाला अजून हवे आहेत. वर्षभरात जी शिस्त लावलीय आमच्या तालुक्याला त्यांनी त्यासाठी तरी आम्हाला त्यांची गरज आहे. तुम्ही काळजी करू नका."

"हो. थँक्यू." मेधानं फोन ठेवला. म्हणत होते सर्वसामान्य जनतेवर माझी भिस्त आहे. शेतात भावबंदकी गाजवणारे लोक ह्यांची बदली रद्द करणारेयत की, मजुरी करणाऱ्या, भांडकुदळ बाया, की किरकोळ कामं करणारे कामगार भाजीवाले? ज्यांच्याशी हे सौजन्याने वागत होते. एस. पी. साहेबांनी गोड बोलून गाशा गुंडाळायला लावला. आता बंगल्यावर जाऊन न्हाव्याकडून हजामत करून घेताहेत, इतक्या दिवस दुसऱ्यांची केली. मेधाला कळेना आपल्यालाच का टेन्शन येतंय? आपल्यालाच का वाईट वाटतंय एवढं? बदलीची सदा टांगलेली, वरचेवर कोसळणारी तलवार नेहमीचीच. आता तर घट्टे पडलेयत. त्याच त्याच घावांनी. कान्हाची दहावी-बारावी जवळ येऊ लागली. तसं त्यांनी ठरवलं, बारावी होईपर्यंत तरी बिऱ्हाड हलवायचं नाही. पहिल्यांदाच पाच वर्षं एका ठिकाणी राहिलो. नाहीतर लग्न झाल्यापासून भटक्यासारखं जगत राहिलो. काय फरक पडणारेय? त्यांना काही वाटत नाही मग आपल्यालाच का एवढं अस्वस्थ वाटतंय? त्या गावानं खरी पारख केली म्हणून? अनेक चार-दोन रुपयांचे सन्मान, सत्कार मिळाले म्हणुन? चांगला साहेब ! गरिबांचा वाली. गुन्हेगारांचा कर्दनकाळ वगैरे वगैरे प्रसिद्धी मिळाली याच गावात म्हणून? या सगळ्यामुळे आपला नवरा खरंच कर्तबगार आहे याचा विश्वास मिळाल्यामुळे? धकाधकीच्या नोकरीत कसली हौस, मौज, फिरणं-बिरणं काही नाही. त्यामुळे बसलेली अढी, आलेली निराशा या सन्मान, सत्काराने थोडी फार दूर केली. घटकाभर कर्तव्य उजळून निघालं, म्हणून? असले आनंदही औट घटकेचेच.

मागे एकदा, जेव्हा तिच्या स्वप्नांचा झुला आशेच्या झुळकीवर झुलत होता. पूर्ण थांबला नव्हता अजून. आक्काच्या नात्यातला पोलीस शिपाई

म्हणालेला, "तुमच्या पावण्याला पैसा मिळवता येत नाही. पैसे खायला पण अक्कल लागते. भित्रे आहेत साहेब." फार वाईट वाटलेलं. बिनअकलेचा नवरा म्हणून की तो असा खरं बोलला म्हणून? काय की, आक्का सांगत होती त्याची बायको महिन्याला काही काही खरेदी करतेच. भांड्यांचे, साड्यांचे सगळे प्रकार तिच्याकडे आहेत. आमच्याच घरात भाड्याने राहते पण काय रुबाब तिचा." पोलीस शिपाई एवढे रुबाबात राहतात अन् हे तर साहेब आहेत तरी आपण असं कसं? बाकीच्या बंगल्यातले लोक पण कसे रहायचे? त्यांच्या बायकांना शिपाई 'बाईसाहेबच' म्हणायचे आपल्याला तसं कोण म्हटलंच नाही. गोसावी सुद्धा फक्त 'बाई'च म्हणायचा. कधी, कुठे वाचलेलं वारं शिरायचं डोक्यात स्त्रीमुक्तीचं. अन् आपणही कमवावं काहीतरी. पण शिलाईशिवाय दुसरं कुठलंच काम करू शकणार नाही ह्या परिस्थितीत. सदा बदली. नवं गाव, नवी माणसं. धटून काही करावं, तेवढे गट्सच नाहीत आपल्यात. ऐष, रुबाबच आवडतो आपल्याला. उगाचच अंगणाला नावं ठेवण्यात काय अर्थ. नवऱ्याच्या मागं जाण्याचंच जास्त चांगलं जमतं. तीच सवय पण लागलीय.

तिला कॉफी खूप आवडायची. तिच्या आक्काच्या घरी ताज्या म्हशीच्या दुधाची वाफाळलेली कॉफी आठवायची. पण हिच्या घरात महाग असते म्हणून नसायचीच. तिला आवडायची पण त्याला नव्हती आवडत. पिठलं भात ही फार प्रिय पण तांदूळ विकतचे, ज्वारी घरची, शेताकडील म्हणून मग ती पिठलं भाकरी आवडीनं खायची. तेव्हा भूक पण केवढी होती. उरलं-सुरलं सगळं संपायचं. कामवाली नाखुष. टिकायचीच नाही. हिलाही तिचे नखरे आवडायचे नाहीत. स्वत:चेच नसतात हिचे कोण पुरविणार पण सगळ्या साहेबांकडे असतात म्हणून ठेवण्याचा अट्टाहास. सोलापूरला बदली झाली तेव्हा शेजारी साहेब होते त्यांची चांगली दोस्ती. ट्रेनिंगला एकत्रच होते. त्यांच्या मिसेसनी त्याला सुनावले, (काही काही बायका दुसऱ्या पुरुषांकडे धीटपणाने बोलतात. त्यात तिच्या बाजूने म्हटल्यावर तर तिला त्यांच्याबद्दल अतीव आदर वाटू लागला.) त्या म्हणाल्या, "पोलीस शिपायांच्या बायका पण केवढे दागिने घालतात. तुम्ही एवढे

साहेब असून चार बांगड्याही नाहीत.'' ऐकलं पण त्यांनी. चार-दोन वर्षांनी असाच एकेक दागिना वाढू लागला जसा जसा पगार वाढू लागला तसातसा. पण वयही वाढू लागलं. दागिन्यांची हौस वाटेनाशी झालेली. हिम्मतरावही कधी घाल वगैरे म्हणायचे नाहीत. 'साधीच चांगली दिसते.' हीच कौतुकाची परिसीमा. शेजारी सत्यनारायण घालायचे लोक बाईसाहेब नटून-थटून आलेल्या तेवढ्याच श्रीमंत लोकांना दूध द्यायच्या. भारावून जायची मेधा. तिला वाटायचं आपणही घालावा सत्यनारायण. देवाला साधेपण आवडतं पण हिम्मतराव म्हणायचे, ''नोकरीच देव आहे माझा.'' काम, काम, कामच ! सासरे आल्यावर जरा बरं वाटायचं. ते धान्य-बिन्य घेऊन यायचे. जरा ह्यांचंही घरात लक्ष रहायचं. पण तरी तिला त्या लोकांचा रागच यायचा. तेच पैसे नेतात म्हणून इथं आपल्याला काहीच करता येत नाही पण ते फारसं खरं नव्हतं. एकदा तिची सासू म्हणालेली, ''हा नुसताच साहेब झालाय. आमच्यासाठी कायच करत नाही. तुझ्या खर्चिक स्वभावामुळेच खड्ड्यात जातंय घर.'' असं बरंच काही.

बाकीच्या बंगल्यातून पडदे लावलेले असायचे. किती छान वाटायचे ते झुलणारे पडदे बघून. खानदानी, भारदस्तपणाचा श्रीमंती दरारा वाटायचा. तर हिम्मतराव म्हणायचे, ''कशाला लागतात पडदे?'' शिपाई म्हणाला एकदा, ''आधीच्या साहेबांची भाजी मीच आणायचो. कधी लागली तर सांगत जा.'' मग दिले पैसे. त्याने भाजी आणली तर उरलेले पैसेच दिले नाहीत. मग स्वतःच आणू लागले. अन् नातेवाईक म्हणायचे, ''तुला काय बाई, सगळं वाणसामान, भाजीपाला आणायला शिपाई असेल.'' हा कोल्हापूरचा फ्लॅट घेतल्यावर बुलेट विकायची ठरवली. खूप पेट्रोल खाती, सारखी बंद पडते. दुरुस्तीचा खर्चही परवडत नाही. मेधानं दोन वेळा विरोध केला पण तिसऱ्यांदा त्या हवालदाराने शेवटचं विचारलं, ''साहेब, दुसऱ्या बुलेट मिळतील पण ह्या बुलेटचा १००० नंबर म्हणून मागे लागलोय. मला कुठली तरी घ्यावीच लागणारेय गाडी.'' मग त्याच दिवशी ते घरी येऊन कागदपत्र घेऊन गेले. मेधाने शेवटचेही तिला बघितलं नाही. सुचलंच नाही. बुलेटवर बसल्यावर कसं साहेबांच्या बायकोसारखं वाटायचं. लाल

दिव्याच्या गाडीमुळे बघणाऱ्यांच्या नजरेत बदल व्हायचा. तेवढंही सुख नाही आता. सतरा वर्षं जिनं मिरवलं तिला जाताना आपण साधा निरोपाचा स्पर्शही केला नाही. पण तिला कळेना, हवालदाराला आवडलेली गाडी वापरणं परवडतं मग ह्यांना का नाही अक्कल नसल्यामुळं? तिला खूपच गरीब सामान्य वाटू लागलं.

ह्या गावामुळे आपल्या नवऱ्याची खरी अक्कल कळली तिला. अण्णा हजारेंनीही गौरव करावा आपल्या नवऱ्याच्या कामाचा. वयाबरोबर थोडं थोडं कळू लागलेलं. निष्काम कर्मयोग म्हणजे काय, आपल्या ह्या धटिंगण नवऱ्याला माहीतही नाही. तो आपण समजून सांगायचा कान्हाला. (स्वत:ला कळला नाही तरी) आपला नवरा मात्र तसं जगताहेत ! मेधाच्या अंगातून सरसरून वीज सळसळली. अंगभर शहारे उठले. डोळ्यात पाऊस ओथंबला. हृदयातल्या घननिळाला डोळ्यातल्या यमुनेनं स्नान घालताना तिची तगमग थांबली. तिचा शिरीष पालवत होता. वारा सुखावत होता. ओला, हिरवा गंध घरभर दरवळत होता. पोलो ग्राऊंडच्या गवताळ चिखलात रमणमळ्यातली मुलं बेधुंदपणे फुटबॉल खेळत होती. सगळं वातावरण उत्सवी, रसरसलेलं ! अशा चैतन्यात सुवर्णमय श्वास घेऊन जगतोय आपण, ह्या जाणिवेने मेधा गहिवरली. सळसळत्या सृजनात स्वत:चं अस्तित्व विरघळून गेलंलंही कळलं नाही तिला.

# देवाने मारलेल्या गाठी

मातीत खेळून मळलेल्या पिंटीचा तसलाच मळलेला फ्रॉक, बटणं नसल्यामुळं बाही कोपरापर्यंत ओघळलेली. मळकं बोट नाकात कोंबून पिंटी डुकराच्या पिलांना न्याहळून बघत होती. गटार हुंगता हुंगता डुकरीण एकदम तिच्याकडे टक लावून बघायची. पुन्हा आपल्या उद्योगात मग्न. बारकीचं लक्ष गेलं तिकडं. दगडं तशीच हातात घेऊन ती पिंटीशेजारी येऊन उभी राहिली. हातातला दगड तिनं पिलांकडं भिरकावला तशी पिलं कुई ऽ कुई करत पळू लागली. डुकरीणही त्यांच्यामागे दोघी घाबरल्या नी अंगणात पळाल्या. अंगणात आल्यावर त्यांना सुरक्षित वाटू

लागलं. दोन्ही पाय पसरून सोनू रडत होता. नाकातला शेंबूड तोंडात निघालेला, डोळे चिपाडलेले, हातापायाच्या काड्या पण नरड्यात भलताच जोर. ओरडून ओरडून आईकडं बघायचा. पिंटी नू बारकी आल्यावर त्यांच्याकडं बघून जोरात रडू लागला. ह्या तरी घेतील ही आशा. राधा भांड्याच्या गराड्यात बसलेली. राख लावून घसाघसा भांडी घासून घमेल्यात टाकत होती. शेजारच्या अंगणात यमुनाबाई बसलेली. तिनं आवाज दिला राधाला, "आवर ग लवकर भांडी. गहू वलवून भरडायचेत." पुन्हा ती गप्पांत गुंग. राधाचा राग भांड्यांवर निघत होता. 'निदान पोराला तरी घ्यावं. पण कशाला देईल ती माझ्या मरतुकड्या पोराकडं लक्ष? तिच्या लेकी येणारेयत ना? ह्याच्या पण अंगात एवढा जोर कुठून आलाय कुणास ठाऊक? आजी तर बहिरीच झालीय. लेकींच्या गुणगानात नातवाचं रडणं कसं ऐकायला येईल?' राधाची धुसफूस चाललेली. भांडी धुवून तिनं घमेलं आत नेऊन ठेवलं. तवलीत पाणी उरलेलं. त्यानंच सोन्याचं तोंड खंगाळलं. पदरानं त्याचं तोंड पुसून तिथंच अंगणात सावलीला वळचणीलगत बसली. सोन्या रडून, रडून थकून गेलेला. तोंडात स्तन होतं तरी त्याचं पोटातून येणारे हुंदके चालूच. तिनं पदराने त्याला झाकून अतीव मायेने थोपटू लागली. सोन्या शांत होत होत झोपी गेला. राधाला पोराची कणव आली अनू सासूचा राग. 'साळकाया, म्हाळकाया जमवून बसती. घरी असल्यावर तरी पोरांकडं बघावं. आपलं धड न्याय जगापुढं कशाला रडं. बिड्यापुरतं तरी बापाला कमवता येतं का? पाच पोरं काढून बसलाय. नावाला कुंकवाचा धनी. खोकून खोकून छातीचं खोकं झालंय. सोन्या झाल्यापासून अंगाला हात लावण्यापुरती तरी ताकद उरलीय का त्याच्यात. सासू-सासऱ्याच्या जिवावर पोरं मोठी करायची. वंशाला दिवा हवा म्हणून पोरगी होईपर्यंत बाळंत होत राहिलो आपण. दिवा निपजला बापासारखा अंधारलेलाच. राधा खाली बघून माती उकरत होती. काळी सावळी पण उफाड्याचं अंग. लग्न लवकर जमेना. भावाला हाच घावला. मुंबईत कामाला आहे म्हणाला, 'मुंबईत दोन खोल्यांचं घर असणं इथं दहा एकराला ऐकायचं न्हाय.' नकार ऐकून ऐकून जीव किकून गेलेला. म्हटलं बाकी काय नाही तरी जिवाची

मुंबई करता येईल. एक-दोनदा फिरायला नेलं पण लाजच वाटायची. आपल्यापेक्षा बुटक्या बारक्या नवऱ्याबरोबर चालायची. मग बंदच केलं जाणं. नंतर वेळ तरी कुठं होता. एका पाठोपाठ चार पोरी. नवऱ्याची नोकरी गेली. मग तर दिवसभर राबणं नू दोन वेळा जेवणं ह्या पलीकडं आयुष्यच उरलं नाही. सासरा रिटायर झाल्यावर मुंबई सोडावीच लागली. पोटापुरती शेती सासूच बघू लागली. सासऱ्याला सवय नव्हती. नवरा कसातरी जायचा रानात. खुरपायला बाया लावलेल्या लक्ष ठेवायचा. तेवढंच. इथं आल्यावर सोन्या झाला. पण त्याचं ना कुणाला कौतुक, ना लाड. तिचं डोळं भरूनं वाहू लागलं. गरम अश्रुंचा थेंब सोन्याच्या अंगावर पडताच तो दचकला. रडायची पण चोरी. तिनं त्याला थोपटलं. हळूवार उचलून आत गेली. वाकळची घडी पसरून त्याला त्यावर झोपवलं. त्यानं उठू नये म्हणून त्याच्या शेजारी लवंडली. पहाटेपासून राबणाऱ्या शरीराला विसावा मिळताच डोळा लागला.

"अगं, तुला काय हाय का न्हाय? गहू वलवायचं. तासभर तरी दडपून ठेवायला पाहिजेत की. अशा झोपा काढायच्या असल्या तर आपलं आपलं बघायचं. आमाला न्हाय जोर आला. तुम्ही, तुमची कार्टी पोसायला. म्हातारपणाला लेका-सुनांच्या जिवावर बसून खायचं भाग्य कुठलं आमचं? त्यालाच पोसायची वेळ आलीय. पण हिला कुठं काय त्याचं? फुकटचं खाऊन झोपा काढतेय." तिची नेहमीचीच बडबड. राधाला आताशा फारसं काही वाटत नव्हतं. वाटलं तरी काय उपयोग. पोटभर खायला मिळतंय तिच्याच जिवावर. तिची तरी काय चूक. रानातलं तिच्याशिवाय कोणीच बघत नव्हतं. सासरा तीन वेळा खाऊन चावडीवर तंबाकू मळत बसायचा दिवसभर, पत्ते कुटत. पाच पोरांचा बाप पण शेंबडं पोरगं जास्त काम करील पण ह्याला तेवढं बी जमत नव्हतं. सासूचे बोल... सवय लावून घेतली तिनं. ती सोन्यापासून अलगद बाजूला झाली. त्याच्या अंगावरचं दुपट सारखं करून उठली. कणगीतून पायलीभर गहू काढून घेतलं. दोन नणंदा, त्यांची पोरं चार-पाच, त्यांचे नवरे पण येतात. थोरलीचा तर शेतातच छपराचं घर करून राहिलेला. येतोच. आक्का आक्का म्हणतो. आई-

आण्णा गेल्यापासून माहेर असून नसल्यासारखंच ही पिलावळ घेऊन माहेराला जाऊन त्यांचा रागराग करून घेण्यापेक्षा तिकडं जाणंच तिनं सोडून दिलं. थोरला नंदावा राखी बांधून घेतो. कधी मधी साडी टाकतो ओवाळणीला. तेवढाच शिडकावा मनाला सुगंधी करणारा. सालगडी म्हणून शेतात झोपडं बांधून राहिलेला. त्याचं ते घोटीव शरीर बघून मुंबईची नणंद पाघळली. तेव्हा बरी दिसायची. दिवस गेलं म्हणून त्याच्याशीच लग्न लावलं. रानात राबणं, पोरांचं करून नुसतं काळपट चिपाड झालेलं. पण मुरली तसाच धिप्पाड. तो आपल्याशी आपुलकीनं वागतो म्हणून राधाला केवढं बरं वाटायचं. तिनं घमेल्यातल्या गव्हाला पाणी लावून पोत्यानं झाकून ठेवलं. बाहेर जाऊन पोरी कुठंयेत ते बघितलं. धाकटीनं मातीत पडलेली खारकेची बी तोंडात टाकलेली. पिंटी मातीत काहीतरी हुडकत होती. ती तरातरा गेली. बारकीच्या तोंडातली बी काढून तिच्या पाठीत धपाटा घातला. तिनं भोकाड पसरलं. पिंटीच्या बकोटीला धरून उचललं. दोघींना दोन्ही हातात धरून फरफटत अंगणाच्या कडेला अंघोळीसाठी मांडलेल्या सपाट दगडावर आदळलं. म्हातारी पडवीत आडवी झालेली. पोरींचा गोंधळ ऐकून म्हणाली, "अगं, का त्यांच्या मागं लागलीस? हिला कामं जास्त झाली की अशीच करते." राधानं पोरींना खंगाळलं न् म्हणाली, "आता कसं देवासारख बसा इथं. मातीत खेळू नका तायडी न् मायडी येत्याला आता शाळेतनं." न् गेली आत. तिनं जातं पुसलं. खुंटा ठोकला. हलवून घट्ट आहे का बघितलं. गहू चांगलंच उमलून आलेलं. भरडायला घेतलं. थोडं झाल्यावर सासूला दाखविलं. "बघा आसंच का?" कधी न्हवं ती लापशी करायची. ह्यावेळी नणंदांची लापशी खायची इच्छा झाली. नाहीतर पुरणा-वरणाच्या वाटा-घाटाच्या राड्यापेक्षा लापशीच बरी. तोंडी लावायला भजी, कुरड्या तळली की झालं. गहू भरडून तिनं कोंडा पाकडून काढला. गहू भरून ठेवलं. संध्याकाळची झाडलोटीची वेळ झालीच. सोन्या उठायच्या आधी झाडलोट व्हायला पाहिजे. नाहीतरी स्वैपाकाची वेळ. त्याची रडारडी. पोरींचा कालवा. सासूची कावकाव. ह्यात जणू आपलं काहीच नाही अशी समजूत करून घेतलेला, कोपऱ्यात बिड्या फुंकत

बसलेला अशोक. तिनं केरसुणी हातात घेऊन केरासारखा तो विचार झटकला न् झपाट्यानं कामाला लागली. जळणाचा कवळा आणून चुलीपुढं टाकला. चुलीत जळण घालून आमटीला डाळ टाकली शिजत. तोवर सोन्या उठलाच. त्याचं दूध बीध थोरली शाळेतनं आल्यावर बघायची. रात्री धरणीला पाठ टेकेपर्यंत तिला उसंत नसायची.

धाकटी नणंद अडचण आली म्हणून आली नाही. थोरली परिवारासहित सकाळीच हजर झाली. चहापाणी झालं की तिनं मोठ्या कढईत तुपावर रवा भाजायला घेतला. वैलावर पातेल्यात गूळ पाण्याचं आधण ठेवलं. ती रवा भाजतानाच मुरली आत आला. ''आक्का, लय भारी वास सुटलाय. हे पोळ्याबिळ्यापेक्षा हेच बरं न्हाय का?'' तिथंच बसला. बाहेर पडवीत राधाची नणंद, सासू, सासरा, नवरा सगळे बसलेले. ''आक्का, तुझ्या हाताला चव बघ. हिला कुठलं असलं जमायला.'' राधा सुखावून हसली. त्याच्या बोलण्यानं चुलीतला जाळ बी मऊ रेशीम झाला. ''चहा प्यायचाय?''

''चूल कुठं मोकळीय?''

''उतारतीकी कढई.'' तिनं कढई उतरत म्हटलं.

''सगळ्यांनाच करं गं.'' सासूनं बाहेरनं फर्मावलं.

''आका बघ, तुझ्या एकटीच्याच मागं ताप. राही, तू ये ना, करू लागायला.''

''तुमालाच लय पागूळ आलाय तर करा. साधी लापशी तर करायची.'' हडकुळी राही चिरक्या आवाजात म्हणाली. तिच्या आवाजानं कानाला चरं पडायचं. मुरलीच रवा हलवू लागला. राही माहेरात माहेरपण भोगायला आली होती. काम करायला नव्हे. राधा म्हणाली, ''दादा, राहू द्या. मला सवं हाय. रोजचंच तर.'' तिनं चहात सामान टाकलं. ''आपला नवराच असा. मी तरी कामचुकारपणा करून कसं चालंल. पोरं लहानाची मोठी कशी व्हायची? पोरींची लग्न?'' रसरसत्या जाळाच्या उजेडात तिचा चेहरा फुलून आला.

"खरंय बघ पण पोरांकडं ध्यानच नसतं." तो हळू पुटपुटला. "कामातनं हुईल तेवढं करतीच की. ओढ्याकडंच्या झाडोऱ्याला कुठं ध्यान द्यावं लागतं." ती.

दुपारची जेवणं झाल्यावर राधाची आवराआवर भांडी चालली होती. सगळे गप्पा मारीत होते. कधी नव्हे ते म्हातारी सोन्याला मांडीवर घेऊन लापशी भरवत होती. राधा अंगणात भांडी घासत होती. पाच पोरांची आई पण तशीच भरलेली. तिच्या लयबध्द हालचालींकडं मुरली अनामिष डोळ्यांनी बघत होता. दिवसेंदिवस वाळत चाललेली चिरक्या आवाजाची राही त्याला डोळ्यापुढं नकोशी वाटू लागली. त्याला या विचारानं एकदम लाजीरवाणं वाटलं. तो उठून जाऊ लागला. पण सासूनं रहायचा आग्रह केला. मग रहावं लागलं. पण 'चावडीवर जाऊन येतो' म्हणून गेला.

चहा अधूनमधून करावाच लागत होता. लापशी बरीच शिल्लक होती म्हणून थोडा मसालेभात केला. सगळी आवराआवरी झाली. राधा-अशोकची आतली खोली मुरली-राहीला दिली. सगळी पोरं, माणसं पडवीत झोपली. सोन्या झोपत नव्हता म्हणून ती त्याला पाजत पाजत थोपटत होती. झोप आवरत नव्हती पण पोराला खेळायचा जोर आलेला. तेवढ्यात आतून कण्हण्याचा आवाज आला. तिचे कान आपोआप टवकारले. शरीर ताठर झाले. रक्त उसळायला लागलं. डोळ्यातला पेंग कुठल्या कुठं पळाला. ती उष्ण उसासे टाकत उताणी आढ्याकडं बघत पडून राहिली. कितीतरी दिवसात ती अशोकशी पुरेसं बोललीही नाही. झोपणं तर दूरची गोष्ट. तोही कसा अलिप्त एवढा. असा कसा हा? तिनं त्याच्याकडं बघितलं खुडामुडा घालून लहान पोरासारखा झोपलेला पाहून तिला त्याची कणव, राग, द्वेष सगळंच क्षणात सरसरून गेलं.

पहाटे उठून चूल पेटवून पाण्याचं पातेलं चुलीवर तापत ठेवलं. जाळ घालत ती तंबाकूची मिश्री लावत बसली. रात्री तिची झोप नीट झाली

नसल्यामुळं डोळं लाल तारवटलेल्यासारखे दिसत होते. मिश्रीच्या वासानं जरा बरं वाटलं. रात्रीची आठवण पुसट झाली. ती तांब्या घेऊन परसाकडेला गेली. मोकळ्या हवेत ती हलकी, मोकळी झाली. रात्रीचं ओझं पहाटेच्या गारव्यात विझून गेलं. माघारी येईपर्यंत पाणी तापलेलं. स्वत:ची अंघोळ आटोपली की तिनं मुरलीला पाणी दिलं. तो अंगावर पाणी ओतून घेऊ लागला. "नुसतीच भडाभडा कसली करता अंघोळ. पाठीला साबण लावू का?" "नको, नको राहू दी." असं म्हणेपर्यंत तिनं नवी लक्सची वडी काढून त्याच्या पाठीवरून फिरवू लाकली. 'केवढी भारदार पाठ...' तिच्या हातातून वडी निसटली. त्याच्या पुढ्यात पडली. त्यानं पुन्हा हातात उचलून दिली. ती पाठ घासू लागली. वडी खाली ठेवून तिनं पाण्याच्या धारेने पाठ चोळून दिली. मुकाट्याने येऊन चुलीपुढं बसली. त्या राजबिंड्या स्पर्शाने ती मोहरून गेली. चूल रसरसून पेटली होती. राधाच्या रक्तातला कण न् कण उकळत होता.

रानात शेतं खुरपणीला आलेलं. बाया मजुरीनं लावलेल्या. अशोक पण सासूबरोबरच रानात गेलेला. दुपारचं आवरून राधा सोन्याशेजारी पडलेली. त्याला पाजताना तिचा कधी डोळा लागला कळलंच नाही. पोरी बाहेर खेळत होत्या. सोन्याच्या तोंडात अर्धवट स्तन होतं. त्याचीही झोप लागलेली. पदर बाजूला पडलेला. तसं ह्यावेळी कोण येणारेय, फारशी सावधगिरी बाळगायला? दार अर्धवट ढकललेलं. मुरली गावात कशाला तरी आलेला. जाता जाता घरी पाणी तरी पिऊन जावं म्हणून घरी आलेला. मोकळेपणानं राधाशी बोलताही येईल. दार उघडून आत आला तर राधा झोपलेली. कपाळावर बटा आलेल्या. तटतटलेली उघडी छाती. तो तसाच उभा राहिला. माघारी फिरायचं भानच राहिलं नाही. नजर तिच्यावरून हटत नव्हती. राधाला चाहूल लागल्यामुळं की काय तिनं डोळं उघडलं, तो कोणी वेगळाच पुरुष समोर उभा असल्यासारखं वाटलं. तिच्या लक्षात आलं आपला ब्लाऊज वर गेलाय... ती पदर छातीशी धरत धडपडत

उठली. त्याच्याकडे न बघताच आत गेली. तिची झोप उडाली. पेशी न् पेशी तापू लागल्या. ब्लाऊजची बटणं बसवायला हाताचं अवसानच नव्हतं. चित्त थाऱ्यावर नव्हतं. तो आत आला. ती हातात पदर पकडून भिंतीला टेकून उभी. त्यानं तिचे दोन्ही दंड पकडले. त्याच्या नजरेत पार वितळून गेली ती. त्यानं तिला हळूवार जवळ घेतलं. ब्लाऊज काढून टाकला. तिला खाटेवर झोपवलं. मधल्या दाराला कडी लावली.

शेतात जोखमीची कामं फारशी नव्हती. पाणी पाजलं की गुरांढोरांचं करून मुरली गावात यायचा. त्याचं येणं वाढलं सासूला बरं वाटायचं. चांगलं चुंगलं करून घालायला राधाची चूल रसरसून पेटायची. चवदार पदार्थ ताटात पडायचे.

दुपारी पिंटी न् बारकी भांडता भांडता रडू लागल्या. त्यांना समजावत शेजारच्या आजी अंगणात आल्या. त्या कालव्यानं सोन्या उठून रडू लागला. आजींनी त्याला कडेवर घेतलं न् "राधा, राधा" म्हणून हाक मारली. मधलं दार बंद त्यांना आतून कण्हल्यासारखा आवाज आला. ती चमकली. सोन्याला घेऊन आपल्या घरी गेली. तिला वाटलं भरलं घर, रात्रीची थकून झोपत असेल... तिनं पोरींना समजावलं. गुळाचा खडा त्यांच्या हातावर ठेवला. पण सोन्याचं रडं काही थांबेना. इकडं तिकडं करत घटकाभर कसंतरी काढला. आजी सोन्याला घेऊन आली. घरात मुरली चहा पित बसलेला.

"राधा, घे बाई. कवाचा रडतोय. पावणं, तुमी कधी आलासा? पावणं आल्यावर तरी उठवावं की अशोकला."

"तुमी नेलंतवय त्याला? मला वाटलं त्यांनीच नेलं." राधानं सोन्याला घेत म्हणलं.

"मग कुठंय त्यो?" आजीनं आत डोकावत विचारलं.

"मजी आलंच न्हाईत व्हय ते?"

"मला वाटलं आत झोपलाय." आजीला नीट कळेना. ती जाता जाता म्हणाली, "तसं काय आसलं तर दोन तांबी घे अंगावरनं तसेच बसू नाय

चुली म्होरं.'' आजी गेल्या. राधाला घोर पडला... आजीला कळलंय का?

''कधी ना कधी कळणारच सगळ्यांना.'' मुरली.

''....?'' तिचे भयग्रस्त डोळे.

''तू भिऊ नगंस. बरं जातू मी.'' तिनं व्याकुळ हरणीसारखं त्याच्याकडं बघितलं. त्याचा पाय निघेना. त्याला वाटलं आसंच हिला उचलून लांब जावं जिथं कुणी नात्यागोत्याचं ओळखीचं नाही. पडला बाहेर. देवाला शिव्या मोजल्या मनातल्या मनात. 'काय बांधतोयेस रे गाठी? रसरसलेलं फूल अडगळीत टाकलं. माझ्या नशिबाला रस आटलेले चिपाड बांधून लय सुखात ठेवलंस बघ. असल्या चुकीच्या गाठी बांधतोस तू स्वर्गातून, तरी करतोच रे आम्ही संसार. होतातच की पोरं. वंश वाढतोच. हे असले दिवे लावतोस. आयुष्याचे दीप विझून जातात रे ऽ मरायच्या आधीच? त्या तिरमिरीतच तो दारूच्या दुकानाकडं गेला.

राधा अंगणात सोन्याला कडेवर घेऊन उभी होती. पोरी तिच्याभोवती कावऱ्या बावऱ्या झालेल्या. राधा सून्न झालेली. सासूनं आणि राहीनं दिलेले शिव्याशाप तिला ऐकायलाच येत नव्हते. जमिनीनं तिला धरून ठेवलं होतं म्हणूनच ती उभी होती. मुरली आला. त्यानं वेशीबाहेर दोन खोल्या बघून ठेवल्या होत्या. हे कधी तरी होईल याची खुणगाठ बांधलेली त्यानं. तो तिच्याजवळ येऊन म्हणाला, ''चल.'' तीही कठपुतळीसारखी त्याच्या मागून चालू लागली.

''हे लटांबर नगं घेऊस ?''

''....'' ती शून्य नजरेनं त्याच्याकडं बघू लागली. पुन्हा चालू लागली. युगायुगाची न संपणारी, तळवे भाजणारी, भगभगणाऱ्या मातीची वाट.

''ये तुमी, जा बापाजवळ.'' त्यानं पोरींना झिडकारलं.

''त्यांचा बाप कोणंय ते सांग म्हणावं. माझ्या लेकाला सांभाळीन मी. ही बाराबोड्याची अवलाद माझ्या बोकांडी कशाला?'' सासूनं तोफ डागली.

''मी आणलीत का माझी पोरं? तू पण तुझी नाही घ्यायची.'' तो चरफडला.

"आईविना लेकरं कुठं जात्याली?" ती चालू लागली. राखेसारख्या मातीतून चालताना उडणाऱ्या धुरक्यानं तिथंच पिलांबरोबर हिंडणारी डुकरीण घाबरून थबकली. मुकाट चालणाऱ्या घोळक्याकडे निरखून पाहू लागली. पुन्हा ती बिनघोर पिलाबरोबर माती हुंगत चरू लागली.

# होता उपवर....

बी. एस. सी. ची फायनल परीक्षा संपली आता पुढे काय? प्रश्नांचा मोठा आँ ऽ ऽ गिळायला टपलेला. काय करायचं पुढे? नुसत्या ग्रॅज्युएशनवर कुठे मिळणारेय जॉब? त्यात एस. वाय. एटीकेटीवर निभावलं. सर्टिफिकेट मिळेपर्यंत वर्ष-सहा महिने जाणार. फॅशन डिझायनिंग, कुकींगचे, ज्वेलरीचे, मेंदीचे, कॉम्प्युटरचे क्लास करून झालेले. आता काम करायचे? टी. व्ही. वर कार्टूनचा शो गळत ठेवला. कशातच लक्ष लागत नव्हतं. आईची स्वैपाक करता करता काहीतरी बडबड चाललेली. बाबा म्हणाले, "चला रे जेवायला." स्वत: जाऊन बसले. भूक

नव्हती तरी उठावंच लागलं. ताटात बेसनाचा लाडू वाढत आई म्हणाली, "दिपूताईचा साखरपुडा आहे परवा दिवशी. ती इकडे जेवायला येणारच नाही. म्हणून लाडू केलेत. मला तर नाही झेपणार या पायदुखीमुळे प्रवास. तुम्ही दोघेच जा." प्रणवपुढे ताट सरकवत आईने स्वतः सुरू केलं.

"चालेल." बाबा म्हणाले.

मला तर छान वाटलं. इथं केवढं बोअर व्हायला लागलंय. पण आई नाही म्हटल्यावर कसं तरी वाटलं पण जाऊ दे. तिची पायदुखीची कटकट तिथं चुकी खाण्यापिण्यामुळं वाढली तर मलाच वैताग. मजा करायची सोडून आईचेच पाय चेपित बसावं लागेल. वर आणखी सारख्या सूचना आहेतच. त्यापेक्षा मी आणि बाबा दोघेच बरे.

"अहो, राणूला पण तेवीसावं लागलंय की. तुमचं काही लक्ष आहे का?" आई बाबांच्या ताटात चपाती वाढत म्हणाली.

"वाढदिवस करायचा कां?" बाबा.

"आता वाढदिवस दरवर्षी असतोच की."

"करायचा का म्हणजे?" मला तर हसूच आले. आई तरी हे कशाला सांगतेय मधेच. लांब आहे की वाढदिवस.

"तिचा वाढदिवस सप्टेंबरमध्ये असतो. हल्ली फारच विसराळू झाला आहात. तिच्या लग्नाचं कधी बघणार आहात?" आई.

"ते होय? बघू की. अजून राणू लग्नाला कुठे आलीय?"

"कमालच आहे तेवीसावं चालू आहे तिचं आता."

"आसं होय? आजकाल लग्न जमवणं अवघडच झालंय." असं म्हणत बाबा हात धुवायला उठले. "ह्यांना तर कुठलीच गोष्ट सिरियसली घ्यायला नको. कसं व्हायचं काय माहीत." आईचं भात कालवत बोलणं चालूच. तिच्या चेहऱ्याकडं न बघताच कळत होतं तिचे डोळे भरलेत. आता मात्र तोंड उघडायलाच हवं. म्हणून म्हटलं, "ए आई, तू उगाच बाबांच्या डोक्यात काही भरवू नकोस. मला नीट सेट होऊ दे. मग बघू लग्नाचं."

"लग्न होणं म्हणजे सेटल होणं असतं मुलीचं."

"तूच तर म्हणतेस माझ्यासारखी घरकोंबडी राहू नकोस अन् आता मधेच हे काय?"

"अगं, शिक्षण झालं ना. आता वरसंशोधन आणि नोकरी संशोधन दोन्ही सुरू नको का करायला?"

"मला नोकरी मिळाल्याशिवाय काही दुसरं नको." मीही उठले. हे नवीनच टेन्शन आता.

मी आणि बाबाच गेलो दिपूताईच्या साखरपुड्याला. बरं झालं आई नव्हती. नाहीतर आता बसल्या बसल्या तेच गुऱ्हाळ चालू ठेवलं असते.

साखरपुड्यानंतर बाबा निघाले. पण मावशीनं ठेवूनच घेतलं.. पंधरा दिवस डॉ. दिपूताईचं आणि डॉ. जिजाजींचं तासं तास बोलणं, तिचं लाजणं. हे सगळं छान वाटू लागलेलं. सगळे म्हणायचे तिथं 'राणू, लाडू कधी देणार?' ह्या प्रश्नाचा आता राग येईनासा झाला.

एके दिवशी आईचा फोन आला. म्हणाली, "तुझी उंची, वजन किती गं?"

मी म्हटलं, "कशाला गं?"

तर म्हणाली, "तुझं नाव विवाहमंडळात नोंदवायचंय."

"कमालै, बाबांना चालतंय हे?"

"मग काय करणार? कोण बघणार तुला स्थळं? बाबांच्या फारशा ओळखी नाहीत. मामा तर केवढे बिझी असतात."

खरं तर सगळे पाहुणे खेड्यातले. आईला कसं मॉडर्न शहरी लोक किंवा मुलगा पसंत होता. जो करियर करू देईल. पण साडीतला फोटो कुठे होता? एकविसाव्या शतकातही विवाहमंडळात नाव नोंदविण्यासाठी साडीतला फोटो लागतो म्हणजे काय? शहाण्णव कुळीचा स्वाभिमान ! तूर्त तरी घरात आहे तोच देण्याशिवाय पर्याय नव्हता. बाबांना नव्हत्या पटत या गोष्टी. कोण कुठले अनोळखी लोक. सबंध तरी जुळायला हवेत? पण चांगलं सुशिक्षित, पुढारलेलं घर मिळण्यासाठी एवढं करायलाच हवं. हे आईनं कसं पटवून दिलं बाबांना हे तिलाच माहीत. शी इज ग्रेट ! विवाह

मंडळातून टपाल आलं की त्यांचे फोन नंबर्स मिळवणे. पुन्हा त्यांना फोन करणे. म्हणायची, "आपली मुलीकडची बाजू ना. मग आपणच फोन करायला हवेत." आईचा हा रिकाम्या वेळेतला उद्योगच होऊन बसलाय. बाबा मात्र या प्रकारापासून अलिप्तच. एके ठिकाणी बाबांना न विचारताच फोटो पाठविला कुरियरने. नंतर त्यांनी तो परत पाठविला पण कुरियरवाल्याने तो दिलाच नाही. मग रोज फोन. भयंकर बेचैन असायची आई. हा प्रकार बाबांना माहीत नसल्यामुळे आम्ही तिघेही टेन्समध्ये. मग मात्र बाबांना न सांगता फोटो पाठविल्याचा तिला खूप पश्चाताप वाटू लागला. रोज फोनाफोनी करून वीसेक दिवसांनी फाटलेल्या पाकिटातून फोटो मिळाला. वकीलकाकांनी सांगितले फोटो गहाळ झाला किंवा कोणी घेतला तरी फारसं नुकसान काही करू शकणार नाही त्यामुळे घाबरू नका. तरी फोन करून कधी रागावून. कधी चिडून, कधी विनंती करून तिनं तो मिळवला आणि पुन्हा फोटो कुठे पाठविण्याच्या भानगडीत पडली नाही.

गावाकडच्या नातेवाईकाने एक स्थळ सुचविले पण सगळं जुन्या रितीरिवाजाने करायला हवं. बाबांनी ते लगेच मान्य केलं. अगदी त्यांना तसंच हवं होतं. असंच सगळं. मला तर आश्चर्यच वाटलं. बाबा त्यांच्या अधीनच झाल्याप्रमाणे सगळं ऐकत होते म्हणेल ते ! मध्यस्थांनी मुलाच्या वडिलांना आणि बाबांना असं काही पढवलं होतं की बस्. बाबांनी त्यांच्याकडे माझा साडीतला फोटो पाठवला तर त्यांनी पूर्ण उभा फोटो हवा म्हणून सांगितले. तर लगेच बाबांनी फोटोग्राफरच घरी आणून फोटो काढले. पण ते चांगलेच नाही आले म्हणून स्टुडिओत गेलो. आईच्या सुचनेप्रमाणे तयार केलेला बायोडाटा बाबांनी पुन्हा बारीकसारीक बदल करत प्रणवकडून दुसरा तयार करून पाठविला. एवढे सगळं सोपस्कार झाल्यावर ७०-८०% मार्कांनी पास झाले आणि तिकडचे लोक यायला तयार झाले. मुलगा बी. ई. झालेला. ॲडव्हान्स ॲनिमेशनची फॅक्टरी. गावाकडे घर, शेती पुरेसं. म्हणजे सगळं ओ. के.

आधी मुलाच्या घरी जायचं कारण आपली मुलीकडची बाजू म्हणून त्यांच्या घरी जाऊन त्यांना मानाने बोलवायचे की, 'आमच्याकडे मुलगी

आहे. पहायला या.' शब्द हे नसले तरी भावना अशाच. तिकडे जाताना मामांना बोलावून घेतले. त्या लोकांना मामांनी येणं आवश्यकच वाटत होतं. लग्नाचा मामला म्हटल्यावर दोन्ही मामा दोन्ही कारखान्यांच्या कामातून वेळ काढून आले. मामांनी सगळं व्यवस्थित आहे सांगितल्यावर आईच्या जिवात जीव आला. मामांच्यावर १००% विश्वास तिचा. मला तर कळतच नव्हते. मुलगा-मुलगी एकमेकांना पाहण्याआधीच एवढा गोंधळ कशासाठी? ते येणार म्हणून साग्रसंगीत स्वैपाक केलेला. अगदी छोले, पुलाव, बासुंदी असं स्पेशल बरंच काही. बरं एवढं करून मुलगा आलाच नाही. दोन्ही मामा गावाकडचे शेत, घर बघून पुण्यातली फॅक्टरी बघायला बाबांच्या बरोबर बाबांच्या बलेरोत व मुलाकडचे लोक मामाच्या उनोत दोन्ही मामा, बाबा वगैरे सगळे संध्याकाळी घरी आले. मुलाशिवाय पाहण्याचा कार्यक्रम झाला. आईनं विचारल्यावर मामा म्हणाले, "मुलाचे वडील हुशारच वाटले जास्त. मुलाला आताच येऊ नको म्हणाले."

त्यांना पुण्यातल्या घरी सोडायला पुन्हा बाबा गेले. त्यांच्याजवळ आईनं मुलाचा बायोडाटा आणि फोटो मागितले तर त्या शहाण्यांनी फोटो तर पाठविलाच नाही, पण फोटो आयडेंटीटी साईजचा कुठंतरी ड्रावरच्या तळाशी सापडलेला असावा असा दिला. त्यांना दोन दोन कुंडली-फोटो पाठवून त्यांच्याकडून असं हे बेदखल वागणं. मुलाकडचं म्हणून ! आई तरी खुश. कारण मामांनी सांगितलेले मुलगा एकदम स्मार्ट-टॅलेंटेड आहे. सावळा असला तरी पर्सनॅलीटी एकदम झकास आहे. मला तरी हा गोंधळ फारसा बरा वाटलाच नव्हता. लग्न माझं पण मला कोणीच काही सांगत नव्हते की विचारत नव्हते. कमीत कमी माझ्या काही अपेक्षा तरी विचाराव्यात ते राहिलंच. लग्न ठरणारेय म्हणून. गूढ, गंभीर तणावाचे वातावरण. आई-बाबांचे चिंताग्रस्त चेहरे. अशात आपलं म्हणणंही मांडता येत नाही. वैताग साला. उगाच आपण उमेदवारी जाहीर केली. खरं तर मी कुठं जाहीर केली. त्यांनीच सुरू केलं सर्व आणि मी ते स्वीकारत गेले. खानदानी, स्वाभिमानी कुलातल्या लेकींनी कसं वागायचं असतं, असंच ना? आई

जरा तरी बोलते पण बाबांशी या विषयावर संवादच नाही. मुलाने पहायला येण्यालाच त्याच्या बापाने विरोध करावा याला काय म्हणायचे? अरे, कुठल्या काळात वावरताहात? मध्यस्थ तर म्हणाले, "मुलं त्यांच्या शब्दाबाहेर नाहीत." म्हणजे तिथंही हिटलरशाहीच का? बरं पाहण्याच्या कार्यक्रमात काय विचारावं, "गावाकडच्या घरात राहशील का?" म्हणजे काय लग्न झाल्यावर माहेरीच राहणार की काय? सासर म्हटल्यावर सासरी जावं लागतंच ना मग गावाकडंही जावंच लागेल की. ह्या मी काही बोललेच नाही. कोर्टातल्या सारखं हो किंवा नाही उत्तर द्यायची सवय नव्हती मला. मग मध्यस्थच म्हणाले, "तुमी बी काय विचारताय? ती काय न्हाय म्हणेल व्हय?" दुसरा प्रश्न - "उंची किती?" बायोडाटा नेला तरी हा प्रश्न? - तिसरा प्रश्न, "जन्मतारीख किती?" माझं तर डोकंच सणकलं. अरे, चाललंय काय? खाली वाकून नमस्कार केला. अतिशय राग येत होता. मामा म्हणाले, "चांगलाय मुलगा. काळजी करू नकोस. किरकोळ गोष्टीकडे लक्ष देऊ नकोस. ते हो म्हणाले तर लगेच ठरवून टाका." त्यांची अशी तडफदारी चाललेली की सरळ नाही म्हणावे. मग आईची मनधरणी सुरू. "मग काय हवंय तुला? आणखी कसा असायला हवा मुलगा. कर्तबगार आहे. उंच, धष्टपुष्ट आहे." वगैरे वगैरे त्याचे गुणगान गाऊ लागली. आई म्हणाली, "बाबांचा स्वभाव माहितेय ना तुला. जरा कोण गोड बोलले की पाघळलेच. असंच तुला कुणाच्या तरी पदरात टाकतील. मामा एवढं सांगताहेत तर खरंच असेल मुलगा चांगला. उगाच नाटकं करू नकोस."

मला आईचंही पटायचं. पण तरी रागच यायचा. स्वतःचं प्रदर्शन मांडण्याचा. साडी नेसून पाटावर बसणं, खोटं खोटं नम्र बोलणं. मग नमस्कार करणं. कोण कुणाचे ते त्यांना करा नमस्कार. सगळ्यांना पोत्यात भरून गणपती पुळ्याच्या समुद्रात फेकून द्यावं वाटायचं. पण हा काय उपाय होत नाही. दुर्लक्ष करायचं. आईबाबांच्या हातात नशीब देऊन नुसतं स्वस्थ रहायचं ठरवलं. तरी होणारी उपेक्षा माझ्या भावनांची कुणी महत्त्वाचं मानत

नव्हतं. त्यामुळं डोक्याचं भजं व्हायचं. साताऱ्याला घराचं बाधकाम काढलेलं. बाबांनी रजा काढलेली. काल ते पाहुण्यांचं घर बघून आले. येताना त्यांना घेऊन आले. जेवणं झाल्यावर त्यांच्या घरी सोडलं. सहज बोलता बोलता बाबा म्हणाले, "सकाळी साताऱ्याला जाणारंय." तर ते लोक म्हणाले, "मग येतो की आम्ही पण गाडीत." बांधकाम चाललंय म्हणून आईला चल म्हणाले. आई निघाली तर बाबा म्हणाले, "कालच्या पाहुण्यांना गाडीतून न्यायचंय." मग आईच म्हणाली. "मी मागे बसते." घरापासून तिला मागे बसवली. त्यांच्यासमोर तसं करणं बरं दिसणार नाही म्हणून. आता पुढेही बाबांशेजारी आई बसू शकली असतीच की पण अजून लग्न ठरायचे तरी व्याही म्हणून तेही मुलाकडचे. त्यांचा मान राखण्यासाठी म्हणून आई मागेच बसली. ड्रायव्हरचे थोडे सामान असल्यामुळे पाय अवघडून बसावं लागलं. पण हे बापे एकदाही म्हणाले नाहीत, 'पुढे बसा' आणि ह्या घरी मला द्यायला निघालेत तिथं स्त्रियांना किती सन्मानाने वागवतात हे दिसलं नाही त्यांना. पण असल्या गोष्टींचा बाबा तरी कशाला विचार करतील ? रात्री बाबा आईला सांगत होते, मुलाचे वडील म्हणाले, "शेजारी दोन भाडेकरू ठेवलेत. त्याचे पैसे बायकोच घ्यायची. मीही कधी विचारलं नाही. तिनं थोडं थोडं सोनं घेतलं. तेच पन्नास तोळे सोनं धाकट्या मुलीला घालून लग्न करून दिलं." म्हणजे यांच्या इनडायरेक्ट मागण्या कळू लागल्या. स्वतःच्या बायकोचं कौतुक सांगता येते. मग आईकडं का असं दुर्लक्ष. की मुलीची आई म्हणून ? आई बाबा साताऱ्याला गेले. प्रणव कॉलेजला. माझं कॉलेज संपलं म्हणून खंत वाटत होती. पण ह्या स्थळाच्या विचारानं डोकं भरून गेलेलं. वाटायचं मुलाला फोन करून त्याचे विचार जाणून घ्यावेत, बोलावं त्याच्याशी? कसा आहे नक्की तो? पण नाहीच झालं धाडस. मग टी. व्ही. चालू करून दिली ताणून. प्रणव आल्यावर जागी झाले. रात्री आईचा फोन. म्हणाली, "अगं, त्यांना घरापर्यंत सोडलं त्यामुळं घर तरी बघता आले. साधंसंच आहे. मुलाचे आईनं शिरा केलेला. घरचं दुधदुभतं आहे. साजूक तुपातला

शिरा खूपच सुंदर झालेला. एकूण बरं. मुलगाही छान आहे. बाईच्या जन्मात यापेक्षा वेगळं काय असतं?''

प्रणवने त्याचा आयडेंटीटी फोटो स्कॅन केला. स्क्रीनवर तो मोठा फोटो काही मनात भरलाच नाही. डोळे सुजलेले. काही चार्म नाही वाटला. पण आई म्हणाली, ''अगं, घाईने काढलेले फोटो. तुझे तर त्या दिवशी कसले वाईट आले होते.'' मग त्यांना मुलीकडच्यांना देण्यासाठी म्हणून तरी चांगला काढून ठेवायला काय झाले होते? काय किंमतच नाही. पण आईने हे फार मनावर घेतलेच नाही. बाबा त्यांचा शब्द झेलायला एका पायावर तयार. बाबांची पळापळी बघून गंमत वाटत होती. मुलीच्या लग्नासाठी हिटलरही नमतो तर. एवढं पडतं घ्यायचे की विचारू नका. लग्नाला खर्च येईल म्हणून बाबांनी वरच्या मजल्यावरचं बांधकाम रद्द केलं. आर्किटेक्टची नाराजी ओढवून घेतली. एकूणच हा माणूस बेभरवशाचा आहे असा बिल्डरनेही अंदाज केला असावा. पण मुलीचे लग्न ठरतंय म्हटल्यावर तेही समजले. आपल्याकडचे लोक मुलीच्या लग्नासाठी किती तडजोडी करायला, समजून घ्यायला तयार असतात ! आई एकदम खट्टू झाली. घराचा नकाशाच बदलावा लागला. एका रसिक गृहिणीला घराबद्दल किती ममत्व असतं हे आईचं छान उदाहरण. अगदी इंच इंच जागेचा विचार करते. पेपरमधले फेंगशुई, वास्तुशास्त्राचे, किचनचे वगैरे लेख कापून ठेवणार त्याप्रमाणे घर सजवण्याचा प्रयत्न करणार. लग्नामुळे घराचा नकाशाच बदलला म्हणजे ती नाराज होणारच की. तरी पण लेकीचं लग्न ठरतंय यापुढे अशी किरकोळ नाराजी कशी टिकेल ?

तर आई सांगत होती, ''त्या पाहुण्यांनी साताऱ्यात सोडा म्हणावं की नाही. गावाकडच्या घरापर्यंत सोडणं भाग पडलं. वैताग आला. किती पिळताहेत हे लोक. पण बरं झालं तुझं ते घरही पाहता आलं. सासूच्या हातचा शिरा खाता आला. घरच्या तुपातला शिरा सुंदरच झालेला. सुगरण आहे हं अजून तरतरीत. दहा वर्ष तरी तिला काही होणार नाही. नातवंडांचं चांगलं करीन.'' असं बरंच काही बोलत राहिली.

"अगं पण अजून ठरलंच नाही. काय बोलतेस सासू काय सासरा काय शी ऽ"

"तुला नाही आवडत तर मुलाचे आई-वडील म्हणेन. काय फरक पडणारेय. मुलगा मात्र छानच आहे. धिप्पाड देह अन् कोवळा चेहरा. हत्तीचं पिल्लूच जसं. तू मात्र तब्येत सुधारायला हवीस. हत्तीशेजारी ससा वाटेल."

आईचं हे चिडवणं मजेशीर वाटलं आणि थोडं थोडं आवडूही लागलंय. कसं दिसत असेल हत्तीचं पिल्लू?

रविवारी येणारेयत असा निरोप आला. मुलाच्या वडिलांना म्हणे पसंत पडली. आता बाकीची मंडळी येतील. आदल्या दिवसापासून आईची तयारी सुरू. उडीद डाळ भिजत घालणं. ढोकळ्यासाठी पीठ भिजवणं, गुलाबजामूनच पीठ आणणं. म्हणलं, 'काय एवढं कौतुक चाललंय त्यांचं?' चल माझ्याबरोबर हॅण्डीक्रॉफ्ट आणि पुस्तक प्रदर्शन बघायला. मैत्रिणी पण येणारेयत. माझ्या मैत्रिणींना आईशी गप्पा मारायला आवडतात. त्यानिमित्ताते जरा घराबाहेर पडणं होतं. तर म्हणतेय, "अगं, पण तुझे ते येणारेयत ना." "चलच. मी करेन मदत. ते उद्या दुपारनंतरच येणारेयत ना? आज दिवसभर आपण मजा करू चल." उडीद डाळ भिजत टाकून निघालो. खूप धमाल केली. पुस्तकं भरपूर घेतली. म्हणाली आता दिवाळी दुसरी काही खरेदी करायची नाही. पुस्तकामुळे पैसे संपलेच मग. हॅण्डीक्राफ्टचं प्रदर्शन राहिलंच. एवढी पुस्तकं आई एकटी कशी नेणार म्हणून मग मीही मैत्रिणींना सोडून आले. नाहीतर आईची भुणभुण होतीच. उद्याची तयारी करायचीय, उद्याची तयारी करायचीय. मी तर दमलेच होते आले की झोपले. पण आईला कसला उत्साह आलेला काय माहीत. लाईट जाईल म्हणून डाळ वाटून घेतली. ढोकळ्याचं पीठ भिजवलं. गुलाबजामूनचं पीठ मळायला घेतलं तर लाइट गेलीच. मेणबत्तीच्या उजेडात पीठ मळताना बहुतेक पाणी जास्त झालं असावं. गुलाबजामुन तळून पाकात

टाकले तरी लाइट नाही. गुलाबजामून एवढे थलथलीत झाले की हातातच घेता येईना. मी झोपले होते. मग सगळा राग निघाला माझ्यावरच. दुसरं पाकीट आणायला लावलं. 'हे सगळं तुझ्यासाठीच चाललंय ना' एवढं वाक्य टाळून बाकी सगळं बोलली ती. दुसरे गुलाबजाम मलाच तळायला लावले. ढोकळ्याचं पीठ ताकात भिजवलं. गुलाबजामून चांगले झालेले बघून जरा शांत झाली. म्हणून म्हटलं, ''कशाला एवढं कौतुक करतेय त्यांचं?'' तर म्हणाली, ''अगं, मी 'मी' आहे ! मुलाकडचेच म्हणून असं काही नाही. मला हौस वाटतेय. आनंद वाटतोय सगळं करण्याचा म्हणून करायचं. आलेल्यांना खाऊ पिऊ घालून तृप्त करावं एवढं मला कळतं. आता तर स्वार्थ आणि परमार्थ दोन्ही साधतंय.''

''छानंय.'' अलिप्तपणा दाखवत मी टी. व्ही. पुढे बसले. टी. व्ही. चं एक बरं असतं सुरू करून बसलं की मनातले सगळे ताणतणाव विसरून जातात. नाहीतर विचार करकरून आणि संतापून डोक्याचा भुगा झाला असता. आई दमलेली, आवरून पडली की झोपली. बाबा ऑफिसच्या कामानिमित्त जालन्याला गेलेलं. उद्या पाहुणे येणार आणि आपण नाही आहोत याचं बाबांना वाईट वाटत होतं. पण मला बरं वाटलं. त्यामुळे आईला पाहुण्यांशी बोलताना मोकळेपणा वाटेल. बाबा असले की फार दबलेली असते. परवा मध्यस्थाजवळ मुलाचा बाप (मुलाचे वडील की सासरा?) म्हणालेला (म्हणालेले !) साहेबांचा फार दबाव दिसतोय घरात वगैरे. बाबांना खूप राग आलेला. मग मध्यस्थाला शिस्त, संस्कार, संस्कृती याबद्दल भलं मोठ लेक्चर दिलं. एवढं होऊन पुन्हा मुलगी दाखवण्याच्या कार्यक्रमाला संमती दिली म्हणजे हिटलर किती तडजोड करू शकतो हेच सिध्द होतं.

असा तसाच स्वैपाक करून प्रणवचा डबा भरून दिला. रविवारी एन. सी. सी. असल्यामुळे तो चुकविणार नाहीच. जबरदस्त फॅन आहे मिल्ट्रीचा. इकडे मित्रांच्यात न रेंगाळता लवकर येण्याची तंबी दिली त्याला आईनं.

दोन वर्षापूर्वी काचेचा डिनरसेट घेतलेला पण गडबडीत फुटण्याच्या भीतीने काढलाच नव्हता. फक्त गौरीपुढे फराळ ठेवण्यापुरता काढायची. पांढरा रस्सा, सूप, खीर वगैरेंसाठी फक्त बाऊल वापरायची. आता मात्र पूर्ण सेट काढला. घासून पुसून टेबलावर व्यवस्थित मांडून ठेवला. सगळी तयारी करून दोघीही दोन वाजता मोकळे झालो. तीन वाजेपर्यंत येतील हा निरोप मिळाला. मध्यस्थ बाबांना फोन करीत, बाबा घरी. अर्ध्या अर्ध्या तासाला बाबांचे फोन. खरं तर मध्यस्थांनी डायरेक्ट फोन केला असता तर बाबांच्या कॉलचे पैसे वाचले असते. पण सुत्रं हातातून सुटू द्यायची नाहीत. मी तर दोन तास मस्तपैकी झोप काढली. आई नसेल झोपली. सारखी आत बाहेर करत असणार. माझ्या जन्माच्या वेळीही तिला एवढा त्रास झाला नसेल. एवढा आता होतोय. परक्यांच्या हवाली करताना होणारी मानसिक कुतरओढ, सतत द्विधा मन:स्थिती. फारच झालं तर देवापुढं तुपाचं निरांजन लावून बसणं. नाहीतर आसवांचा अभिषेक.

चार वाजता बाबांचा फोन आला, 'ते निघालेत. पंधरा-वीस मिनिटांत पोहोचतील. तयार रहा.' मला उठवून आवरायलाच लावलं आईनं. बायका येणार मग त्या आत आल्या तर पंचाईत म्हणून साडी नेसायला लावलं. माझी चिडचिड बघून म्हणाली, "आता युध्दात पडलीयेस ना तर अर्जुन नको होऊस."

"त्यामुळे तरी तुला कृष्ण व्हावं लागेल ना." "अर्जुन तर असतोच आपण पण कृष्णही आपलं आपणच व्हावं लागतं. आता आई किती दिवस पुरणारेय. एंजॉय कर सगळं. शेवटी काय चांगलं न् काय वाईट." दीर्घ उसासा सोडून शून्यात जात म्हणाली, "तो चांगला होता तर नाही म्हणालीस. आता ही शिक्षा भोगावीच लागेल."

'त्याचं' फार कौतुक आईला. मलाही आवडला होता. त्याचे विचार हळूहळू समजत-उमजत गेले त्यालाही. आणि थोडंसं कळलं त्याचं माझं नाहीच पटणार. खूप प्रेम करत होता म्हणूनच. मला त्याच्या रेशमीबंधनात

गुदमरण्यापेक्षा मोकळा श्वास घ्यायचाय. माझं स्वतःचं अस्तित्व सिद्ध करायचंय. त्याच्यात विरघळून जाण्यापेक्षा, अस्तित्वहीन, आईसारखं दबलेलं, ताणलेलं होण्यापेक्षा साधं, सुधं जगायचं होतं. मोकळं सहज. त्याच्या आठवणीने डोळे गरम झालेच.

सजून-धजून बसले टी. व्ही. पुढे बेल वाजताच आई म्हणाली, "अगं प्रणव असेल. उघड दार."

तरी नाहीच झालं धाडस. पळाली आत. नशीब निऱ्यात पाय अडकला नाही. तेच लोक होते. आता आईला टेन्शन आलं. पाणी, सरबत द्यायला आईलाच हॉलमध्ये जावं लागणार. एरवी हे काम माझं किंवा प्रणवचे असायचे. ते लोक पण अर्धवटच. एवढं बाईमाणूस म्हटल्यावर कुणी तरी उठून ट्रे घ्यावा ना हातातला. निदान मध्यस्थानं तरी? एकेक ग्लास सरबताचा आईनंच दिला प्रत्येकाला. म्हणे शहाण्णव कुळी.

प्रणव आला आणि आईला एकदम हायसं वाटलं. मध्यस्थांनी मला बोलावलं. हत्तीचं पिल्लू माझ्या समोरच्या खुर्चीत उठून बसलं. ताडमाड उंच. पिल्लाची पॅण्ट वर जात होती. मला तरी हसूच आलं. पिल्लाच्या बहिणीनं ओटी भरली. काय तरी विचारा म्हटल्यावर हत्तीच्या पिल्लानं रक्तगट विचारला. बायोडाटामध्ये तो नव्हता. हुशारीचं कौतुक वाटलं. सगळेच शांत होते. तणावपूर्ण शांततेत मला तरी नकारघंटाच ऐकायला येऊ लागली. एकदम टेन्शन कमी झालं. मी फारच रिलॅक्स वागू-बोलू लागले. माझं मलाच आश्चर्य वाटले. पिल्लाच्या बहिणी तुटक तुटक वागत होत्या. तरी मी त्यांच्याशी मस्तपैकी गप्पा मारत होते. आईचं डिश भरून देणं झालं. शिष्ट बहिणींनी, वहिनींनी, मुलाच्या आईने दोघांत एकेक डिश घेतली. प्रणवने मला डिश दिली. मीही मजेत खाऊ लागले. काय मस्त झाले होते दहीवडे. सकाळी गरम असताना खाल्लेलं. पण आताची चव न्यारीच. स्निग्ध, शीतल ढोकळा तर अप्रतिमच. खरं तर आईनं चितळेंच्याकडे असे पदार्थ करून पाठवायला पाहिजेत. तिच्या सुगरणपणाचं चीज होईल पण हिटलरशाहीत हे सगळं अमान्यच असणार. आपण मात्र

हत्तीच्या पिल्लावर अंकुश ठेवायचा. आईसारखं पतीपरायण, सतीसावित्री वगैरे नाही व्हायचं. कधी सुधारणार हे लोक काय माहीत ! आईकडून ढोकळा मागून घेतला. मीच आपली कौतुक करत होती. पिल्लाच्या बहिणीला दही चालत नाही म्हणून तिनं दहीवडे खाल्ले नाहीत. आईला प्रवासाने पित्त झालेलं. वहिनीला उशिरा जेवणामुळे नको होते. दुर्दैव त्यांचं. आईच्या हातचं खायला परमेश्वर अवतरेल. 'दाने दानेपर लिखा है, खानेवाला का नाम.' असो, हे त्यांच्या पोटात जायचंच नसेल.

मध्यस्थांनी सांगितलेलं पसंत आहे. बायकांना साड्या घ्या. पिल्लाच्या आईनं फारसे आढेवेढं घेतले नाहीत. पण बहिणींनी मात्र स्पष्ट नकार दिला साडीला. एखादी वस्तू न्याहाळल्यासारखं मला बघत होत्या. राग येत होता तरी मी रागावत नव्हते. बहिणीने तर जाता जाता शेजारी उभी राहून माझी उंची मोजली. वाटलं आपणच नको म्हणावं.

ते गेल्यावर अचानकच सर्दी झाली. एकदम आजारी असल्यासारखं वाटू लागलं. दहीवड्याची आणि थंड सरबताची करामत. तरी आईनं शेजारी हे सगळं घेऊन पाठवलंच. करते खंडीभर. मग उरतं ढीगभर. सगळ्या सोसायटीत माहीत झालं. आई म्हणाली, "अगं, हेच आता आपले भाऊबंध. तेच धावतील मदतीला तर नको सांगायला !"

एकूणच मनाची तयारी झालेली. आईला सगळं अनुकूल वाटत होतं. मुलाला पाहून खुश होती. पण ही शहाण्णवकुळी मुलं का नाहीत पाया पडत? ते हत्तीचं सहा-सव्वासहा फुटाचं पिल्लू (त्याचा परफेक्ट बायोडेटा कुठे माहीत होता.) साडेचार फूट आईच्या पुढं थोडं वाकलं असतं तर काय बिघडलं असतं? निदान त्या ठोकळ्यानं ढोकळ्याला तरी जागावं. मुलगा म्हणून सगळं चालवून घेतात. एकेकदा नमस्कार नीट करता आला नाही म्हणून मुलींना नकार दिलेले ऐकलेत. आई खाली गेली गाडीत तेव्हा तिला पिल्लानं विचारलं जातो म्हणून. शेवटी बसला गाडीत. आई म्हणाली मुलगा खुश दिसत होता. आता तू काही नाटकं करू नकोस. आई खुश वाटल्यावर म्हटलं ठीकंय.

प्रणव म्हणाला, "मुलगा नुसताच धिप्पाड आहे. शेकहॅण्ड केला तर जीव तरी होता का त्याच्या हातात."

"अरे, बाबांना घाबरला असेल. बोलणं कसं वाटलं?"

"काय बोललाच नाही." असं म्हणत पी. सी. सुरू करून कानाला हेडफोन लावून गेम खेळत बसला. मैत्रिणींचे फोन. तेवढ्यात शेजारची चैताली आली. म्हणाली, "बोलवायचं नाहीस का? मलाही एक्सपीरीयन्स मिळाला असता." प्रणवला ती अजिबात आवडायची नाही. त्यामुळे गेममध्ये मारधाड करता करता तीच नजर आमच्याकडे वळवायचा. मग आम्ही गॅलरीतच बसलो.

दुसऱ्याच दिवशी मध्यस्थांचा फोन आला. अर्थात बाबांनाच. उंची कमी वाटली म्हणून नको म्हणाले. आई खूप रडवेली झाली. नीट बोलेनाशी झाली. एकटी एकटी बसू लागली. माझा मात्र संताप संताप झाला. आधीच मुलाला बघायला आणलं असतं तर? बापच शहाणा आला. मुलाला स्पष्ट नको म्हणाला. तेही मुलीच्या मामासमोर. 'स्वत: पसंत पडल्यावर मग आपल्याला नेतात.' या गोष्टीचा, नको म्हटलेल्याचा सूड उगवण्यासाठी तर हा नकार दिला नसेल. त्याच्या देहबोलीतून तर तो खुश वाटत होता. आई तर म्हणाली, "हा नकार मुलाचा नाहीच. असला तरी मनापासून नसावा. तरी नकार द्यायचा म्हणजे... असं आमच्या भावनांशी खेळून नकार दिला." शेवटी मीच समजावलं आईला. दुसऱ्या बाजूने आनंदही झाला.

बाबांनाही असे धक्के बसायलाच पाहिजेत. पण आईसाठी वाईट वाटत होतं आणि त्या मध्यस्थांचाही. त्यांच्यामुळेच मामांनाही त्रास. आणि मुलाच्या बापाचाही (हो बापाचाच.) संताप, संताप येत होता.

आम्हालाही जास्त कुठे नेत नाहीत बाबा. बलेरोतून खर्च होतो म्हणून. गरजेपुरतीच वापरायचे पण त्यांच्यासाठी गाडी गावाकडे नेली. त्यांना गाडीतून आणले. खरं तर ही काय प्रथा नाही. दुसऱ्यांदा येताना म्हणाले,

“गावाकडून गाडीचा दोन-अडीच हजार खर्च करून येतोय ते काय उगाचच का?” पहिल्यांदा सगळं फुकट झालं त्याचं काही नाही. बरं, हा बाप दुसऱ्यांदाही आला ऐटीत बसला. सुना नातवंडंही घेऊन पाहुणचार झोडला. उंची कमी म्हणे. बायोडेटा नीट वाचूनच यायचं नव्हतं काय? मुलाला एवढा अंदाज आला नाही उंचीचा. वरपक्ष म्हणून इतका वरचढपणा? हा आपला शहाण्णवकुळीचा अभिमान बाळगणारा समाज, याच समाजात घडलेला, सुसंस्कारित मुलाचा बाप, ॲडव्हान्स ॲनिमेशनची फॅक्टरी उभारणारा बी. ई. झालेला, ताडमाड वाढलेला मुलगा. स्वत:ला काय समजत होते हे लोक? मुलाकडची बाजू म्हणून एवढा फालतूपणा, पोरकटपणा दाखवायचा ? त्यांच्या या मूर्खपणाला काहीच करू शकत नाही म्हणूनच मला माझाच संताप येतोय.

ह्यांची विचारांची उंची मोजली तर किती भरेल? नकार दिल्याचं वाईट वाटत नाही. असले सबंध नकोच आहेत. पण काळ सोकावतोय. त्याचं काय? ही परीक्षा माझी एकटीची नव्हती. मामा, आई, बाबा, प्रणव सगळ्यांचीच. बघण्या दाखविण्याचा खेळ दोघांचाही पण त्यांनी फक्त एंजॉय केला. आम्ही पराभूतासारखा फक्त मनस्ताप.

....संताप ....संताप....

मी तरी कशी आई-बाबांच्या हावरं-बावरं होण्यात वाहवत गेली? मला माझाच संताप येऊ लागलाय.

आई म्हणाली, “असंच असतं, ही पहिलीच वेळ आहे ना तुझी, होईल सवय हळूहळू...”

संताप.... संताप.... संताप...



" कुणी मला तृप्ती दिली आणि माझी तडफड मागितली तर ती मी त्याला देणार नाही. तडफड कलेचा प्राण आहे." हे कवी ग्रेस यांचे एका ठिकाणी व्यक्त केलेले मत जगताना अस्वस्थता वाटते. जगण्यात आच असते तरी जगण्याची आसोशी वाटते आच असल्याशिवाय धान्याची लाही फुलत नाही. आच मिळाली तरी प्रत्येक बीजाची लाही कुठे उमलते. आच एवढीही नसावी की फुलण्याऐवजी करपून जावे.

सावित्री जगदाळे.

कल्पना बुक डीलर्स,
पुणे